# कृषीवल

रायगड, शुक्रवार, दि. १६ जानेवारी २०२६

किंमत ४ ₹


# टक्का घसरला




**। पनवेल ग्रामीण । वार्ताहर । राज्यातील २९ महापालिका निवडणुकांसाठी दिवसभर उत्साहात मतदान झाले. मुंबई, पुण्यासह विविध जिल्ह्यात मतदार सकाळपासूनच मतदानासाठी बाहेर पडले होते. त्यामध्ये १०० पेक्षा जास्त वय असलेल्या मतदारांनाही मतदानाचा हक्क बजावला, तर पहिल्यांदाच मतदान करणाऱ्या झेन झी मतदारांनीही उत्साहात मतदान केले. मात्र, मुंबईसह महत्त्वाच्या शहरात मतदानाचा टक्का घसरल्याचं पाहायला मिळालं. मुंबईत दुपारी ३.३० वाजेपर्यंत ४१.०८ टक्के मतदान झाले. राज्यात ९ वर्षानंतर झालेल्या महापालिका निवडणुकांसाठीच्या मतदानासाठी यंदा मतदानाचा टक्का घसरल्याचं दिसून आलं.**

महाराष्ट्रातील २९ महानगरपालिका क्षेत्रातील वॉर्डांमध्ये निवडणुका पार पडल्या. बृहन्मुंबई महानगरपालिकेत २२७ वॉर्ड आहेत, तर सर्व महानगरपालिकांमध्ये एकूण ८९३ वॉर्ड आहेत. अशा प्रकारे, राज्यातील २९ महानगरपालिकांमध्ये एकूण २८६९ जागा आहेत, ज्यासाठी १५९०८ उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात उतरले आहेत. •> पान २ वर

## जळगावात गोळीबार

**जळगाव :** राज्यातील महापालिका निवडणुकांसाठी मतदान होत असून दुपारी ३ वाजेपर्यंत मतदानाची टक्केवारी सरासरी ३० टक्क्यांच्या पुढे पोहोचली. मात्र, काही महापालिका क्षेत्रात गटातटात आणि उमेदवारांच्या कार्यकर्त्यांमध्ये राडा झाल्याचं पाहायला मिळालं. जळगाव शहरातील पिंपराळा परिसरामध्ये हवेत गोळीबार झाल्याची प्राथमिक माहिती असून दोन तरुणांमध्ये झालेल्या वादानंतर ही गोळीबाराची घटना घडली. जळगावचे पोलीस अधीक्षक डॉ. महेश्वर रेड्डी यांनी माहिती दिली. गोळीबारच्या घटनेवर पोलीस अधीक्षक डॉक्टर महेश्वर रेड्डी यांनी प्रतिक्रिया देताना म्हटले आहे की, पिंपराळा भागातील रहिवासी असलेले सचिन आणि मुस्तफा नामक तरुणांमध्ये आर्थिक विषयावरून वाद होता. त्यातून गोळीबारची घटना घडलेली आहे

## तणावपूर्ण वातावरणात मतदान पूर्ण

मतदानाच्या दिवशी लोकशाहीची खुलेआम थट्टा झाल्याचे चित्र समोर आले आहे. काही मतदान केंद्रांवर उघडपणे पैशांचे वाटप झाल्याच्या तक्रारी असून महायुतीकडून मतदारांना प्रभावाखाली आणण्याचा प्रयत्न झाल्याचा आरोप आहे. त्याचवेळी अनेक ठिकाणी मतदान यंत्रे वारंवार बंद पडल्याने तासन्‌तास मतदान खोळंबले असल्याचे समोर आले. यातच बोगस मतदार मतदानासाठी आल्याचे प्रकार उघडकीस आले असून विरोध झाल्यावर काही केंद्रांवर हातघाई व मारामारीचे प्रसंग घडले. परिस्थिती नियंत्रणाबाहेर जात असतानाही पोलीस व निवडणूक यंत्रणेने केवळ बघ्याची भूमिका घेतल्याने संताप व्यक्त करण्यात आला. या साऱ्या गोंधळामुळे निवडणूक प्रक्रियेच्या विश्वासार्हतेवर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले असून आज निकाल जाहीर होणार असला, तरी त्याआधीच या निवडणुकीवर वादाचे सावट गडद झाले आहे.



# आज अलिबागमध्ये कृषीवल हळदीकुंकू सोहळा



## सन मराठी वाहिनीतील लोकप्रिय कलाकारांची उपस्थिती

**। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।**
गेल्या अनेक वर्षांपासून महिलांच्या सन्मानाची परंपरा जपणाऱ्या रायगड जिल्ह्यातील अग्रगण्य दैनिक कृषीवलतर्फे यंदाही भव्य हळदीकुंकू सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. मकरसंक्रांतीनिमित्त हा हळदीकुंकू समारंभ शुक्रवारी (दि. १६) सायंकाळी चार ते सात या वेळेत अलिबागयेथील पीएनपी नाट्यगृहात संपन्न होणार असून, त्याची तयारी अंतिम टप्प्यात आली आहे.

लेखणीच्या माध्यमातून सर्वसामान्यांना न्याय मिळवून देणारे दैनिक कृषीवल सामाजिक भान जपत तळागाळातील सर्व घटकांतील महिलांना या सोहळ्याच्या निमित्ताने हक्काचे व्यासपीठ उपलब्ध करून देत आहे. हळदीकुंकू हा प्रत्येक महिलेसाठी सन्मान व सौभाग्याचा प्रतिकात्मक दिवस मानला जातो. हीच परंपरा जपत कृषीवलने गेल्या ३१ वर्षांपासून मकरसंक्रांतीनिमित्त हा उपक्रम सातत्याने राबविला आहे. या सोहळ्यास कृषीवलच्या व्यवस्थापकीय संचालिका चित्रलेखा पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत दिमाखात सुरुवात होणार आहे.

विशेष आकर्षण म्हणून सन मराठी वाहिनीवरील लोकप्रिय मालिकांमधील कलाकार या कार्यक्रमाला उपस्थित राहणार आहेत. यामध्ये 'हुकुमाची राणी' मालिकेतील वैभवी चव्हाण (राणी), अक्षय पाटील (इंद्र), 'इन्स्पेक्टर मंजू' मालिकेतील मोनिका राठी (मंजू), वैभव कदम (सत्या) तसेच 'तू अनोळखी तरी सोबती' मालिकेतील योगिता चव्हाण (अर्पिता) आणि अंबर गणपुले (समीर) यांचा समावेश आहे.

महिलांसाठी पर्वणी ठरणाऱ्या या हळदीकुंकू सोहळ्यासाठी भव्य व सुसज्ज असा मंडप उभारण्यात आला असून, प्रशस्त सभागृहात कार्यक्रम पार पडणार आहे. ग्रामीण व शहरी भागातून येणाऱ्या महिलांना या सोहळ्याचा आनंद घेता यावा, यासाठी आयोजकांकडून उत्तम व्यवस्थापन करण्यात आले आहे.




# पनवेलचं भविष्य मतपेटीत बंद

**। पनवेल ग्रामीण । वार्ताहर ।**
पनवेल पालिकेच्या निवडणुकीचे मतदान पार पडले. साडेपाच वाजेपर्यंत सुरु असलेल्या प्रक्रियेनंतर पनवेलकरांचे भविष्य मतपेटीत बंद करण्यात आले असून, आज पनवेल करांचा भविष्य कोणाच्या हातात याचा निकाल लागणार आहे. काही तुरळक प्रकार किंवा किरकोळ वाद वगळता, प्रशासनाने केलेल्या नियोजनामुळे पनवेल पालिकेच्या मतदानाची प्रक्रिया सुरळीत पार पडली. संवेदनशील मतदान केंद्रांवर तैनात केलेली अतिरिक्त सुरक्षा आणि पोलिसांची गस्त यामुळे ही प्रक्रिया सुरळीत पार पडली. विशेष बाब म्हणजे, निवडणुकीआधीच भाजपचे ६ आणि अपक्ष १ असे ७ उमेदवारांची बिनविरोध निवड झाली आहे, •> पान २ वर




## न्यायालयाचा ममता बॅनर्जींना दणका

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**
गेल्या आठवड्यात पश्चिम बंगालमध्ये इडी अन् मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांच्यात मोठा राडा झाला होता. इडीने तृणमूल काँग्रेसचे निवडणूक कॅम्पेन करणारी संस्था आयपॅकवर छापा मारला होता. त्यावेळी तिथं ममता बॅनर्जी यांनी स्वतः जाऊन इडीच्या ताब्यातील कागदपत्रे आणि हार्ड डिस्क आपल्या ताब्यात घेतली होती. त्यानंतर इडी आणि ममता बॅनर्जी सरकार यांनी परस्परविरोधी तक्रारी दाखल केल्या.

ममता बॅनर्जी यांनी इडीच्या अधिकाऱ्यांविरूद्ध •> पान २ वर

# कुरुळच्या ग्रामसेवकासह प्रशासकाचा मनमानी कारभार

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**
आचारसंहितेच्या कालावधीत कामांना मुदतवाढ देऊन पुन्हा निविदा काढण्यात यावी, असा ठराव ग्रामसभेत असतानाही कुरुळच्या ग्रामसेवकांनी आचारसंहितेच्या काळात जिल्हा परिषद काम वाटप समितीकडे प्रस्ताव पाठविला. प्रशासक रजेवर असताना त्यांची मान्यता न घेता हा प्रकार करून २४ लाख रुपयांच्या कामांतील निधीचा अपहार करण्याचा प्रयत्न केला. परंतु अभिजीत घाडगेसह अन्य ग्रामस्थांनी त्यांचा मनमानी कारभार उघडकीस आणून त्यांचा अपहार करण्याचा डाव हाणून पाडला.

### ग्रामसेवक अडचणीत

प्रशासक येडके रजेवर असताना ग्रामसेवक वाखेडे यांनी कामे वाटपाचा प्रस्ताव पाठविल्याने ग्रामस्थांच्या मनात संशय निर्माण झाला. त्यामुळे ग्रामसेवकाच्या अधिकारात नसताना, प्रशासकाची मान्यता न घेता हा गैरप्रकार करून मर्जीतील ठेकेदाराला काम देण्याचा प्रयत्न होत असल्याचा आरोप अभिजीत घाडगे यांच्यासह अनेकांनी केला आहे. तसेच ग्रामस्थांनी ही बाब पंचायत समिती गटविकास अधिकाऱ्यांसह जिल्हा परिषद ग्रामपंचायत विभागाचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या निदर्शनास आणून दिली.

> “कुरुळ ग्रामपंचायतीमधील कामे वाटपाचा प्रस्ताव ग्रामसेवकांनी पाठविला. त्यानंतर तो प्रस्ताव जिल्हा परिषदेकडे पाठविण्यात आला. मात्र ग्रामस्थांच्या तक्रारीनुसार हा प्रस्ताव पाठविताना नियमांचे पालन केले का, याची खात्री केली जाईल. त्यात ग्रामसेवक व प्रशासक दोषी असल्यास त्यांच्याविरोधात कारवाई केली जाईल.”
> – शर्मिला पाटील, गटविकास अधिकारी, अलिबाग

> “आचारसंहितेमुळे ग्रामसभेत २४ लाख रुपयांच्या विकासकामांना मुदतवाढ देऊन पुन्हा निविदा देण्यात याव्यात, असा ग्रामसभेत ठराव घेण्यात आला होता. तरी देखील ग्रामसेवक वानखेडे यांनी आपल्या मर्जीतील ठेकेदाराला कामे देण्यासाठी प्रयत्न केले. ग्रामसेवक व प्रशासक यांनी नियमबाह्य कामे केली आहेत. तरी या कामांना स्थगिती देऊन पुन्हा निविदा मागविण्यात याव्यात.”
> –अभिजीत घाडगे, ग्रामस्थ

अभिजीत घाडगे यांच्याकडून मिळालेल्या माहितीनुसार, कुरुळ ग्रामपंचायतीवर सध्या प्रशासकीय राजवट सुरु आहे. •> पान २ वर

कृषीवल

## क्रांतियोद्ध्यास विनम्र अभिवादन



## नारायण नागू पाटील

(२९ ऑगस्ट १८९२ ते १६ जानेवारी १९६८)

रायगड जिल्ह्यातील शेतकरी आणि कामगारांना आवाज देणाऱ्या,
सर्वसामान्य माणसाच्या आशा-आकांक्षांना
अभिव्यक्ती देणाऱ्या क्रांतियोद्ध्याची,
पत्रकारितेचे शस्त्र उपसून प्रबोधन करणाऱ्या लोकशिक्षकाची,
नारायण नागू पाटील यांची आज पुण्यतिथी
'कृषीवल' परिवाराच्या वतीने विनम्र अभिवादन
।। आम्ही चालवू हा पुढे वारसा ।।

# आता मार्करऐवजी काडीने लावणार शाई



- जिल्हा परिषद निवडणुकीसाठी आयोगाचा निर्णय
- विरोधकांचे आरोप आयोगाने फेटाळले

**। मुंबई । प्रतिनिधी ।**
मुंबईसह राज्यभर सुरू असलेल्या महापालिका निवडणुकांमध्ये मतदारांच्या बोटाला लावली जाणारी शाई पुसली जात असल्याच्या आरोपानंतर जोरदार राजकीय गदारोळ पसरला आहे. दरम्यान, राज्य निवडणूक आयुक्त दिनेश वाघमारे यांनी हे आरोप पूर्णतः निराधार असून, जनतेमध्ये मुद्दाम संभ्रम निर्माण करण्याचा प्रयत्न केला जात असल्याचा आरोप त्यांनी केला.

दरम्यान, 'मार्कर पेनचा अनुभव पाहता आगामी जिल्हा परिषद निवडणुकीत आम्ही इंडिलेबल इंकचा वापर करणार आहोत.' अशी घोषणा दिनेश वाघमारे यांनी गुरुवार, दि. १५ जानेवारी रोजी पत्रकार परिषद घेऊन केली आहे. त्यामुळे आता ५ फेब्रुवारीला मार्करऐवजी काडीने बोटाला शाई लावली जाणार आहे.

राज्य निवडणूक आयोग २०११ पासून मार्कर पेनद्वारे शाईचा वापर करत आहे. ही शाई बोटावर लावल्यानंतर १० ते १२ सेकंदात सुकते आणि एकदा सुकल्यानंतर ती कोणत्याही प्रकारे पुसता येत नाही, असा ठाम दावा आयुक्त वाघमारे यांनी पत्रकार परिषदेत केला. 'ही शाई वेगळी नसून, भारतीय निवडणूक आयोग लोकसभा व विधानसभा निवडणुकांमध्ये वापरतो, तीच शाई आहे. मतदार मतदान केल्यानंतर एवढा वेळ मतदान केंद्रातच असतो. त्यामुळे शाई पुसली जाण्याची शक्यताच नाही,' असे त्यांनी स्पष्ट केले.

शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षप्रमुख उद्धव ठाकरे आणि मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी शाई पुसली जात •> पान २ वर




| आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७
| MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)


# पैशाच्या हव्यासापोटी रक्ताची नाती तुटताहेत

■ महेंद्र घरत यांचे भावनिक उद्गार



| चिरनेर | प्रतिनिधी |

ज्या विधात्याने बहीण-भावासारखी पवित्र रक्ताची नाती निर्माणकेलीआहेत,तीनातीसाडेबारा टक्के भूखंडाच्या हव्यासापोटी तुटली जात आहेत, असे भावनिक उद्गार आंतरराष्ट्रीय कामगार नेते महेंद्र घरत यांनी काढले.

आंतरराष्ट्रीय कामगार नेते महेंद्र घरत यांचे पिताश्री तुकाराम नारायण घरत यांच्या अकराव्या पुण्यस्मरण सोहळ्यानिमित्ताने उलवे नवी मुंबई येथील भूमीपुत्र भवनात बुधवारी (दि.१४) 'पैशाने तुटली नाती' या स्थानिक नाटककार हसूराम पाटील लिखित व धनेश्वर म्हात्रे, प्रसाद कडू दिग्दर्शित तसेच रमेश कोळी व अशोक म्हात्रे निर्मित वास्तववादी दोन अंकी नाट्यकलाकृतीचा देखणा प्रयोग सादर करण्यात आला. त्यावेळी महेंद्र घरत बोलत होते. या नाट्यप्रयोगाला उरण पनवेल तालुक्यातील प्रेक्षकांचा उदंड प्रतिसाद लाभला.

यापुढे महेंद्र घरत यांनी खऱ्या वास्तवातील हे पैशाने तुटली नाती नाटक समाज प्रबोधन करणारे असून, सद्य:स्थितीत येथील लोकांच्या डोळ्यात झणझणीत अंजन घालणारे आहे. याशिवाय इथल्या स्थानिक कलाकारांमध्ये टॅलेंट आहेत. त्यांना संधी देणे, प्रतिष्ठा देणे, हे एक स्थानिक नेता म्हणून माझे काम आहे. या नाटकाच्या माध्यमातून येथील लोकांमध्ये जनजागृती करण्याची गरज आहे. त्यामुळे या नाटकाचे प्रयोगजास्तीतजास्तसादरकरण्याचा प्रयत्न अष्टगंध कला मंचाने करावा. या प्रयोगाच्या सादरीकरणासाठी माझ्याकडून योग्य ती मदत केली जाईल, असा आशावाद घरत यांनी व्यक्त करत, जमिनीच्या पैशांमुळे आज भावाबहिणींची नाती तुटत चालली आहेत. त्यामुळे बऱ्याच भावाबहिणींचे रक्षाबंधन, भाऊबीज यासारखे पवित्र कार्यक्रम होत नाहीत. असे सांगून, अष्टगंध कलामंचाने समाज प्रबोधन करणारी नाट्य चळवळ उभारून एक अविस्मरणीय व गौरवास्पद कामगिरी केली आहे. हे नाटक लोकांच्या मनात ठसणारे आहे. ग्रामीण कलाकारांना एका छत्राखाली आणून त्यांच्यातील नाट्यगुण समाजासमोर मांडण्याचे काम ही नाट्यसंस्था समर्पित भावनेने करीत असल्याचे मत घरत यांनी व्यक्त केले. याप्रसंगी स्वर्गीय तुकाराम घरत यांना आदरांजली वाहण्यात आली. त्यानंतर महेंद्र घरत यांचे ज्येष्ठ बंधू गुलाब घरत यांच्या हस्ते श्रीफळ वाढवून नाट्यप्रयोगाचे उद्घाटन करण्यात आले. यावेळी अनेक मान्यवर उपस्थित होते. दरम्यान अष्टगंधाच्या कलाकारांनी नाटकात आपल्या अभिनयाचे रंग भरत या संधीचे सोने केले.

त्यामुळे ही नाट्यकलाकृती रसिकांसाठी मेजवानीच ठरली. नाटकात हसुराम पाटील, सुमित कुंभार, वैशाली मोहिते, अशोक म्हात्रे, कृष्णनाथ म्हात्रे, वैशाली मोहिते, परीशा सरोदे, निकिता पाटील, प्रफुल्ला चव्हाण, चेतन पाटील, दिगंबर कोळी, धनेश्वर म्हात्रे, रोशन घरत, अलंकार कडू आदी कलाकारांनी भूमिका बजावल्या. आनंद कुबल, राजेंद्र जोशी व चव्हाण या तंत्रज्ञांनी संगीत, रंगभूषा, ध्वनी व नेपथ्यातून प्रत्येक प्रसंग फुलविला आहे.



## वास्तविक चित्रपटाला ग्रामीण भागातील महिलांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

| महाड | प्रतिनिधी |

मराठी शाळेच्या वास्तवाशी जोडलेली आणि भावनिक नाळ निर्माण करणारी कथा मांडणारा हेमंत ढोमे लिखित, दिग्दर्शित 'क्रांतिज्योती विद्यालय मराठी माध्यम' हा सिनेमा सध्या महाराष्ट्रभर चर्चेत आहे.

याच चित्रपटाच्या अनुषंगाने भवानी नडगाव गावातील तरुणाने प्रणय अगबुल व सहकारी यांनी एकत्रित येत भवानी नडगाव गावातील महिलांना हा चित्रपट दाखविला. हा चित्रपट १ जानेवारी रोजी चित्रपटगृहात प्रदर्शित झाला असून, चित्रपटगृह प्रेक्षकांच्या गर्दीने अगदी हाऊसफुल्ल होत आहेत. हा चित्रपट प्रामुख्याने शिक्षण पद्धती, शालेय जीवन आणि ग्रामीण भागातील शिक्षणाचे महत्त्व या संवेदनशील विषयांवर भाष्य करतो. हिंदी आणि दाक्षिणात्य बिग बजेट चित्रपटांच्या स्पर्धेतही या मराठी चित्रपटाने आपले स्थान प्रेक्षकांच्या मनात निर्माण केले आहे, असे प्रणय अगबुल यांनी व्यक्त केले.

# विद्यार्थ्यांनी राष्ट्रनिर्मितीत योगदान द्यावे

## नगराध्यक्षा आराधना दांडेकर यांचे आवाहन

| आगरदांडा | प्रतिनिधी |

राजमाता जिजाऊ यांचे आदर्श मातृत्व, दूरदृष्टी आणि छत्रपती शिवाजी महाराजांवर घडवलेले संस्कार त्यांच्या विचारांतून मिळणारी प्रेरणा आजच्या पिढीसाठी अत्यंत आवश्यक आहे तरी महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी आपल्या शिक्षणाबरोबर सामाजिक बांधिलकी जपत राष्ट्रनिर्मितीत योगदान द्यावे, असे आवाहन नगराध्यक्षा आराधना दांडेकर यांनी कोकण उन्नती मित्र मंडळाचे वसंतराव नाईक कला व वाणिज्य महाविद्यालयातील सभागृहात स्त्रीशक्तीचा सन्मान अभिवादन सोहळा पार पडला. यावेळी बोलत होत्या.



यावेळी नवनिर्वाचित नगराध्यक्षा आराधना दांडेकर, प्राचार्य डॉ. जनार्दन कांबळे, डॉ. श्रीशैल बहिरगुडे, डॉ. सुभाष म्हात्रे, माजी प्रभारी प्राचार्य डॉ. विश्वास चव्हाण, महाविद्यालय विकास समितीच्या सदस्या वासंती उमरोटकर, नगरसेविका प्रांजली मकू, प्रमिला माळी, देवयानी गुरव, प्रीता चौलकर, श्रद्धा अपराध, अॅड. मृणाल खोत, तरन्नूम फराश, डॉ. नारायण बागुल, प्रा. श्रीशेल भैरगुंडे, डॉ. सीमा नाहिद, प्रा. प्रवेश पाटील, प्रा. चिंतन पोतदार, प्रा. प्रणव बागवे, प्रा. सिद्धेश सतविडकर, प्रा. मुस्कान रज्जब, प्रा. रुफी हसवारे, वरिष्ठ लिपीक गणेश लाड, अतिश आगरावकर व मोठ्या संख्येने विद्यार्थी उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या सुरुवातीस राजमाता जिजाऊ, सावित्रीबाई फुले व स्वामी विवेकानंद यांच्या यांच्या प्रतिमांचे पूजन करून वासंती उमरोटकर यांनी पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. महाविद्यालयाच्यावतीने वासंती उमरोटकर यांच्या हस्ते शाल, श्रीफळ, पुष्पगुच्छ व मानपत्र देऊन नगराध्यक्षा आराधना दांडेकर यांचा सत्कार करण्यात आला. तसेच नवनिर्वाचित नगरसेवकांचा ही यावेळी सत्कार करण्यात आला.

महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जनार्दन कांबळे यांनी आपल्या मनोगतातून विद्यार्थ्यांना स्वामी विवेकानंदांच्या प्रेरणादायी विचारांचा अंगीकार करून शिक्षणासोबतच चारित्र्यनिर्मितीवर भर देण्याचे आवाहन केले. तसेच सावित्रीबाई फुले यांच्या कार्यामुळेच आज शिक्षणाचा मार्ग सर्वांसाठीला झाला व राजमाता जिजाऊ कौटुंबिक, सामाजिक व राजकीय परिस्थितीवर मात करत कसे शिवबास घडविले व स्वराज निर्माण केले हे त्यांनी आपल्या मनोगतातून सांगितले.

महाविद्यालय विकास समितीच्या सदस्या वासंती उमरोटकर यांनी महाविद्यालयाच्या सर्वांगीण विकासासाठी स्थानिक स्वराज्य संस्थांचे सहकार्य महत्त्वाचे असल्याचे सांगितले तसेच राजमाता जिजाऊ यांच्या संस्कारातून छत्रपती शिवाजी महाराज घडले, याचा संदर्भ देत विद्यार्थ्यांनी इतिहासातून प्रेरणा घ्यावी, असे मत व्यक्त केले.

## आमडोशी येथे दासबोध सप्ताह

| नागोठणे | प्रतिनिधी |

नागोठण्याजवळील आमडोशी येथे बुधवार, दि. २१ ते शुक्रवार, २३ जानेवारीदरम्यान परमपूज्य मोक्ष दास दाते राजाधिराज समर्थ सद्गुरु ताईसाहेब महाराज यांची १२७ वी जयंती व अखंड दासबोध सप्ताह गुरुवर्य अनंत महाराज यांच्या हस्ते होणार आहे. या कार्यक्रमाची सुरुवात बुधवार, दि.२१ जानेवारी रोजी सकाळी ९ वाजता माऊलींची पाद्यपुजा व अखंड दासबोध नाम सप्ताहाने होणार आहे. त्यानंतर सायंकाळी माऊली मेढा पंचक्रोशी यांचे हरिपाठ झाल्यानंतर ग्रामस्थ भजन मंडळ, आमडोशी यांचे भजन होणार आहे. सायंकाळी ७ ते ९ या वेळेत चिपळूण येथील हभप दिलीप महाराज धुळप यांचे कीर्तन होणार आहे. गुरुवार दि. २२ जानेवारी रोजी सकाळी ५ वा. काकड आरती व ध्यान, माऊलींची पाद्यपुजा, दासबोध वाचन, सकाळचे भजन, मान्यवरांची प्रवचने, माऊलींची आरती होणार आहे.

## राजमाता जिजाऊ, स्वामी विवेकानंद जयंती उत्साहात



| माणगाव | प्रतिनिधी |

माणगाव शिक्षण प्रसारक मंडळाच्या द. ग. तटकरे महाविद्यालय, माणगाव (रायगड) येथे राष्ट्रीय सेवा योजना विभाग व महिला विकास कक्ष यांच्या संयुक्त विद्यमाने सोमवारी दि. १२ जानेवारी रोजी राजमाता जिजाऊ जयंती आणि स्वामी विवेकानंद जयंती अत्यंत उत्साहपूर्ण वातावरणात साजरी करण्यात आली.

कार्यक्रमाच्या सुरुवातीस प्रमुख मान्यवरांच्या उपस्थितीत राजमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद यांच्या प्रतिमांचे पूजन करून पुष्पहार अर्पण करण्यात आले. याप्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बी.एम. खामकर यांनी स्वामी विवेकानंद यांच्या जीवनकार्याचा आढावा घेत, त्यांच्या विचारांची समाजपरिवर्तनातील भूमिका अधोरेखित केली. तरुणाईला आत्मविश्वास, चारित्र्यनिर्मिती आणि राष्ट्रउभारणीचा संदेश देणारे विवेकानंदांचे विचार आजही तितकेच मार्गदर्शक असल्याचे त्यांनी नमूद केले.

यावेळी बोलताना प्राचार्य डॉ. खामकर यांनी हिंदवी स्वराज्याच्या उभारणीत मोलाची भूमिका बजावणाऱ्या राजमाता जिजाऊ यांच्या कार्यावरही सखोल मार्गदर्शन केले. छत्रपती शिवाजी महाराजांच्या जीवनात शौर्य, राष्ट्रप्रेम, नीतिमत्ता आणि स्वराज्याचे स्वप्न रुजवणाऱ्या राजमाता जिजाऊ या केवळ माता नव्हे, तर महान राष्ट्रघडवणाऱ्या गुरू होत्या, असे त्यांनी विद्यार्थ्यांना प्रेरक शब्दांत सांगितले.

कार्यक्रमात महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. राजेंद्र आचार्य यांनी स्वामी विवेकानंदांनी केलेल्या वेदांत व योगाच्या प्रचार-प्रसारावर, तसेच रामकृष्ण मिशनच्या स्थापनेमागील समाजसेवा व आध्यात्मिक प्रबोधनाच्या उद्दिष्टांवर प्रकाश टाकला. शिक्षण, स्वावलंबन आणि आत्मशक्तीची जाणीव या मूल्यांमुळेच राष्ट्र सक्षम बनते, असा संदेश त्यांनी विद्यार्थ्यांना दिला.

# सैनिकी तालुक्यात सुविधांचा अभाव

| महाड | प्रतिनिधी |

महाड व पोलादपूर तालुके केवळ भौगोलिकदृष्ट्या नव्हे, तर सैनिकी परंपरेच्या दृष्टीनेही राज्यात वेगळे स्थान राखून आहेत. शिवकाळापासून या परिसरातील ग्रामीण तसेच घरपट्टी भागातील नागरिक मोठ्या प्रमाणावर सैन्यात दाखल झाल्याचा इतिहास उपलब्ध आहे. स्वराज्याच्या रक्षणासाठी छत्रपती शिवाजी महाराजांच्या काळात या भागातील तरुणांनी मोलाची भूमिका बजावल्याचे दाखले आढळतात. हीच परंपरा पुढे स्वातंत्र्यपूर्व काळात ब्रिटिश सैन्यात आणि स्वतंत्र भारताच्या सैन्यातही निष्ठेने पुढे नेण्यात आली आहे.

सेवानिवृत्त सैनिकांना पेन्शन, वैद्यकीय, शासकीय कागदपत्रे, माजी सैनिक कार्यालयीन कामकाज तसेच विविध कार्यक्रमांसाठी महाड किंवा पोलादपूर येथे यावे लागते. अशा वेळी त्यांच्यासाठी सुसज्ज विश्रांतीगृह उपलब्ध नसल्यामुळे अडचणींना सामोरे जावे ला-गते. माजी सैनिकांचे मेळावे, शौर्यदिन, विजयदिन, स्मृतिदिन, मार्गदर्शन शिबिरे, युवकांसाठी भरतीपूर्व प्रशिक्षण कार्यक्रम आणि सामाजिक उपक्रमांसाठी स्वतंत्र सभागृहाची नितांत गरज आहे. सध्या अशा कार्यक्रमांसाठी योग्य व सुसज्ज जागेचा अभाव जाणवतो. परिणामी, अनेक उपक्रम इच्छेअभावी नव्हे तर सुविधांच्या अभावामुळे मर्यादित राहतात. महाड-पोलादपूर तालुक्यात सेवानिवृत्त सैनिकांसाठी स्वतंत्र सभागृह व विश्रांतीगृह उभारल्यास ते केवळ सुविधा केंद्र न राहता, देशभक्ती, शौर्य आणि प्रेरणेचे केंद्र बनेल.



याकडे शासन, जिल्हा प्रशासन आणि लोकप्रतिनिधींनी गांभीर्याने लक्ष देऊन तातडीने ठोस निर्णय घ्यावेत, अशी मागणी व्यक्त होत आहे. मूलभूत सुविधा उपलब्ध नसल्याची खंत महाड व पोलादपूरातील ग्रामीण भागात या सेवानिवृत्त सैनिकांना पुढील वारसदारांना सीमा रे-षेवर ड्युटीवर असताना संपर्क साधण्यासाठी अनेक यातायात करावी लागते.

## एका क्लीकवर झाडाची माहिती



| तळा | प्रतिनिधी |

दक्षिण कोकणात अनेक शाळांचा पट हा कमी होत असताना तळा तालुक्यातील जि. प. शाळा कळमशेत शाळेचा पट हा २०२३ ला ५ होता तो आता वाढून १६ झाला आहे. पुढे शाळेचा पट वाढविण्यासाठी येथील शिक्षकांनी निर्धार केला असल्याचे पहावयास मिळाले आहे. ही शाळा चौथीपर्यंत असून उपक्रम राबविणारी शाळा म्हणून पुढे येत आहे. गुणवत्तापूर्ण शाळा म्हटलं तर वावगं ठरणार नाही. शाळेच्या बागेत असणाऱ्या झाडांना क्यूआरकोड दिले असून त्या झाडाची पुर्ण माहिती स्कॅन केल्यानंतर समोर येते.

या शाळेला २०१९ मधे आदर्श शाळा पुरस्कार प्राप्त झाला आहे. तसेच माझी मुख्यमंत्री शाळा पुरस्कार २०२३-२०२४ द्वितीय क्र. व २०२४-२०२५ प्रथम क्र. व २०२५-२०२६ परसबाग तृतीय क्रमांक प्राप्त असे पुरस्कार प्राप्त शाळा गुणवत्तेतही तेवढीच पुढे येताना दिसत आहे. स्पर्धा परीक्षा मंथनमधे सर्व विद्यार्थी यशस्वी होत आहेत. तालुका गुणवत्ता यादीत ही आली आहेत. २०२५-२०२६ मधे स्पर्धा परीक्षा मंथन, प्रज्ञाशोध व आरटीएस परीक्षेस बसविली असून विद्यार्थांचा दररोज सराव घेतला जाऊन सुट्टीच्या दिवशी ही सराव घेतला जात आहे. सध्या राजू माणिक पठारे मुख्याध्यापक व मागीलवर्षी शिक्षण सेविका सीमा नामदेव चौधरी या रूजू झाल्या आहेत.

## पनवेल स्थानकातील भूयारी मार्ग खुला

**पनवेल** : पनवेलकडे जाण्यासाठी एकाच उड्डाणपुलावर अवलंबून राहावे लागत असल्याने कोणताही अनुचित प्रसंग घडू नये, यासाठी रेल्वे प्रशासनाने भुयारी मार्ग पुन्हा सुरू केला आहे. पनवेल रेल्वे स्थानकात सकाळी व संध्याकाळी चाकरमान्यांसह गाड्यांमधून येणाऱ्या प्रवाशांची मोठी गर्दी होत आहे.

पान १ वरून

## पनवेलचं भविष्य मतपेटीत बंद

ज्यामुळे निकालाआधीच ७ जागेचे चित्र स्पष्ट झाले आहे. तर २० प्रभागातील उरलेल्या इतर जगासाठी मतदान प्रक्रिया पार पडली. निकालचा दिवस हा पनवेलच्या राजकीय भविष्यासाठी अत्यंत महत्त्वाचा ठरेल. दुपारपर्यंत बहुतांश प्रभागांचे कल स्पष्ट होतील आणि दुपारनंतर अधिकृत निकाल जाहीर होण्याची शक्यता आहे.

**ग्रामीण भागात उत्साह**

सकाळी साडेसातपासून सुरु झालेल्या मतदान प्रक्रियेला पालिकेत समाविष्ठ ग्रामीण भागातील मतदारांनी सकाळपासूनच उत्साहात प्रतिसाद दिला. ग्रामीण भागाचा सहभाग असलेल्या प्रभाग क्रमांक १ आणि २ मध्ये सर्वाधिक मतदान झाले. तर सुरूवातीला मतदानाची टक्केवारी कमी असलेल्या शहरी भागातील मतदारसंघात दुपारनंतर मतदान वाढले. मतदान प्रक्रिया बंद होण्याच्या काही मिनटे आधी मतदान केंद्रावर मतदारांच्या रांगा लागल्याचे पाहायला मिळाले.

**बोटावर लावली जाणारी शाई पुसली जात असल्याचा दावा**

मतदान प्रक्रियेतील एका महत्त्वाच्या मुद्द्याने कामोठे परिसरात चर्चा निर्माण झाली होती. कामोठे येथील बूथ क्रमांक १३ आणि केंद्र क्रमांक ३ मधील इंगे-स्कॉट शाळेतील मतदान केंद्रावर मतदानाचा हक्क बजावून बाहेर आलेल्या सुनील शिरीषकर यांनी मतदानानंतर बोटावर लावली जाणारी शाई साध्या पाण्याने व टिशू पेपरने पुसली जात असल्याचा दावा केला. त्यांनी यासंदर्भात व्हिडिओ शेअर केला आहे. यामुळे राज्यातील इतर महापालिकेमध्ये दिवसभर चर्चेला आलेला हा विषय पनवेलमध्ये देखील चर्चेला आल्याचे पाहायला मिळाले. प्रभाग क्रमांक ७ मध्ये देखील असाच आरोप करत मनसेचे उमेदवार शिवम पाटील आणि वंचितच्या उमेदवार प्रियंका गाडे यांनी अधिकाऱ्यांना धारेवर धरले.

**मतदान यंत्र बंद**

प्रभाग क्रमांक ८ मधील एका मतदान केंद्रातील एक मतदान यंत्र बंद पडल्याने मतदान काही वेळ ठप्प झालं होत. प्रशासनाकडून दखल घेत ठप्प झालेले मतदान पुन्हा सुरु करण्यात आले.

**मयत व्यक्तीच्या नावे मतदान झाल्याचा दावा**

प्रभाग क्रमांक दहामधील एका मतदान केंद्रावर मयत व्यक्तीच्या नावे मतदान करण्यात आल्याचा दावा प्रभाग १० मध्ये अपक्ष म्हणून निवडणूक लढवलेले उमेदवार अक्षय हाके यांनी केला आहे. तसेच अनेक ठिकाणी बोगस मतदान झाल्याचा हाके यांचा आरोप आहे.

**उमेदवाराच्या पोलिंग बूथवर गर्दी**

मतदानापूर्वी आपले नाव मतदार यादीत आहे का, हे तपासण्याकरता मतदारांनी उमेदवारांच्या बूथवर मोठी गर्दी केल्याने अनेक भागातील उमेदवारांची जनसंपर्क कार्यालय बंद करण्याची वेळ पोलिसांवर आली.

**मतदान केंद्राच्या नावामुळे मतदारांची धावपळ**

बहुतांश उमेदवारांकडून मतदारांना त्यांच्या नावाच्या तसेच नाव त्या केंद्रावर आले आहे त्या केंद्राच्या नावाच्या पावत्या पुरवण्यात आल्या. मात्र या याद्या इंग्रजी अक्षरात असल्याने तसेच प्रभाग क्रमांक दहामधील एका मतदान केंद्राचे नाव इंग्रजीमध्ये वेगळ्याच अर्थाने छापण्यात आल्याने हे केंद्र कुठे आहे, हे शोधण्यासाठी मतदारांना धावपळ करावी लागली. या प्रभागातून मनसेकडून उमेदवारी करत असलेल्या प्रीती चव्हाण यांना देखील केंद्राची शोधाशोध करावी लागल्याचे पाहायला मिळाले.

**मतदान यंत्र उलट्या क्रमाने लावल्याचा आरोप**

प्रभाग क्रमांक एकमधील डान्सर गावातील मतदान केंद्रावर मतदान यंत्र उलट्या क्रमाने लावण्यात आल्याचा आरोप करत आघाडीच्या उमेदवारांनी आक्षेप घेतल्याने या केंद्रावरील मतदान काही वेळ ठप्प झाले होते. त्यानंतर मतदान प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर भाजप महायुतीच्या उम दवारांनी मतदान केंद्रावर उपस्थित असलेल्या अधिकाऱ्यांनी ओळखपत्र घातले नसल्याने तसेच अधिकाऱ्यांना नाव विचारले असता त्यांनी त्यांची नावे न सांगितल्याने गोंधळाचे वातावरण तयार झाले होते. यामुळे झोनल ऑफिसर यांनी मतदान केंद्राला भेट देत आपला आक्षेप लेखी देण्याची मागणी करत नंतर मार्ग काढण्याचे आश्वासन दिले.

## न्यायालयाचा ममता बॅनर्जींना दणका

चोरीचा आरोप करत एफआयआर दाखल केली होती. त्यानंतर इडीने सर्वोच्च न्यायालयात धाव घेतली. गुरुवारी त्याच्यावर सुनावणी झाली. त्यावेळी सर्वोच्च न्यायालयाने पुढची सुनावणी होईपर्यंत इडीच्या अधिकाऱ्यांवर दाखल केलेली एफआयआर स्थगित केली. आता न्यायालयाने याप्रकरणी सरकारकडून दोन दिवसांत उत्तर मागितलं आहे. न्यायालयाने यावेळी तपास यंत्रणांच्या तपासात हस्तक्षेप करता येणार नाही, असं सांगितलं.

## आता मार्करऐवजी काडीने लावणार शाई

असल्याचा आरोप करत निवडणूक आयोगावर टीका केली होती. त्यानंतर आयुक्त वाघमारे स्वतः माध्यमांसमोर आले आणि आरोपांमध्ये कोणतेही तथ्य नसल्याचे ठामपणे सांगितले. नेलपेंट रिमूव्हर, सॅनिटायझरच्या आरोपांनाही नकार शाई नेलपेंट रिमूव्हर किंवा सॅनिटायझरने पुसली जात असल्याच्या तक्रारींवरही आयुक्तांनी स्पष्ट नकार दिला. आमच्या कार्यालयातील सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांनी मतदान केले आहे. एकाही व्यक्तीची शाई पुसली गेलेली नाही. आम्ही कोरस कंपनीचे मार्कर पेन अनेक वर्षांपासून वापरत आहोत, असे त्यांनी सांगितले.

## टक्का घसरला

राज्यात २९ महानगरपालिकांसाठी मतदान झाले. सकाळी आठ वाजल्यापासून मतदान सुरु होते. आता मतदान पूर्ण झाल्यानंतर एक्झिट पोल समोर आला आहे. मुंबई म हापालिकेचा एक्सिस माय इंडियाचा एक्झिट पोल समोर आला आहे. त्यानुसार भाजप आणि शिंदे यांच्या युतीला १३८ जागा मिळणार असल्याचा अंदाज वर्तवला जात आहे. तर ठाकरे बंधू आणि पवारांच्या राष्ट्रवादीला केवळ ६२ जागा मिळतील असे म्हटले जात आहे. भाजपला ४२ टक्क्याहून अधिक वोट, ठाकरेंच्या आघाडीला ३२ टक्के मते मिळणार तर इतरांना १३ टक्के वोट मिळणार असा अंदाज आहे. एक्झिट पोलनुसार एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेला ३२ ते ३८ जागा मिळण्याची शक्यता आहे. तर ठाकरेंच्या शिवसेनेला ५२ ते ५९ जागा मिळण्याची शक्यता आहे. याचा अर्थ शिवसेनेत फ ूट पडल्यानंतर उद्धव ठाकरे हे एकनाथ शिंदेंपेक्षा वरचढ ठरत आहेत. आजही मुंबईकरांचे प्रेम ठाकरे कुटुंबियांवर आहे हे यातून स्पष्ट होत आहे. हा एकनाथ शिंदे यांना मोठा धक्का मानला जात आहे. या पोलचे अंदाज खरे ठरले तर एकनाथ शिंदे सत्तेत असतील मात्र खऱ्या अर्थाने ठाकरेंना जास्त जागा मिळाल्यास हा एकनाथ शिंदेंना मोठा धक्का असेल.

**राज्यातील २९ महापालिकेमध्ये कुठं, किती मतदान?**

बृहन्मुंबई महानगरपालिका : ४१.०८ टक्के, ठाणे : ४३.९६, कल्याण डोंबिवली : ३८.६९ नवी मुंबई- ४५.५१ टक्के, उल्हासनगर : ३४.८८, भिवंडी निझामपूर - ३८.२१, मिरा भाईंदर : ३८.३४, वसई विरार : ४५.७५, पनवेल : ४४.०४, नाशिक : ३९.६४, मालेगाव : ४६.१८, धुळे : ३६.४९, जळगाव : ३४.२७, अहिल्यानगर : ४८.४९, पुणे - ३६.९५ टक्के, पिंपरी चिंचवड - ४०.५० टक्के, सोलापूर : ४०.३९, कोल्हापूर : ५०.८५,सांगली मिरज-कुपवाड : ४१.७९,छ. संभाजीनगर : ४३.६७, नांदेड वाघाळा : ४२.४७, लातूर : ४३.५८ परभणी : ४९.१६, अमरावती : ४०.६२, अकोला : ४३.३५, नागपूर : ४१.२३, चंद्रपूर : ३८.१२, इचलकरंजी : ४६.२३,जालना : ४५.९४

## कुरुळच्या ग्रामसेवकासह प्रशासकाचा मनमानी कारभार

ग्रामविकास अधिकारी म्हणून विष्णू वानखेडे असून प्रशासक म्हणून बाळासाहेब येडके कार्यरत आहे. गेल्या अनेक महिन्यांपासून प्रशासकीय राजवटीतून हा कारभार चालत आहे. नुकतीच नगरपरिषदेची निवडणूक झाली. यावेळी नगरपरिषदेच्या आजूबाजूच्या ग्रामीण भागातही आचारसंहिता लागू करण्यात आली होती. दरम्यान, कुरुळ ग्रामपंचायतीमधील ग्रामनिधी व १५ वित्त आयोगातील २४ लाख २२ हजार २१६ रुपयांची विकासकामे मंजूर करण्याचा प्रयत्न ग्रामसेवक वानखेडे व प्रशासक येडके यांनी केला. ही बाब निदर्शनास येताच २३ डिसेंबरला झालेल्या ग्रामसभेत आचारसंहितेत मुदतवाढ करून पुन्हा निविदा काढण्यात याव्यात, असा ठराव घेण्यात आला. २५ डिसेंबर २०२५ ते दोन जानेवारी २०२६ या कालावधीत प्रशासक येडके हे रजेवर गेले. दरम्यान वानखेडे यांनी आधीचा कार्यारंभ आदेश रद्द करून ग्रामपंचायतीमधून स्वतःच्या सहीने पंचायत समिती अलिबागकडे कामे वाटपाचा प्रस्ताव पाठवून जिल्हा परिषद कामे वाटप समितीकडून प्रस्ताव मंजूर करून घेतला.

**मुदतवाढ देऊन कामांची निविदा पुन्हा नव्याने काढण्याचा ठराव घेण्यात आला. त्यानुसार कार्यवाही करण्यात आली. त्यानंतर कामे वाटपाचा प्रस्ताव पाठविण्यास सांगितले. त्यानुसार ग्रामसेवकांनी पाठविला आहे. दरम्यान रजेवर असल्याने सही घेऊन मान्यता घेण्यात आली नाही.**

**- बाळासाहेब येडके, प्रशासक**

## निवडक

### बसस्थानक परिसरात सर्वंकष स्वच्छता मोहीम

**पनवेल :** महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या सर्वच बसस्थानक परिसरात दर १५ दिवसांनी सर्वंकष स्वच्छता मोहीम राबविण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. प्रवाशांना अधिक स्वच्छ, सुरक्षित व आरोग्यदायी सुविधा मिळाव्यात, तसेच एसटीची सकारात्मक प्रतिमा अधिक बळकट करण्याचा प्रयत्न यामधून केला जाणार आहे. परिवहन खात्याचा पदभार प्रताप सरनाईक यांनी घेतल्यापासून अचानक भेटी देऊन बसस्थानकांची ते पाहणी करतात. त्यातून बसस्थानकात काही चुकीचे आढळले, अस्वच्छता आढळली तर अधिकाऱ्यांना धारेवर धरले जात आहे. त्यानुसार एसटी महामंडळाच्या मोहिमेंतर्गत बसस्थानकातील विविध विभागांतील स्वच्छता दर १५ दिवसांनी करण्यात येणार आहे. पिण्याच्या पाण्याच्या ठिकाणी स्वच्छता व नियमित देखभाल ठेवण्याच्या सूचनाही दिल्या आहेत. वास्तविक पाहता हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे स्वच्छ व सुंदर बसस्थानक स्पर्धेत स्वच्छतेला गुण दिले होते. यामध्ये स्वच्छतागृहाची स्वच्छता कितपत राखली जाते, यालाही गुण असल्याने विशेष लक्ष दिले जात होते. बसस्थानकात एकाच वेळी लाखो प्रवासी आलेले असतात. त्यामुळे कितीही इच्छा असली तरी स्वच्छता राखणे अवघड होत असते, पण ते राखण्याची खबरदारी घेतली जाणार आहे.

### ‘पेणमध्ये संवेदनशील मतदार केंद्र नाही’

**पेण :** एक काळ असा होता की, पेणमध्ये दादर, रावे, खरोशी, गडब, शिहू, या गावांकडे वक्र नजरेने पाहिले जायचे.



परंतु, नविन पिढीच्या तरूणांनी राजकारणातले छक्केपंज्जे ओळखून विचार सरणीत बदल केल्याने गेली कित्येक वर्ष पेण तालुक्यातील मतदान हे शांतता व सुव्यवस्थेला बांधा न पोहोचवता अतिशय शांततेत होत आहे. पेण तालुक्यामध्ये एकूण १९० मतदार केंद्र असून या मतदान केंद्रामध्ये एकही मतदार केंद्र संवेदनशील नाही, अशी माहिती प्रांताधिकारी प्रविण पवार यांनी पत्रकार परिषदेमध्ये दिली. पुढे त्यांनी माहिती देताना सांगितले की, पेणमध्ये एकूण ५ जिल्हा परिषद गट असून १० पंचायत समितीचे गण आहेत. त्यात जिल्हा परिषदेमध्ये जिते, दादर, वडखळ, महलमिरा डोंगर, शिहू असे गट असून पंचायत समितीमध्ये जिते, वाक्रुळ, रावे, दादर, वाशी, वडखळ, महलमिरा डोंगर, वडगाव, डोलवी, शिहू असे गण आहेत. यामध्ये एकूण १ लाख ३९ हजार ४७९ मतदार असून यामध्ये पुरूष ६९ हजार ५८१ तर स्त्रीया ६९ हजार ८९८ इतके आहेत. तसेच, यावेळी पुर्ण तालुक्यात आदर्श आचारसंहितेचे पालन करावे, असे अवाहन देखील करण्यात आले. या पत्रकार परिषदेसाठी प्रांताधिकारी प्रविण पवार, तहसिलदार तानाजी शेजाळ, नायब तहसिलदार प्रसाद कालेकर, नितिन परदेशी, तुषार कामत, पेण पंचायत समितीच्या गटशिक्षण अधिकारी शर्मिला शेंडे या उपस्थित होत्या.

### बांधकाम ठेकेदाराच्या खुनप्रकरणी कामगाराला जन्मठेपेची शिक्षा

**माणगाव-महाड :** बांधकाम ठेकेदाराचा निर्घृण खून केल्याप्रकरणी गवंडी कामगार जमिल मेहबुब शेख याला जन्मठेपेची शिक्षा व १ हजार रुपयांचा दंड ठोठावण्याचा महत्वपूर्ण निर्णय माणगाव सत्र न्यायालयाने दिला आहे. या निर्णयामुळे तब्बल आठ वर्षांपूर्वी घडलेल्या खुनाच्या घटनेला न्याय मिळाला आहे. ही घटना ५ एप्रिल, २०१८ रोजी महाड तालुक्यातील सुंदरवाडी नवीन बांधकाम सुरू असलेल्या इमारतीत घडली होती. या घटनेत बांधकाम ठेकेदार अन्सार बहादूर बेग यांचा निर्घृण खून झाला होता. जमिल मेहबुब शेख (५०) हा अन्सार बेग यांच्याकडे गवंडी म्हणून रोजंदारीवर काम करत होता. कामासाठी त्याने त्यांच्याकडून १३ हजार रुपये आगाऊ रक्कम घेतली होती. दरम्यान, जमिल शेख याने गावाकडे जाण्याची इच्छा व्यक्त केली असता, आधी घेतलेल्या रकमेच्या बदल्यातील काम पूर्ण करूनच जाण्याचा आग्रह अन्सार बेग यांनी धरला. यावरून दोघांत वाद होऊन धक्काबुक्की व मारामारी झाली. या वादातून संतप्त झालेल्या जमिल शेखने जवळील मोठा दगड उचलून बेग यांच्या उजव्या कानाजवळ डोक्यात जोरदार मारला. त्यातच त्यांचा जागीच मृत्यू झाला. याप्रकरणी जमिल शेख याच्या विरूद्ध महाड शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. या खटल्याची सुनावणी अति. जिल्हा व सत्र न्यायालय माणगाव येथे झाली- पोलिसांनी आरोपीच्या विरोधात कोर्टामध्ये भक्कम पुरावे सादर केले होते. अखेर माणगाव सत्र न्यायालयाने सर्व पुराव्याच्या आधारे सोमवारी (दि.१२) जमिल शेख यांना दोषी ठरविण्यात आले असून बुधवारी (दि.१४) शिक्षेवरील युक्तिवादानंतर शेख यांना जन्मठेप व १ हजार रुपयांचा दंड अशी शिक्षा सुनावली आहे. माणगाव सत्र न्यायालयाच्या या महत्त्वपूर्ण निकालाचे सर्वत्र अभिनंदन केले जात आहे.

# उमेदवारांचे भवितव्य महिलांच्या हाती

- अलिबागमध्ये दोन लाख मतदार बजावणार हक्क
- आगामी निवडणूकीसाठी प्रशासन सज्ज

**| रायगड | जिल्हा प्रतिनिधी |**

रायगड जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या निवडणूकीची रणधुमाळी सुरु झाली असून प्रशासकीय यंत्रणा आता कामाला लागली आहे. जिल्हा परिषदेच्या अलिबाग तालुक्यातील ७ आणि पंचायत समितीच्या १४ जागांसाठी निवडणूक होणार आहे. यावेळी २ लाख १ हजार ९२३ मतदार मतदानाचा हक्क दि.५ फेब्रुवारीला बजावणार आहेत. त्यामध्ये १ लाख ३ हजार ११७ महिला मतदारांचा समावेश आहे. त्यामुळे अगामी निवडणूकीत अलिबागमध्ये उमेदवारांचे भवितव्य महिलांच्या हाती असणार असल्याची माहिती समोर येत आहे.

रायगड जिल्हा परिषदेच्या ५९ व पंचायत समितीच्या ११८ जागांसाठी दि.५ फेब्रुवारी रोजी निवडणूक होणार आहे. त्यातील अलिबाग तालुक्यामध्ये शहापूर, आंबेपूर, आवास, थळ, चेंढरे, चौल व कावीर असे ७ जिल्हा परिषद गट आणि वैजाळी, शहापूर, आंबेपूर, रुईशेत भोमोली, आवास, किहीम, थळ, वरसोली, चेंढरे, आक्षी, रेवदंडा, चौल, काविर, रामराज असे १४ पंचायत समिती गण आहेत. जिल्हा परिषद गटातील शहापूर, आवास, चौल या ठिकाणी सर्वसाधारण, आंबेपूर व थळ येथे सर्वसाधारण महिला, कावीर येथे नागरिकांचा मागास प्रवर्ग व चेंढरे येथे नागरिकांचा मागास प्रवर्ग महिलांसाठी आरक्षण आहे. तसेच, अलिबाग पंचायत समिती गणातील वैजाळी, शहापूर, आंबेपूर, आक्षी, कावीर येथे सर्वसाधारण, किहीम, चेंढरे, चौल व रामराज येथे सर्वसाधारण महिला, रेवदंडा येथे नागरिकांचा मागास प्रवर्ग, वरसोली व आवास येथे नागरिकांचा मागास प्रवर्ग महिला, रुईशेत भोमोली येथे अनुसूचित जमाती व थळ येथे अनुसूचित जमाती महिला आरक्षण आहे. यावेळी जिल्हा परिषद ७ व पंचायत समितीच्या १४ जागांसाठी होणाऱ्या निवडणुकीत एकूण २ लाख १ हजार ९२३ मतदार मतदानाचा हक्क बजावणार आहेत. त्यामध्ये ९८ हजार ८०६ पुरुष व १ लाख ३ हजार १७ महिला मतदार आहेत. त्यामुळे अलिबागमधील जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या सदस्यपदांच्या जागांच्या निवडणुकीत पुरुष मतदारांपेक्षा महिला मतदारांची संख्या मोठ्या प्रमाणात आहे. त्यामुळे उमेदवारांचे भवितव्य महिलांच्या हाती असणार आहे. निवडणुकीच्या कामासाठी साधारणपणे १ हजार ४०० कर्मचारी असणार असल्याचे उपविभागीय अधिकारी यांच्याकडून सांगण्यात आले आहे. तसेच, या निवडणूकीत एका मतदाराला २ उमेदवारांना मतदान करावे लागणार आहे. त्यामध्ये जिल्हा परिषदेचा एक व पंचायत समितीचा एक असे प्रत्येकी दोन उमेदवार असणार आहेत.



### सखी, आदर्श मतदान केंद्र उभारणार

अलिबागमधील जिल्हा परिषद आणि पंचायत समिती गणांच्या निवडणूकीसाठी प्रशासन सज्ज झाले आहे. ५ फेब्रुवारीला सकाळी साडेसात ते सायंकाळी साडेपाच या कालावधीत मतदान होणार आहे. त्यासाठी २६१ केंद्रामध्ये मतदान होणार आहे. मतदानासाठी लागणारे इलेक्ट्रीक मतदान यंत्राचा ८६१ इतका साठा उपलब्ध आहे. त्यामध्ये कंट्रोल युनिट यंत्र २८७ व बॅलेट युनिट यंत्र ५७४ इतके आहे. मतदानाच्या दिवशी आदर्श मतदान केंद्र व सखी मतदान केंद्र उभारले जाणार आहेत. तसेच, ज्येष्ठ नागरिक व दिव्यांग मतदारांसाठी वेगळी रांग असणार आहे. तसेच, त्यांच्यासाठी व्हीलचेअर उपलब्ध करून देण्यात येणार असल्याची माहिती अलिबागचे उपविभागीय अधिकारी मुकेश चव्हाण यांनी दिली.

### दुबार मतदारांवर राहणार नजर

मतदान करताना कोणताही गैरप्रकार घडू नये, म्हणून दुबार मतदारांची माहिती घेण्यात आली आहे. राज्य निवडणूक आयोगाकडून अलिबाग तालुक्यात प्राप्त मतदार यादीमध्ये समान नावांची नोंद असलेल ९ हजार ९९ संभाव्य दुबार मतदार आढळून आले आहेत. त्यापैकी छायाचित्र समान असलेल्या मतदारांची पडताळणी केली असता त्यापैकी २ हजार २८२ मतदार दुबार आढळून आले आहेत. या मतदारांकडून जोडपत्र एक भरून घेण्यात येणार आहे. आतापर्यंत ९९ टक्के मतदारांकडून जोडपत्र एक भरून घेण्यात आले आहेत. या दुबार जोडत्रात मतदार कोणत्या केंद्रात मतदान करणार आहे, हे लिहून घेण्यात आले आहेत. त्यामुळे दुबार मतदारांवर नजर राहणार असल्याचे उपविभागीय अधिकारी मुकेश चव्हाण यांनी सांगितले.

## देशव्यापी रस्ता सुरक्षा उपक्रम



**| अलिबाग | प्रतिनिधी |**

होंडा मोटरसायकल अँड स्कूटर इंडिया यांनी अलिबाग येथे जागरूकता अभियानाच्या माध्यमातून आपला देशव्यापी रस्ता सुरक्षा उपक्रम राबविला. या अभियानात एस.एम. वाडके हायस्कूल, बाबासाहेब नजरे हायस्कूल आणि सरदार राव बहादूर तेंडुलकर विद्यालयातील २,४०० हून अधिक विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता.

या उपक्रमातून रस्त्यावरील सुरक्षिततेविषयी शिक्षण, संवाद आणि सामायिक जबाबदारी यासाठी एक खुले व्यासपीठ उपलब्ध करून देण्यात आले. या मोहिमेचा मुख्य उद्देश रस्त्यावरील वर्तन प्रत्यक्षात समजून घेणे हा होता. संरचित सत्रांद्वारे सहभागी विद्यार्थ्यांना सुरक्षित वाहनचालक पद्धतींची मूलतत्त्वे, वाहतूक शिस्तीचे महत्त्व तसेच दैनंदिन प्रवासात जागरूकतेची भूमिका यांची ओळख करून देण्यात आली. या सत्रांमधून रस्ता सुरक्षा ही केवळ नियमांची अंमलबजावणी नसून ती एक दैनंदिन सवय आहे, जी वैयक्तिक तसेच सामूहिक कल्याणावर परिणाम करते, अशी जाणीव सहभागी विद्यार्थ्यांमध्ये निर्माण करण्यात आली.



● मुरुड-गारंबी परिसरात भात झोडणीची कामे जोरात सुरू असून काही ठिकाणी झोडून रचून त्यावर बुजगावणे उभारले आहेत. (छायाचित्र : सुधीर नाझरे)

### पनवेलमध्ये परिषद संपन्न

**| पनवेल | प्रतिनिधी |**

पर्फ्युजनिस्ट परिवाराच्यावतीने आयोजित ‘एसीपीएमकॉन’ ही दोन दिवसीय परिषद पनवेल येथे संपन्न झाली. या परिषदेने हृदय शस्त्रक्रिया प्रत्यारोपण पर्यंतची संजीवन प्रणाली, वैद्यकीय क्षेत्रातील नवीन संकल्पना, ज्ञानवर्धक सत्रे आणि मनोरंजनाचा अनोखा संगम सादर करून सर्व सहभागींच्या मनावर अमिट छाप सोडली. परिषदेचे मुख्य आयोजक डॉ. विजय व्यवहारे, राजू दौड, किरण आंब्रे, अभय चव्हाण, विराज शिगवण, शशी काळे, श्रीमती कुलकर्णी, विजया लांजे, प्रशांत धुमाळ, अक्षय रेवडेकर, प्राची सोनवणे, वैशाली मेटे, अनंतू नायर, प्रशांत धुरिया, अभिलाष शेट्ये यांच्या नेतृत्वाखाली हा कार्यक्रम राबवण्यात आला.

## अंडरपास मोकळे करण्याची मागणी



**| नागोठणे | प्रतिनिधी |**

मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्गाच्या चौपदरीकरणाच्या कामाला नागोठण्यात सध्या वेग आला आहे. नागोठणे शहराच्या हद्दीतून जाणाऱ्या तिन्ही उड्डाण पुलांचे काम जोरात सुरू आहे. परंतु, असे असतांनाच या ठिकाणी वाहनचालकांना मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागत आहे.

महामार्ग चौपदरीकरण कामाचे ठेकेदार असलेल्या कल्याण टोल प्लाझाच्या अधिकाऱ्यांकडून काही महत्वाच्या ठिकाणी सर्व्हिस रोडवर गतिरोधक न उभारल्याने अपघाताचा धोका वाढला आहे. हायवे नाका येथील भारत पेट्रोलियम पंपासमोर तातडीने गतिरोधक उभारण्याची गरज निर्माण झाली आहे. तसेच, येथील खडक आळी भागातून महामार्गाच्या सर्व्हिस रोडवर येताना भरधाव वाहनांमुळे अपघाताचा धोका आहे. त्यामुळे येथील स्टेट बँकेच्या पुढील भागात असलेल्या सर्व्हिस रोडवरही पाहणी करून तेथे तत्काळ गतिरोधक उभारावा, अशी मागणी वाहनचालक व नागरिकांतून होत आहे. तसेच, नागोठण्यातील तिन्ही उड्डाण पुलांचे काम जोरात सुरू सर्व वाहने या उड्डाण पुलांच्या दोन्ही बाजूला असलेल्या सर्व्हिस रोडवरूनच जात आहेत. त्यामुळे महामार्गावरून नागोठणे शहरात येण्या-जाण्यासाठी असलेल्या अंडर पासमधून वाहनांना ये-जा करावी लागत आहे. मात्र, या तिन्ही अंडर पासमध्ये कार, मोटारसायकल, रिक्षा अशी वाहने उभी करून ठेवण्यात येत असल्याने वाहनांना अडथळा निर्माण होत आहे. तसेच, या ठिकाणी असलेल्या विविध व्यवसायाच्या टपऱ्या आता पुलाचे काम सुरू झाल्याने आता हटविण्यात याव्यात, जेणेकरून अंडर पासमधून जाणाऱ्या वाहनांना अडथळा निर्माण होणार नाही, अशी मागणीही वाहन चालकांतून होत आहे.

## आरक्षणाच्या गणितामुळे राजकीय कोंडी

- उमेदवारी जाहिर करण्यास विलंब
- आरक्षणाच्या आराखड्यामुळे पदाधिकारी अडचणीत

**| सुधागड-पाली | प्रतिनिधी |**

जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर गेल्या काही दिवसांपासून विविध तर्कवितर्कांना उधाण आले होते. मात्र, नुकतेच निवडणूक आयोगाने या निवडणूका जाहीर करून आचारसंहिता लागू केल्याने या चर्चांना आता पूर्णविराम मिळाला आहे. मात्र, निवडणुकीच्या तारखा जाहीर झाल्यानंतरही उमेदवारी जाहीर करण्यात सर्वच पक्षांकडून विलंब होत असल्याचे चित्र सध्या सुधागड तालुक्यात दिसून येत आहे.

या निवडणुकीत लागू झालेल्या आरक्षणाच्या नव्या आराखड्यामुळे अनेक अनुभवी नेते व विद्यमान पदाधिकारी अडचणीत सापडले आहेत. काहींना आपला पारंपरिक मतदारसंघ सोडून दुसऱ्या ठिकाणी प्रयत्न करावा लागत आहे, तर काहींची उमेदवारीच धोक्यात आली आहे. विशेषतः महिला, अनुसूचित जाती-जमाती व इतर मागासवर्गीय प्रवर्गासाठी लागू झालेल्या आरक्षणामुळे अनेक ठिकाणी पक्षांतर्गत नाराजी व दबाव गटांचे राजकारण उफाळून आले आहे. सुधागड तालुक्यातही याचे पडसाद उमटत असून, काही पक्षांमध्ये वरिष्ठ नेत्यांच्या निकटवर्तीयांना संधी मिळणार असल्याची चर्चा आहे. त्यामुळे पारंपरिक कार्यकर्ते व स्थानिक नेतृत्व यांच्यात अस्वस्थता निर्माण झाली आहे.

दरम्यान, अनेक नेते व कार्यकर्ते गेल्या अनेक वर्षांपासून आपल्या मतदारसंघात सातत्याने काम करत असून, आता आरक्षण बदलल्यामुळे त्यांना निवडणुकीपासून वंचित राहावे लागणार आहे. त्यामुळे या निवडणुकीत नव्या चेहऱ्यांना संधी मिळण्याची शक्यता असून, स्थानिक राजकारणात नव्या समीकरणांची नांदी होण्याची चिन्हे आहेत.

### खांदा वसाहतीत लोकशाहीचा आदर्श

**| पनवेल | प्रतिनिधी |**

पनवेल महानगरपालिकाच्या सार्वत्रिक निवडणुकीसाठी सुरू असलेली वीस दिवसांची प्रचाराची धामधूम गुरूवारी (दि.१५) मतदान संपल्यानंतर शांत झाली. खांदा वसाहत प्रभाग क्रमांक १५मध्ये सायंकाळी साडेपाच वाजता मतदान प्रक्रिया पूर्ण झाली. मतदानानंतर महायुती व महाविकास आघाडीतील सर्व उमेदवार व कार्यकर्ते सेक्टर ८ परिसरात एकत्र आले. यावेळी राजकीय मतभेद बाजूला ठेवत सर्वांनी गळाभेट घेत एकमेकांना शुभेच्छा दिल्या. प्रचारकाळात झालेले आरोप-प्रत्यारोप तिळगुळ देत संपुष्टात आले. खेळीमेळीच्या वातावरणात पार पडलेल्या या निवडणुकीत खांदा वसाहतीने वेगळा आदर्श घालून दिला.

**जिल्हा जांभळी मंजिरीने बहरला | अभ्यासक, निसर्ग प्रेमींची रेलचेल**

# निसर्गाचा अद्भुत सुगंधी आविष्कार

**| पाली/बेणसे | प्रतिनिधी |**

पाली-सुधागडसह जिल्ह्यातील बहुसंख्य शेतांमध्ये जांभळी मंजिरीची सुगंधी व आकर्षक फुले बहरली आहेत. निसर्गाचा हा अद्भुत आविष्कार पाहण्यासाठी अनेक अभ्यासक व निसर्ग प्रेमींची रेलचेल पहायला मिळत आहे. तर, अनेकांना हा निसर्गाचा सुगंधी चमत्कार वाटत आहे.

जांभळी मंजिरी ही पाण वनस्पती असून हिचे शास्त्रीय नाव पोगोस्टेमॉन डेक्कनेनसिस असे आहे. सुप्रसिद्ध कास पठारावर ही मुबलक प्रमाणात आढळते. परंतु, त्याठिकाणी तिचा फुलोरा सप्टेंबर ते ऑक्टोबर या महिन्यात येतो. तर, कोकणात आढळणारी जांभळी मंजिरी भात कापणी झाल्यावर रुजून येते आणि फुलोरा नोंव्हेबर व डिसेंबर महिन्यात येता. या वनस्पतींचा अधिवास वेगळा असल्याने हा बदल होतो. जिल्ह्यात सुद्धा सड्यावर होणारी मंजिरी लवकर फुलते, असे प्रसिद्ध निसर्ग अभ्यासक प्रवीण कवळे यांनी कृषीवलच्या प्रतिनिधीशी बोलताना सांगितले.

संपूर्ण शेत किंवा शेताच्या काही भागावर फुलेली ही मनमोहक फुले पाहून शेताने जांभळ्या रंगाची झालरच पांघरल्या सारखे वाटते. तसेच, आजूबाजूच्या परिसरातही मंजिरीचा सुवास दरवळत असतो. जांभळ्या मंजिरीचा हा अद्भुत नजारा काही दिवसच पहायला मिळतो. सकाळी धुक्याचे दवबिंदू या फुलांवर पडल्यावर ते अधिकच आकर्षक व खुलून दिसतात.



### सुगंधी तेल व अत्तर

जांभळ्या मंजिरीची झाडे सुगंधी द्रव्याने युक्त असतात. त्यामुळे यापासून वेगवेगळी सुगंधी तेल काढली जातात. तसेच, सुगंधी द्रव्य बनविण्यासाठी देखील वापरले जाते.

### जिल्ह्यात मंजिरी वाढतेय

जिल्ह्यात जांभळी मंजिरीचे प्रमाण जास्त जाणवू लागले आहे. त्यांची दोन तीन कारणे आहेत. पहिले म्हणजे ती पूर्वीपासून आहेच, परंतु कास पठार प्रसिद्ध झाल्यापासून अनेकजण तिला आवर्जून बघायला लागले. दुसरे कारण म्हणजे जिल्ह्यात शेती करण्याच्या पद्धती बदलत चालल्या आहेत. पूर्वी बहुतांश शेतकरी भात पीक घेतल्यानंतर दुबार पीक घ्यायचे. त्यासाठी पुन्हा नांगरट करावी लागायची. त्यामुळे बऱ्याच प्रमाणात मंजिरी नष्ट व्हायची. मात्र, अलीकडे पडीक शेतीचे प्रमाण सुद्धा वाढत आहे. त्यामुळे मंजिरीचे क्षेत्र वाढत आहे, असे निसर्ग अभ्यासक प्रवीण कवळे यांनी सांगितले.

> “हा निसर्गाचा एक मनमोहक आविष्कार आहे. ठराविक कालावधीतच आणि विशिष्ट शेतांमध्येच जांभळी मंजिरी फुललेली दिसते. पर्यावरणाच्या साखळीमध्ये तिचेही काही योगदान आहे. जांभळ्या मंजिरीच्या प्रजातीचे संरक्षण होणे आवश्यक आहे. या हंगामात हमखास ही फुले पाहण्यासाठी या ठिकाणी येतो. शाळकरी मुलांनी देखील अशा ठिकाणी भेट देणे आवश्यक आहे.”
>
> – अमित निंबाळकर, कृषी व वनस्पती अभ्यासक

**Hiring Walk In Interview**

Company name:- InvoSolar Energy Pvt Ltd
Designation:- Sales Executive
Product:- Solar Panel
Location:- Alibag
Gender:- Male / Female
Equipment needed:- Two Wheeler and Mobile
Qualification:- 12th pass
Petrol allowance:- 5k
Fixed Salary:- 15k
Experience:- 1 year in corporate Sales.

Contact : Mejanoor Shaikh - 8268696332
Nikhil chavan - 9881401550

Send your CV at:-shaikhmejanoor007@gmail.com

ADDRESS:-SUKHSAGAR BHAVAN, 2ND FLOOR, OPPOSITE AMBEDKAR STATUE, ALIBAG, RAIGAD - 402201

# उद्या पुन्हा हाच खेळ?

महापालिका निवडणुकांचा प्रचार संपत असतानाच राज्यातील जिल्हा परिषदांच्या निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर करण्यात आला आहे. वास्तविक याही निवडणुका ३१ जानेवारीच्या पूर्वी करणे अपेक्षित होते. पण अनेक जिल्हा परिषदांमध्ये आरक्षणाची ५० टक्क्यांची मर्यादा ओलांडली गेल्याने त्यांचे प्रकरण पुन्हा सर्वोच्च न्यायालयात गेले. न्यायालयाने अनेकदा बजावूनही आरक्षण ५० टक्क्यांच्या वर नेणाऱ्या अधिकाऱ्यांवर खरे तर कारवाई करायला हवी. असो. येत्या काही दिवसात इतके दिवस पालिकांच्या निमित्ताने मुंबई, पुणे, नाशिक, नागपूर अशा शहरांपुरता मर्यादित असलेला प्रचार आता खेड्यापाड्यात जाईल. असे एकूण सुमारे चार महिने या निवडणुकीच्या भानगडीत गेले आहेत. त्या काळात आचारसंहितेचे कारण पुढे करून राज्य सरकारचा कारभार स्थगित आहे. सगळे मंत्री प्रचारात व्यग्र आहेत. आता पुढचा एक महिना ही अशीच स्थिती राहील. राजकारणाचे म्हणाल तर पालिका निवडणुकीत जे दिसले तसेच किंवा त्याहूनही एक पाऊल पुढे अशा आपसातल्या हाणामाऱ्या दिसण्याची शक्यता आहे. आज शिक्षण, आरोग्य व पाणी या संदर्भातील बऱ्याच योजना जिल्हा परिषदांमार्फत राबवल्या जात असतात. त्यांना किंवा खाली पंचायत समित्या व ग्रामपंचायतींना थेट निधी येतो. यावर कबजा करण्यासाठी ही तुंबळ लढाई होणार आहे. नेहमीप्रमाणे सर्व काही मला हवे ही भाजपची वृत्ती इथेही दिसून येणार आहे. त्यामुळे आम्ही महायुती म्हणून लढू असे कितीही दावे झाले तरी तिथेही फाटाफूट व एकमेकांचेच पतंग काटण्याची स्पर्धा दिसणार आहे. विधानसभा निवडणुतील चित्र पाहिले तर विदर्भ आणि मराठवाड्याच्या अनेक भागात शिंदे यांच्या शिवसेनेचा प्रभाव दिसला. कोकणावरही त्यांचे वर्चस्व दिसून आले. यात अर्थातच एकनाथ शिंदे यांचे कर्तृत्व कमी आणि मूळ बाळासाहेब ठाकरे यांची पुण्याई जास्त आहे. शिंदे यांच्याकडे सत्ता असल्याने आणि अनेक मार्गांने ते पैसे वाटप करीत असल्याने कार्यकर्ते सध्या त्यांच्या बाजूला आहेत. पण प्रत्येक जाहिरातीत आणि प्रत्येक सभेत बाळासाहेबांपेक्षाही मोदींच्या नावाचा जयजयकार करणारी ही सेना आहे. ती भाजपमध्ये अजूनही का विलीन झालेली नाही याचे उत्तर कोणीही देऊ शकणार नाही.

## आता कुठे आहे इडी

पालिकांमध्ये मुंबईमध्ये शिवसेना व भाजपमध्ये युती झाली. पण पिंपरीत अजितदादा अधिक शिंदे विरुध्द भाजप अशी लढाई आहे. इतर ठिकाणी हे तिघेही एकमेकांविरुध्द लढत आहेत. प्रचारामध्ये यांनी एकमेकांचे कपडे काढायचेच बाकी ठेवले होते. पुणे व पिंपरी चिंचवडमध्ये दादांनी भाजपवर भ्रष्टाचाराचे आरोप केले. त्याला भाजप उत्तर देऊ शकला नाही. म्हणून दादांच्या पक्षाला सल्ला देणाऱ्या डिझाईन बॉक्स या संस्थेच्या तपासणीसाठी क्राईम ब्रँचचे अधिकारी पाठवण्यात आले. दादांच्या भानगडी बाहेर काढण्याची ही अप्रत्यक्ष धमकी होती. याला उत्तर म्हणून दादांनी शेवटच्या दिवशी पुरंदरमध्ये एका सिंचन योजनेचा खर्च भाजपच्या दबावामुळे शंभर कोटींनी वाढवण्यात आला होता असा आरोप केला. हे प्रकरण पंचवीस वर्षांपूर्वीचे आहे. ते दादांना आता अचानक आठवले ही गंमत आहे. पण त्यांनी केलेला आरोप गंभीर आहे. पक्षासाठी निधी द्यायचा असल्याने ही वाढ करण्यात आल्याचे आपल्याला एका पाटबंधारे खात्यातील अधिकाऱ्यानेच सांगितले व त्याच्या फाईलचे पुरावे आहेत असे दादांनी सूचित केले. आता निवडणुकीचे निकाल आले की त्याच्या चर्चेत हे प्रकरण वाहून जाईल. खरे तर शंभर कोटींचे प्रकरण असेल तर इडीने तात्काळ इकडे धाव घ्यायला हवी. पण तसे होणार नाही. शिवाय, हा निव्वळ एकमेकांना पिस्तुल दाखवून धमकावण्याचाच प्रकार असल्याने कोणालाच त्याची तड लावण्यात रस नसेल. आता जिल्हा परिषदांना तर हे पक्ष तर एकमेकांविरुध्द उभे ठाकतीलच, पण पक्षातलेच गटही मारामारीवर उतरतील. पुन्हा देवेंद्र फडणवीस, एकनाथ शिंदे वगैरेंचे प्रचारदौरे आणि लाडकी बहीण योजना बंद होणार नाही याचा जप आपल्याला सहन करावा लागेल. मुंबई पालिका निवडणुकीवर सगळ्या देशाचे लक्ष असल्याने मिडियाने त्यात फार रस घेतला. आता जिल्हा परिषदांच्या भानगडी मिडियासाठी गावपातळीवरच्या बातम्या असतील. त्यातही फडणवीस, शिंदे किंवा अजितदादांच्या सभा दाखवल्या जातील. पण विरोधकांना तितकेसे स्थान मिळणार नाही.

## पैशांचा पाऊस

दरम्यान, पालिकेच्या मतदानाच्या आदल्या दिवशी म्हणजे बुधवारी ज्या रीतीने पैशांचे वाटप झाले ते भयानक आहे. लोकसभा किंवा विधानसभेला निवडणूक आयोग पैशांवर ठेवून होता असे सांगितले जात होते. काही ठिकाणी रोख रकमा पकडण्यात आल्या होत्या. काल मात्र खुलेआम मतदारांच्या स्लिप वाटत असताना पाकिटांमधून एक ते पाच हजार रुपये दिले जात होते. पण निवडणूक आयोग किंवा पोलिसांनी कुठेही कारवाई केली नाही. पैसे वाटपाबाबत शिंदे गट व भाजप यांचेच नाव अधिक येत होते. त्यातही नवी मुंबईसारख्या ठिकाणी हे एकमेकांच्या विरुध्दच तक्रारी करत असल्याने हे किती चोऱ्या करतात हे जनतेसमोर आले. दुर्दैवाने मनसे, ठाकरे सेना इत्यादींनी तक्रारी करूनही त्यांची काहीही दखल घेतली गेलेली नाही. जिल्हा परिषदेला तर हा प्रकार आणखी बोकाळण्याचा धोका आहे. कारण मुंबई, पुण्यातले प्रकार लगेच टीव्हीवर येतात. इथे गावागावातल्या भानगडी समोर येणे कठीण आहे. खुद्द मतदानाच्या दिवशी गुरुवारी असंख्य गोंधळ समोर आले. यंदा मतदानकेंद्रे मोठ्या प्रमाता बदललेली होती. त्यामुळे मतदारांचा गोंधळ उडाला. खुद्द गणेश नाईकांना आपले नेहमीचे मतदानकेंद्र न सापडल्याने एक तास ते शोधत होते असे म्हणतात. याखेरीज मतदारांची नावे गायब असणे किंवा दुसऱ्याच वॉर्डात टाकलेली असणे, एकाच घरातल्या लोकांचे मतदान वेगवेगळ्या ठिकाणी व वेगळ्या वॉर्डात असणे असे पराक्रमही निवडणूक आयोगाने केलेले दिसले. या सगळ्याची चर्चा त्या दिवसापुरती होते. नंतर निकाल लागले की हे सगळे विसरले जाते. पण जिल्हा परिषदेची तयारी करणाऱ्या पक्षांना हे विसरून चालणार नाही. त्यांना यासाठी कार्यकर्त्यांना जय्यत तयार ठेवावे लागेल. यापूर्वी नगरपालिका निवडणुका भाजपने प्रचंड बहुमताने जिंकल्या आहेत. महापालिकांमध्येही त्याचेच वर्चस्व असेल असे वाटते. या स्थितीत विरोधकांपुढे भाजपला तोंड देण्याचे आव्हान मोठे असेल. मुंबईमध्ये मराठी वाचवण्याचा मुद्दा प्रभावी ठरला होता. तसाच आता महाराष्ट्र वाचवण्याचा मुद्दा पुढे आणून विरोधकांनी एकदिलाने लढा दिला तर भाजपशी मुकाबला करणे शक्य आहे. भाजप, शिंदे व दादा यांना पैशांची मस्ती व सत्तेचा माज कसा आला आहे हे गेल्या काही दिवसांपासून दिसत आहे. जनताही हे पाहत असते. विरोधक ही मस्ती उतरवू शकतील असा भरवसा वाटला तर जनता नक्की त्यांच्यावर विश्वास टाकेल. मात्र विरोधकांनी आतापासूनच नीट कंबर कसून कामाला लागायला हवे. उद्या पुन्हा हाच खेळ हे चित्र महाराष्ट्रात आता बदलायलाच हवे आहे.

विचार

# आकडे अर्थसंकल्पाचे आणि राजकोषीय तुटीचे

***एव्हाना देशाला अर्थसंकल्पाचे वेध लागले आहेत. त्याबाबतची तयारी शासकीय पातळीवर जोरात सुरु आहे. ही झाली पहिली लक्षवेधी बातमी. दरम्यान, किरकोळ इंधन बाजारात भारत जगात तिसरा असल्याची बातमी आणि तशी आकडेवारी उपलब्ध झाली आहे. याच सुमारास केंद्र सरकारची राजकोषीय तूट दहा लाख कोटी रुपयांवर पोहोचल्याची महत्वपूर्ण माहिती पुढे आली आहे.***



**महेश देशपांडे**

एव्हाना देशाला अर्थसंकल्पाचे वेध लागले आहेत. त्याबाबतची तयारी शासकीय पातळीवर जोरात सुरु आहे. ही झाली पहिली लक्षवेधी बातमी. दरम्यान, किरकोळ इंधन बाजारात भारत जगात तिसरा असल्याची बातमी आणि तशी आकडेवारी उपलब्ध झाली आहे. याच सुमारास केंद्र सरकारची राजकोषीय तूट दहा लाख कोटी रुपयांवर पोहोचल्याची महत्वपूर्ण माहिती पुढे आली आहे.

केंद्रीय अर्थसंकल्प २०२६-२७ बाबत चर्चा तीव्र झाल्या आहेत. संसदीय परंपरेनुसार २०१७ पासून दरवर्षी १ फेब्रुवारी रोजी केंद्रीय अर्थसंकल्प सादर करण्याची परवानगी आहे. या वर्षी १ फेब्रुवारी हा दिवस रविवारी येणार आहे. अर्थमंत्री निर्मला सीतारमण त्या दिवशी अर्थसंकल्प सादर करू शकतात, अशी अपेक्षा आहे. दरम्यान, देशाचे अर्थसंकल्प प्रत्यक्षात कोण तयार करते आणि त्याची प्रक्रिया काय आहे याबद्दल प्रश्न उपस्थित केले जात आहेत. केंद्रीय अर्थसंकल्प तयार करण्यासाठी आर्थिक व्यवहार विभाग पूर्णपणे जबाबदार आहे. हा विभाग अर्थ मंत्रालयाच्या अंतर्गत काम करतो. हा विभाग मध्यवर्ती भूमिका बजावत असला, तरी ही प्रक्रिया अत्यंत सहयोगी आहे. नीती आयोग आणि विविध प्रशासकीय मंत्रालयांसारख्या संस्था डेटा, अंदाज आणि धोरणात्मक माहिती प्रदान करतात. अर्थसंकल्प तयार करण्याची औपचारिक प्रक्रिया सप्टेंबर किंवा ऑक्टोबरच्या आसपास सुरू होते. अर्थ मंत्रालय सर्व केंद्रीय मंत्रालये, विभाग आणि अगदी राज्य सरकारांना एक परिपत्रक जारी करते. त्यामध्ये त्यांना आगामी आर्थिक वर्षासाठी खर्चाचे अंदाज आणि आर्थिक आवश्यकता सादर करण्यास सांगितले जाते. हे अंदाज बजेट फ्रेमवर्कचा पाया तयार करतात.

प्रस्ताव प्राप्त झाल्यानंतर, अर्थ मंत्रालयाचे वरिष्ठ अधिकारी त्यांचा काळजीपूर्वक आढावा घेतात. त्यानंतर अर्थमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली सल्लामसलत होते. बँकिंग, उद्योग, कृषी, कामगार संघटना आणि अर्थतज्ज्ञांच्या प्रतिनिधींना या बैठकीला आमंत्रित केले जाते. सल्लामसलत केल्यानंतर, अर्थ मंत्रालय प्रत्येक विभागासाठी महसूल अंदाज, खर्च मर्यादा आणि वाटप अंतिम करते. हे निर्णय राजकोषीय शिस्त, आर्थिक प्राधान्ये आणि विकास उद्दिष्टे यांच्याद्वारे निश्चित केले जातात. अंतिम टप्प्यात पंतप्रधानांशी चर्चा केली जाते. अर्थसंकल्पीय कागदपत्रे छापण्यापूर्वी, नॉर्थ ब्लॉकमध्ये पारंपारिक हलवा समारंभ आयोजित केला जातो. ही अर्थसंकल्पीय तयारीच्या शेवटच्या आणि सर्वात गुप्त टप्प्याची सुरुवात असते. त्यानंतर, अर्थसंकल्प तयार करण्यात आणि छपाई करण्यात गुंतलेल्या अधिकाऱ्यांचा बाह्य जगाशी संपर्क तुटतो. त्यानंतर, संविधानाच्या कलम ११२ अंतर्गत, अर्थमंत्री लोकसभेत केंद्रीय अर्थसंकल्प सादर करतात. संसदेच्या मान्यतेशिवाय सरकार भारताच्या एकत्रित निधीतून पैसे काढू शकत नाही. यामुळे हे सादरीकरण घटनात्मकदृष्ट्या महत्त्वाचे बनते. संसदेची मान्यता मिळाल्यानंतर, नवीन आर्थिक वर्षासाठी सरकारी खर्च कायदेशीररित्या सुरू होतो.

आता एक दखलपात्र बातमी. देशात २०१५ पासून पेट्रोल पंपांची संख्या दुप्पट झाली आहे. एव्हाना ती एक लाखाहून अधिक झाली आहे. सार्वजनिक क्षेत्रातील इंधन विक्रेत्यांनी बाजारपेठेतील हिस्सा राखण्यासाठी आणि ग्रामीण तसेच महामार्ग भागात इंधनाची उपलब्धता वाढवण्यासाठी त्यांचे पेट्रोल पंप वेगाने वाढवले आहेत. त्यामुळे भारत हा जगातील तिसरा सर्वात मोठा इंधन किरकोळ बाजार बनला आहे. पेट्रोलियम मंत्रालयाअंतर्गत येणाऱ्या पेट्रोलियम नियोजन आणि विश्लेषण कक्षाच्या आकडेवारीनुसार, नोव्हेंबरअखेर देशात एक लाख २६६ पेट्रोल पंप होते. अमेरिका आणि चीननंतर ही तिसरी सर्वात मोठी संख्या आहे. इंडियन ऑइल कॉर्पोरेशन (आयओसी), भारत पेट्रोलियम कॉर्पोरेशन लिमिटेड (बीपीसीएल) आणि हिंदुस्तान पेट्रोलियम कॉर्पोरेशन लिमिटेड (एचपीसीएल) सारख्या सार्वजनिक क्षेत्रातील कंपन्यांकडे ९० टक्क्यांपेक्षा जास्त पंप आहेत. देशात मोठ्या प्रमाणात इंधनाचा वापर होत आहे. त्यामुळे पेट्रोल पंपांची संख्या वाढत आहे. रशियाची रोझनेफ्ट-समर्थित नायरा एनर्जी लिमिटेड हा सर्वात मोठा खासगी इंधन किरकोळ विक्रेता आहे. या कंपनीचे ६९२१ पेट्रोल पंप आहेत. रिलायन्स इंडस्ट्रीज लिमिटेड आणि बीपी यांच्या संयुक्त उपक्रमाचे २११४ पेट्रोल पंप आहेत. शेलचे ३४६ पेट्रोल पंप आहेत. पीपीएसी डेटानुसार २०१५ मध्ये पेट्रोल पंप नेटवर्क ५०४५१ स्टेशनवरून जवळजवळ दुप्पट झाले आहे. त्या वर्षी, खासगी कंपन्यांच्या मालकीचे २९६७ पेट्रोल पंप एकूण बाजारपेठेच्या अंदाजे ५.९ टक्के होते. सध्या, ते एकूण बाजारपेठेच्या ९.३ टक्के आहेत.

भारत हे जगातील तिसऱ्या क्रमांकाचे पेट्रोल पंप नेटवर्क आहे. अमेरिकेत सर्वात मोठे नेटवर्क आहे. अमेरिकेत पेट्रोल पंपांच्या संख्येबद्दल कोणतेही अधिकृत आकडे उपलब्ध नाहीत; परंतु २०२४ च्या अहवालानुसार देशातील किरकोळ पेट्रोल पंपांची संख्या एक लाख ९६ हजार ६४३ होती, तेव्हापासून काही पंप बंद झाले आहेत. गेल्या वर्षी चीनसाठीच्या एका अहवालात पेट्रोल पंपांची संख्या एक लाख १५ हजार २२८ असल्याचे म्हटले आहे. 'सिनोपेक'च्या वेबसाइटवरील माहितीनुसार तीस हजारांहून अधिक कार्यरत पेट्रोल पंपांसह ते चीनमधील सर्वात मोठे इंधन किरकोळ विक्रेते आहे. 'चायना पेट्रोकेमिकल कॉर्पोरेशन' (सिनोपेक) आकाराने मोठे असले, तरी भारतीय बाजारपेठेतील आघाडीच्या 'आयओसी'च्या ४१ हजार ६६४ पेट्रोल पंपांच्या तुलनेत त्यांच्या पेट्रोल पंपांची संख्या कमी आहे. 'बीपीसीएल'चे नेटवर्क २४ हजार ६०५ स्टेशन्ससह दुसऱ्या क्रमांकावर आहे. 'एचपीसीएल' २४ हजार ४१८ पेट्रोल पंपांसह त्यानंतर आहे.

दरम्यान, नोव्हेंबरअखेरीस केंद्र सरकारची राजकोषीय तूट नऊ लाख ७६ हजार कोटींवर पोहोचली आहे. ती २०२५-२६ या आर्थिक वर्षाच्या वार्षिक अर्थसंकल्पीय उद्दिष्टाच्या ६२.३ टक्के आहे. गेल्या वर्षी याच कालावधीमध्ये ती ५२.५ टक्के होती. सरकारने चालू आर्थिक वर्षासाठी राजकोषीय तूट एकूण देशांतर्गत उत्पादनाच्या (जीडीपी) ४.४ टक्के किंवा १५ लाख ६९ हजार कोटी असण्याचा अंदाज व्यक्त केला आहे. नियंत्रक आणि महालेखा परीक्षक (सीएजी) च्या आकडेवारीनुसार, नोव्हेंबर २०२५ पर्यंत केंद्र सरकारचे एकूण उत्पन्न १९ लाख ४९ हजार कोटी रुपये होते. ते एकूण अर्थसंकल्पीय अंदाजाच्या ५५.७ टक्के आहे. यापैकी १३ लाख ९४ हजार कोटी कर महसुलातून, पाच लाख १६ हजार कोटी करबाह्य महसुलातून आणि ३८ हजार ९२७ कोटी रुपये कर्ज नसलेल्या भांडवली पावत्यांमधून आले. याच कालावधीत, केंद्र सरकारने राज्यांना करांचा वाटा म्हणून नऊ लाख ३६ हजार कोटी रुपये हस्तांतरित केले. ते गेल्या वर्षीच्या तुलनेत एक लाख २४ हजार कोटी रुपयांनी वाढले आहे.

नोव्हेंबरपर्यंत केंद्र सरकारचा एकूण खर्च २९ लाख २६ हजार कोटी रुपये होता. तो वार्षिक अर्थसंकल्पीय अंदाजाच्या ५७.८ टक्के आहे. त्यात २२ लाख ६७ हजार कोटी रुपये महसूल खर्च आणि सहा लाख ५८ हजार कोटी रुपये भांडवली खर्च समाविष्ट आहे. व्याज देयकांमध्ये महसूल खर्चाचा सर्वात मोठा वाटा होता. तो सात लाख ४५ हजार कोटी रुपये होता, तर अनुदानांचा वाटा दोन लाख ८८ हजार कोटी होता. 'आयसीआरए'च्या मुख्य अर्थशास्त्रज्ञ अदिती नायर म्हणाल्या, की चालू आर्थिक वर्षात केंद्र सरकारचा एकूण कर महसूल बजेट अंदाजापेक्षा अंदाजे दीड लाख कोटी रुपयांनी कमी पडण्याची शक्यता आहे; परंतु ही तूट सुधारित कर-नसलेले महसूल कामगिरी आणि महसुली खर्चातील बचतीद्वारे भरून काढता येते. त्यामुळे सध्याच्या वित्तीय तूट लक्ष्यापेक्षा जास्त होण्याचा धोका मर्यादित राहतो.

# डिजिटल जगात वाढतेय माहिती प्रदूषण

**सुयोग आंग्रे**

डिजिटल युगाने माहितीचा महापूर आणला आहे. दर सेकंदाला लाखो मजकूर, ऑडिओ, व्हिडिओ आणि इमेज पोस्ट जगभरात पसरत आहेत. इंटरनेटमुळे माहिती अभूतपूर्वपणे उपलब्ध झाली आहे. या अभूतपूर्व गतीने 'माहिती प्रदूषणा'चा गंभीर धोकाही निर्माण झाला आहे, कारण सध्याच्या काळात सत्यासोबतच खोट्या, अपूर्ण आणि अनावश्यक माहितीचे प्रमाणही सातत्याने वाढत आहे, त्यामुळे सत्य आणि असत्य यात फरक करणे जवळपास अशक्य झाले आहे.

ही चुकीची माहिती, डिसइन्फॉर्मेशन आणि चुकीची माहिती असे समजले जाते. वर्ल्ड इकॉनॉमिक फोरमच्या जागतिक जोखीम अहवाल-२०२५ नुसार, चुकीची माहिती आणि चुकीची माहिती देणारे मुद्दे सलग दुसऱ्या वर्षी अल्पकालीन जागतिक जोखमींमध्ये अव्वल आहेत. हा धोका समाजातील एकता, प्रशासन आणि लोकांमधील परस्पर विश्वासाला गंभीरपणे कमी करत असल्याचे अहवालात दिसून आले आहे. जागतिक स्तरावर ही समस्या इतकी गंभीर बनली आहे की अनेक तज्ञ याला लोकशाहीसाठी सर्वात मोठा धोका मानतात. अशा धोक्याचे उदाहरण म्हणजे ग्रोक ए आय द्वारे उत्पन्न केलेली अश्लील सामग्री. याकडे लक्ष केंद्रित करणे गरजेचे बनले आहे.

एका अभ्यासानुसार, जगभरातील ८६ टक्के लोक कधीतरी चुकीच्या माहितीच्या संपर्कात आले आहेत. इंटरनेट मीडियावर शेअर केलेला ४० टक्के कंटेंट बनावट मानला जातो. ऑनलाइन उपलब्ध असलेल्या सर्व सामग्रीपैकी, ६२ टक्के अविश्वसनीय किंवा खोटे असण्याची शक्यता आहे. २०१९ पासून बनावट व्हिडिओ आणि बनावट आवाजात ५५० टक्क्यांहून अधिक वाढ झाली आहे. एका अंदाजानुसार, २०२५ मध्ये सोशल मीडियावर सुमारे ८० लाख बनावट व्हिडिओ शेअर केले गेल्याचे सर्वश्रुत आहे.

भारत या समस्येचे सर्वात मोठे केंद्र बनले आहे. वर्ल्ड इकॉनॉमिक फोरमच्या २०२४ आणि २०२५ च्या अहवालांमध्ये चुकीच्या माहितीचा आणि जाणीवपूर्वक चुकीच्या माहितीचा सर्वाधिक धोका असलेला देश म्हणून भारताला सातत्याने स्थान देण्यात आले आहे. २०२५ च्या सुरुवातीला भारतात सुमारे ८०६ दशलक्ष इंटरनेट वापरकर्ते होते, जे एकूण लोकसंख्येच्या ५५.३ टक्के होते. २०२५ मध्ये ही संख्या ९० कोटींच्या पुढे जाईल. एवढ्या मोठ्या डिजिटल लोकसंख्येमुळे भारतात 'माहिती प्रदूषणाचा' प्रभाव अनेक स्तरांवर दिसून येत आहे. याचा निवडणुकांवर प्रभाव पडतो, सामाजिक सलोखा भंग होतो आणि हिंसाचाराला उत्तेजन मिळते. भारतातील 'माहिती प्रदूषणाचा' सर्वात मोठा स्त्रोत म्हणजे डिजिटल मीडिया. २०२३ च्या अहवालानुसार, ६४ टक्के चुकीची माहिती व्हॉट्सअ‍ॅपवर पसरवली जाते, त्यानंतर फेसबुकवर १८ टक्के आणि व्हॉट्सअ‍ॅपवर १२ टक्के चुकीची माहिती पसरवली जाते. इंटरनेट मीडियावर पसरलेल्या ७७.४ टक्के खोट्या बातम्या डिजिटल माध्यमांतून येतात, २३ टक्के मुख्य प्रवाहातील संवाद माध्यमांतून आणि उर्वरित इतर माध्यमांतून येतात. या बनावट पोस्टपैकी सर्वाधिक ४६ टक्के राजकीय आहेत. त्यानंतर ३३.६ टक्के लोक सामान्य मुद्द्यांवर आणि १६.८ टक्के धार्मिक विषयांवर लक्ष केंद्रित करतात. या तिघांना एकत्र घेतल्यास, इंटरनेट मीडियावर फेक न्यूजचा वाटा ९६.४ टक्के आहे. राजकीय बनावट बातम्या निवडणुकीत सर्वात धोकादायक ठरतात. २०२४ च्या लोकसभा निवडणुकीत एआय उत्पन्न सामग्रीचा वापर अभूतपूर्व पातळीवर होता. मतदारांना पाच कोटींहून अधिक कृत्रिम व्हॉईस कॉल्स देण्यात आले. २०२५ मध्येही हा ट्रेंड कायम राहील. बिहार विधानसभा निवडणुकीत एआयने तयार केलेले बनावट व्हिडिओ, बनावट ऑडिओ आणि वैयक्तिक संदेशांचा मोठ्या प्रमाणात वापर करण्यात आला. निवडणूक आयोगाने एआय ओळखण्याच्या सूचना दिल्या, परंतु डझनभर तक्रारी असूनही बहुतांश बनावट सामग्री आढळून आली नाही. माहिती प्रदूषणाचे परिणाम विनाशकारी आहेत. धार्मिक आणि जातीय आधारावरील बनावट व्हिडिओ दंगली भडकवतात आणि निवडणुकीदरम्यान मतदारांची दिशाभूल करतात. जागतिक स्तरावर, जाणूनबुजून चुकीच्या माहितीमुळे शेअर बाजारातील अस्थिरता आणि फसवणूक यासह दरवर्षी अंदाजे ७८ अब्ज डॉलरचे नुकसान होण्याचा अंदाज आहे. त्यामुळे वैयक्तिक पातळीवर लोकांचा सत्यावरील विश्वास कमी होतो, निर्णय घेणे अवघड होऊन मानसिक आरोग्यावर परिणाम होतो. या समस्येचे निराकरण बहु-स्तरीय असावे. सर्वप्रथम, वैयक्तिक पातळीवर डिजिटल साक्षरता महत्त्वाची आहे. प्रत्येक माहितीची चौकशी व्हायला हवी. डिजिटल मीडिया प्लॅटफॉर्मने एआय-आधारित शोध आणि तथ्य तपासणी मजबूत केली पाहिजे. यासंदर्भात निवडणूक आयोगाची मार्गदर्शक तत्त्वे अस्तित्वात आहेत, परंतु अभिव्यक्ती स्वातंत्र्यावर अंकुश न ठेवता त्यांची काटेकोरपणे अंमलबजावणी करणे आवश्यक आहे. ही समस्या थांबवण्यात तथ्य तपासणाऱ्या संस्था महत्त्वाची भूमिका बजावत आहेत. शिक्षण विभागाने डिजिटल साक्षरता हा विषय शाळा-कॉलेज स्तरावर सक्तीचा करावा. माहितीच्या प्रदूषणावर वेळीच नियंत्रण ठेवता आले नाही, तर सत्याच्या जागी असत्य, विश्वासाच्या जागी संशय आणि सौहार्दाच्या जागी द्वेषाचा विजय होईल. इंटरनेटने जग जोडले आहे, पण आता ते स्वच्छ ठेवणे ही प्रत्येकाची जबाबदारी आहे.

लोकसंसद

## लोकशाहीचा उद्वेग; 'हेचि काय फळ मम तपाला'

महाराष्ट्रातील मुंबईसह २९ महानगरपालिका निवडणुकांच्या प्रचाराची रणधुमाळी सुरु झाल्यानंतर एक मतदार म्हणून राज्यात गेले काही दिवस प्रसारमाध्यमांतून जे काही पाहायला मिळाले ते पाहून 'हेचि काय फळ मम तपाला' असे त्या आपल्या देशाच्या ७८ वर्षांच्या प्रगल्भ (?) लोकशाहीला नक्कीच वाटले असेल. आता या घटना पहा. निवडणूक लढवणाऱ्या राजकीय पक्षांची नावे अनेक ठिकाणी जवळपास समान असल्याने ती येथे टाळली आहेत. एका शहरात एका पक्षाच्या उमेदवाराने दुसऱ्या पक्षाच्या लोकांना, मतदारांना पैसे वाटताना पकडले आणि पोलिसांच्या हवाली केले. एका शहरात दोन राजकीय पक्षांच्या कार्यकर्त्यांत पैशांच्या वाटपाच्या वादातून तुफान हाणामारी झाली. त्यात पाच जण गंभीर जखमी झाले. एका ठिकाणी तर एका उमेदवाराने विरोधी उमेदवाराचा एबी फॉर्म चक्क गिळून टाकला. काही ठिकाणी उमेदवारांच्या घरासमोर काळी बाहुली, लिंबावर कुंकूवगैरे टाकून जादूटोण्यासारखे अघोरी प्रकार करण्यात आले. वास्तविक पूर्वी प्रत्येक पक्षाला एक वैचारिक बैठक होती. पक्षाचे कार्यकर्ते निरपेक्ष भावनेने काम करीत होते. सर्व प्रकारचा त्याग करीत होते. परंतु याबाबतचे सांप्रतचे चित्र किती भयावह आहे हे निवडणुकीतून दिसून आले.

**– प्रदीप अनुसया शंकर मोरे, अंधेरी**

## मतदान केंद्रांचा गोंधळ

मुंबई महापालिका निवडणुकीच्या मतदानदिनी लोकशाहीच्या उत्सवात सहभागी होण्यासाठी मतदानाला गेलो; मात्र हा अनुभव समाधानकारक ठरला नाही. नेहमीच्या मतदानकेंद्रावर माझे नाव आढळले नाही. अखेर जवळपास एक किलोमीटर अंतरावर असलेल्या दुसऱ्या मतदानकेंद्रावर ते सापडले. दीड तासानंतर एकदाचे मतदान झाले, इतक्यात समाधान मानावे लागले. महत्त्वाचे म्हणजे मी मतदानापूर्वीच निवडणूक आयोगाच्या संकेतस्थळावरून माझ्या मतदानकेंद्राची माहिती तपासली होती. विभागात महापालिकेने लावलेल्या फलकांवरील माहितीही पाहिली होती. असे असूनही प्रत्यक्ष मतदानाच्या दिवशी नाव दुसऱ्याच केंद्रावर सापडणे, ही बाब दुर्लक्ष करण्यासारखी नाही. मी तरी नाव शोधण्याची खटपट केली; पण मतदान केंद्रावर असेही अनेक मतदार दिसले की, या गोंधळाला वैतागून त्यांनी मतदानच न करण्याचा निर्णय घेतला.

**– दीपक काशिराम गुंडये, वरळी.**

विशेष

# छत्रपती संभाजी महाराजांचा राज्याभिषेक दिन

'शृंगार होता संस्कारांचा, अंगार होता हिंदवी स्वराज्याचा, शत्रूही नतमस्तक होई जिथं, असा महापराक्रमी पुत्र होता आमच्या छत्रपती शिवरायांचा...', छत्रपती संभाजी राजे यांचा जन्म १४ मे १६५७ रोजी पुरंदर दुर्ग (पुणे) येथे छत्रपती शिवाजी महाराजांच्या दुसऱ्या पत्नी सईबाई यांच्या पोटी झाला. छत्रपती संभाजी २ वर्षांचे असताना त्यांच्या आईचे निधन झाले. त्यांचे पालनपोषण त्यांच्या आजी जिजाबाई यांनी केले. जिजाबाईंनीच संभाजीमध्ये शौर्य आणि पराक्रमाची बीजे पेरली. १६८० मध्ये छत्रपती



शिवरायांच्या मृत्यूनंतर छत्रपती संभाजी राजे २० जुलै १६८० रोजी पन्हाळा येथे राजा म्हणून विराजमान झाले, परंतु त्यांचा अधिकृत राज्याभिषेक १६ जानेवारी १६८१ रोजी रायगड किल्ल्यावर झाला. संभाजी राजे यांचा राज्याभिषेक त्यांचे वडील छत्रपती शिवाजी महाराज यांच्या राज्याभिषेकाप्रमाणेच मोठ्या थाटात आणि उत्साहात साजरा करण्यात आला. संपूर्ण किल्ल्यावर विविध प्रकारचे कार्यक्रम आयोजित करण्यात आले होते.

१६ जानेवारी रोजी छत्रपती संभाजी महाराजांचा राज्याभिषेक झाला. त्यांना मराठा साम्राज्याची गादी सोपवण्यात आली. हा दिवस मराठा साम्राज्यासाठी गौरवाचा दिवस आहे, म्हणून छत्रपती संभाजी महाराजांचा राज्याभिषेक दिन शौर्य आणि पराक्रमाचा दिवस म्हणून साजरा केला जातो. छत्रपती शिवाजी महाराजांच्या मृत्यूनंतर संभाजी राजे यांनी संकटकाळात मराठा साम्राज्य ताब्यात घेतले. वयाच्या १८ व्या वर्षी ते युवराज झाले. वयाच्या २३ व्या वर्षी ते छत्रपती झाले. छत्रपती संभाजी महाराजांनी १६८१ ते १६८९ पर्यंत मराठा सम्राट म्हणून राज्य केले. त्यांचा जन्म १४ मे १६५७ आणि मृत्यू ११ मार्च १६८९ रोजी तुळापूर येथे झाला. छत्रपती संभाजी महाराजांच्या राज्याभिषेकाच्या या मंगल प्रसंगी स्वतःच्या नावाची नाणे पाडली ज्यावर पुढच्या बाजुवर 'श्री राजा शंभूछत्रपती' तर मागच्या बाजुवर 'छत्रपती' अस अक्षरं कोरलेली पाहायला मिळतात. संभाजी महाराजांच्या राज्याभिषेकानंतर लगेचच बुऱ्हाणपुरवर छापा टाकुन त्यांनी १ करोड होनांची दौलत स्वराज्यात आणली. तसेच पुढील आठ वर्षात शिवरायांच्या स्वराज्यात दुप्पटीने वाढ, सैन्य आणि खजिन्यालही तिपटीने वाढ झाल्याचा उल्लेख आहे.

मात्र या नव्या दमाच्या सेनानीच्या नेतृत्वाखाली मोहीम फत्ते करण्यासाठी जुने जाणते सरदारही उत्साही असंत, इतकी छाप छत्रपती संभाजी महाराजांनी आपल्या कुशल युद्धकौशल्याने पाडली होती.

शिवाजी महाराजांच्या मृत्यूनंतर, औरंगजेबाला वाटले की आता रायगड किल्ला सहज काबीज करता येईल. त्यामुळे छत्रपती संभाजी सत्तेवर येताच औरंगजेबाने रायगडावर हल्ला केला. पण छत्रपती संभाजींसोबतच्या लढाईत त्याचा दारुण पराभव झाला. यानंतरही छत्रपती संभाजी महाराजांनी मराठा साम्राज्याच्या उदयासाठी मुघलांशी अनेक लढाया करून विजय मिळविला. छत्रपती संभाजी महाराजांनी कारकिर्दीत मुघलांव्यतिरिक्त गोवा, म्हैसूर आणि पोर्तुगीज यांच्यातही अनेक लढाया केल्या.

अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे

१६ जानेवारी

१) श्रीम.उषा जयराम थळे श्रीबाग अलिबाग-२, अलिबाग, १६-१-१९४७

२) श्रीम.ज्योती विजय पाटील चेंढरे, अलिबाग १६-१-१९५३

## कृषीवलच्या वाचकांना आवाहन




अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे.जिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे.

**संपर्क- ८०५५३२५६७८ (बीपीन राठवा) ९२२६०५५१५५ (अमित शहानंद)**

**- मुख्य संपादक, कृषीवल**



श्री. संतोष दत्तात्रेय वेळे, वाढदिवस अलिबाग

स्व. श्री. सोनमल जैन, पुण्यतिथी, अलिबाग

# क्रांतीसूर्य : नारायण नागू पाटील



**ॲड. राकेश पाटील**

स्वातंत्र्यपूर्व काळाचा इतिहासाचा अभ्यास केला असता अन्यायाविरूद्ध बंड करणे म्हणजे स्वातंत्र्य मागणे हाच होता. मग अन्याय करणारे स्वकीय असो की परकीय? परंतु, इंग्रजांच्या विरोधात लढले ते स्वातंत्र्यवीर! स्वातंत्र्यसेनानी! म्हणून प्रसिद्धीस आले, परंतु जमिनीच्या हक्कांचे आंदोलन करणारे स्वतःच्या भाकरीसाठी आंदोलन करणाऱ्या शेतकऱ्यांचा आणि त्यांच्या चळवळीचा इतिहास जगासमोर आला नाही. कारण, शेत कसत असलेल्या जमिनीवर 'इंग्रज हटाव' म्हणणाऱ्या नेत्यांचे जातभाई खोत-सावकर होते. त्यांनी ह्या शेतकऱ्यांवर अन्याय केला हे वास्तव सत्य जर शेतकऱ्यांच्या पुढच्या पिढीला समजले, तर येणारी पिढी ही आपली कातडी सोलून काढेल हे त्यावेळच्या उच्चवर्णीय इतिहासकारांना चांगलेच माहीत होते. त्यांनी शेतकऱ्यांचा इतिहास दडपून टाकला.

स्वातंत्र्यपूर्व काळात शेटजी-भटजी हे भारतात हजारो वर्षांपासून शिकलेले लोक त्यांनी गरीब भोळ्या शेतकऱ्यांच्या अज्ञानाचा, देवभोळेपणाचा गैरफायदा घेऊन आपली लेखणी वापरुन शेतकऱ्यांनी शेतात पिकविलेले भाताचे पूर्ण पीक ते लुबाडायला लागले. एक खंडी भातातील २० मणांपैकी १२ मण भात आमचे सांगून मळणीच्या वेळी शेतकऱ्यांच्या खळ्यांतून संपूर्ण धान्य घेऊन जाऊ लागले. शेतकरी वर्षभर राबून त्यांच्या हाती भाताचा दाणा उरेनासा झाला. शेतात कष्ट करून धान्य पिकवायचे शेतकऱ्याने, उत्पन्न घ्यायचे शेटजी-भटजीने, असा अन्यायाचा नंगा नाच सुरू झाला. कोकणात याच जुलूम जबरदस्तीचा सावकाऱ्यांच्या भाषेत ''खोती पद्धती'' म्हणून प्रसिद्धीस आली.

पोटासाठी भात, खर्चासाठी पैसा कर्ज म्हणून घेतल्यावर हे उच्चवर्णीय सावकार वर्षभर शेतकऱ्याला बांधून घेऊ लागले. कौटुंबिक उपजीविका चालविण्यासाठी शेतकऱ्यांना त्याच सावकारांकडून व्याजाने धान्यसुद्धा घेण्याची वेळ आली. सावकार व्याजाने शेतकऱ्यांना भात देताना १२ पायल्यांचा पोशा फरा आणि कर्जफेड करून घेताना १४ पायल्यांचा नांग्या फरा वापरून ते वजन मापामध्ये भ्रष्टाचार करू लागले. रत्नागिरीसारख्या ठिकाणी ह्या सावकारांची पापी नजर शेतकऱ्यांच्या स्त्रियांवर गेली आणि शेतकऱ्याच्या मनात सावकाऱ्यांच्या विरोधात असंतोष खदखदू लागला आणि शेतकरी विरूद्ध सावकार या संघर्षास सुरूवात झाली.

यातूनच उभा राहिला चरीचा संप. आपण कष्ट करायचे पण फळाची अपेक्षाचा करायची नाही हे शेटजी-भटजींच्या गीतचे तत्त्वज्ञान जिताडा-बोंबील खाण्याऱ्या आगऱ्यांच्या गळी उतरत नव्हते. ''आमच्या कष्टाचे फळ आम्हाला मिळत नसेल तर शेतकऱ्यांनी जमिनीच पिकवायच्या नाहीत,'' असा धाडसी निर्णय नारायण नागू पाटील यांच्या नेतृत्वाने घेऊन शेतकऱ्यांनी सावकारांची झोप उडवली. या साऱ्या शेती कसणाऱ्या कुळांच्या संपाला चळवळीला, साथ लाभली ती भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची. डॉ. आंबेडकरांनी रत्नागिरीमध्ये बेदखल कुळांची चळवळ उभारली होती. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या अध्यक्षतेखाली आणि ना.ना. पाटील यांच्या नेतृत्वामुळे १९३४ साली शेती कसणाऱ्या कुळांची परिषद भरविण्यात आली, शेतकऱ्यांच्या अन्यायाला वाचा फोडण्यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर सहकार्य करताहेत हे पाहून उच्चवर्णीय सावकारांनी शेतकऱ्यांचा संप फोडण्यास सुरुवात केली. त्यावेळच्या लो. टिळक प्रेरित कुलाबा समाचार व राष्ट्रतेज या वृत्तपत्रांनी ना.ना. पाटील यांच्यावर टीकेची झोड उठवली. जातीने शूद्र असणाऱ्या डॉ. आंबेडकरांचे नेतृत्व स्वीकारून ना.ना. पाटील यांनी आपला धर्मच बाटवला, अशी टीका सर्वच स्तरांतून करण्यात आली, परंतु शेतकऱ्यांचा ना.ना. पाटीलांच्या नेतृत्वावर दृढ विश्वास होता. येथेच संपांचा विजय होता.

सन १९३२ ते १९३९ ना.ना. पाटील, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या नेतृत्वाने आणि हजारो शेतकऱ्यांनी पोटात निर्माण होणाऱ्या भुकेच्या आगीचा विचार न करता सलग सात वर्षे शेतात भाताचा दाणा न पिकविल्यामुळे त्यावेळच्या इंग्रज सरकारला शेतकऱ्यांच्या आंदोलनाची दखल घ्यावीच लागली. १९३७ साली लोकप्रतिनिधी म्हणून निवडून गेलेल्या डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी रायगड, रत्नागिरी जिल्ह्यांतील बेदखल कुळांच्या अन्यायाला वाचा फोडण्यासाठी खोती पद्धत नष्ट करण्याबाबत त्यांनी ''खोती सावकाराची नष्ट करण्याचे बिल'' असेंब्लीत मांडले, लोकांनी निवडून दिलेल्या कायदेमंडळात शेतकऱ्यांची बाजू मांडणारे डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे पहिले लोकप्रतिनिधी होते.

शेतकऱ्यांचा आक्रमकपणा आणि डॉ. आंबेडकरांच्या नेतृत्वामुळे त्यावेळच्या काँग्रेस सरकारला झुकावे लागले आणि १ एप्रिल १९७५ साली ''कसेल त्याची जमीन'' ह्या नैसर्गिक न्यायतत्त्वाचा ''कुळ कायदा'' अस्तित्वात आला.

शिक्षण हा ग्रामीण भागाच्या विकासाचा गाभा आहे, हे नारायण नागू पाटीलांनी ओळखले होते. त्यांनी उभारलेल्या शेतकरी चळवळीमुळे खारेपाट विभागात आज हजारो निवृत्त शिक्षक आहेत. ना.ना. पाटीलांच्या शेतकरी व शैक्षणिक चळवळींचा वारसा त्यांचे पुत्र भाई ॲड. दत्ता पाटील व स्वर्गीय प्रभाकर पाटील यांनी अखंडपणे सांभाळला. शेतकऱ्यांच्या हितासाठी ना.ना. पाटीलांनी शेतकरी कामगार पक्षाचे नेतृत्व स्वीकारले. वडिलांनी स्वीकारलेल्या शेतकऱ्यांच्या हक्कासाठीच स्वप्ने भाई ॲड. दत्ता पाटीलांनी महाराष्ट्राच्या विधानसभेत गेली २७ वर्षे आमदार विरोधी पक्षनेता म्हणून शेतकऱ्यांची बाजू मांडून पूर्णत्वास नेली.

रायगड जिल्हा हा शेतकऱ्यांच्या अन्यायविरोधात अभ्यासू आणि आक्रमक चळवळींचा ऐतिहासिक वारसा सांगणाऱ्यांचा जिल्हा म्हणून आजही प्रसिद्ध आहे. या जिल्ह्याच्या सामाजिक, सांस्कृतिक, शैक्षणिक, आर्थिक आणि राजकीय विकास साधण्यासाठी शेतकरी चळवळींची मोलाची साथ लाभली आणि ह्या चळवळी यशस्वीरित्या उभारण्याचं सारं श्रेय ॲड. भाई दत्ता पाटील यांचे वडील शेतकऱ्यांचे नेते क्रांतीसूर्य नारायण नागू पाटील यांना जाते.

एसईझेडमुळे येथील शेतकरी उद्ध्वस्त होणार हे स्थानिक राजकीय पुढाऱ्यांना माहीत होते. परंतु, एसईझेडच्या विरोधात शेतकऱ्यांच्या हक्कासाठी पहिला एल्गार ॲड. दत्ता पाटलांनी शेतकऱ्यांना एकत्र करुन राजकीय पक्षापेक्षा चळवळीत किती सामर्थ्य असते हे शेटजींच्या एसईझेडला हद्दपार करुन दाखविले. त्या चळवळींचा वारसाही ना.ना. पाटलांच्या चळवळीमध्ये दडला आहे. शेतात शेती कसणाऱ्या कुळांना जमिनींचे मालकी हक्क प्राप्त करुन देणारा मुंबई कुळवहिवाट अधिनियम १९४८ व मुंबई कुळवहिवाट व शेतजमीन नियम १९५६ हे ह्या कायद्यांच्या निर्मितीचे जनक हे अलिबागचे आगरी समाजातील शेतकऱ्यांचे नेते नारायण नागू पाटील हे होते.

आजही जिल्ह्यात बेदखल कुळांचा प्रश्न कुळकायद्याच्या ६० वर्षांनंतरही ऐरणीवर आला आहे. त्यामुळे ना. ना. पाटलांच्या चळवळींचा वारसा सांगणाऱ्यांनी बेदखल कुळांच्या प्रश्नांवर आवाज उठविण्याची गरज आहे. ना.ना. पाटलांच्या चळवळी ह्या अमर आहेत. त्यांच्या चळवळीमध्ये एक धगधगता अंगार होता. ते शेतकऱ्यांबरोबर आगरी अस्मितेचा मानबिंदू आहेत. त्यांच्या कार्याला एका शेतकऱ्याच्या पोराचा सलाम!

## सौरऊर्जा प्रकल्पातून लाखोंचे उत्पन्न

**| रत्नागिरी | प्रतिनिधी |**

रत्नागिरी जिल्हा परिषदेमार्फत तालुक्यातील गोळप येथे सौरऊर्जा प्रकल्प उभारण्यात आला आहे. हा सौरऊर्जा प्रकल्प १ मेगावॅटचा असून हा स्वयंचलित सौरपॅनेल असणारा हा राज्यातील पहिलाच प्रकल्प आहे. जिल्हा परिषदेच्या या प्रकल्पासाठी जिल्हा नियोजनामधून निधी देण्यात आला असून, गोळप ग्रामपंचायतींच्या केवळ पाच गुंठे जागेत तो उभारण्यात आलेला आहे. या प्रकल्पातून वर्षभरात १३ लाख ९ हजार ४३० युनिट वीजनिर्मिती करण्यात येत आहे. या वीजनिर्मितीतून जिल्हा परिषदेला सुमारे ४९ लाख ५१ हजार २३३ रुपये इतके आर्थिक उत्पन्न मिळाले आहे. त्यामुळे सर्व ग्रामपंचायतींचे पथदीप तसेच प्राथमिक शाळा यांचे वीजबिल भागवण्यात येणार आहे.

सर्व जिल्ह्यातील ग्रामपंचायत हद्दीतील सर्व पथदीपांसाठी वर्षाला २२ लाख ८० हजार युनिट तर प्राथमिक आरोग्यकेंद्रासाठी १ लाख ५० हजार ७७३ युनिट असा वापर होतो. त्यामुळे या प्रकल्पामुळे गोळप ग्रामपंचायतीच्या वीजबिलापोटी १८ लाख आणि अन्य ग्रामपंचायतीचे सुमारे एक कोटी रुपये वाचणार आहेत.

## जन्मदात्या आईची गोळी झाडून हत्या

**| सिंधुदुर्ग | प्रतिनिधी |**

सिंधुदुर्ग जिल्ह्यात एक संतापजनक घटना घडली आहे. वेंगुर्ले तालुक्यातील अणसुरे या गावात कर्जाच्या कारणावरून झालेल्या कौटुंबिक वादातून पोटच्या मुलानेच जन्मदात्या आईवर गोळी झाडून तिची हत्या केली.

वासंती वासुदेव सरमळकर (६५) असे मृत महिलेचे नाव आहे. तर उमेश वासुदेव सरमळकर (४०) असे मुलाचे नाव असून याच्याविरोधात वेंगुर्ला पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या घटनेमुळे संपूर्ण परिसरात खळबळ उडाली आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, आरोपी उमेश सरमळकर याने विविध बँका व बचत गटांकडून कर्ज घेतले होते. या कर्जाच्या कारणावरून त्याचा आई वासंती सरमळकर यांच्याशी वारंवार वाद होत होता. मंगळवारी (दि.१४) रात्री ८.३० वाजण्याच्या सुमारास वासंती सरमळकर या आपल्या घराच्या अंगणात बसलेल्या होत्या. यावेळी आरोपी उमेश सरमळकर याने घराच्या छपरावर चढून हातातील बंदुकीने अंगणात बसलेल्या आईवर गोळी झाडली. यात वासंती सरमळकर यांच्या डाव्या बाजूच्या छातीला लागल्याने त्या गंभीर जखमी होऊन त्यांचा जागीच मृत्यू झाला.

या घटनेची माहिती मिळताच वेंगुर्ला पोलीस ठाण्याच्या अधिकाऱ्यांनी घटनास्थळी धाव घेत पंचनामा केला. संशयित आरोपी उमेश याला वेंगुर्ले पोलिसांनी ताब्यात घेतले असून त्याच्याविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. प्राथमिक माहितीनुसार, उमेश हा दारूचा व्यसनी होता. त्याची मानसिक स्थितीही अनेकदा बिघडत असे. या घटनेचा अधिक तपास वेंगुर्ले पोलीस करत आहेत.

## उदमसिंह यांचे वैजनाथ येथे स्वागत



**खांब :** छत्रपती शिवाजी महाराजांचा इतिहास व त्यांच्यावर अपार श्रद्धा बाळगणारे कार्तिक उदमसिंह यांचे वैजनाथ येथे भव्यदिव्य स्वरूपात स्वागत करण्यात आले. श्री छत्रपती शिवाजी महाराजांचे विचार डोक्यात घेऊन उत्तराखंडमधील उदमसिंह नगर जिल्ह्यातील कार्तिक उदमसिंह हे दि.२४ डिसेंबर २०२५ रोजी सायकल प्रवास करत करत शिवनेरी किल्ल्यावर दि.१९ फेब्रुवारी २०२५ रोजी पोहोचले. छत्रपती शिवाजी महाराजांचे दर्शन घेऊन गडकिल्ले भटकंतीला सुरुवात केली. गड किल्ल्यांची भटकंती करीत असतानाच वैजनाथ येथील सुरगड किल्ल्यावर त्यांचे आगमन झाले. २२७ गड किल्ल्यांची भटकंती करणारे कार्तिक उदमसिंह यांचे वैजनाथ येथे आगमन होताच त्यांनी तेथील वैजनाथेश्वराचे दर्शन घेतले. वैजनाथ गावाच्या जवळच असलेल्या सुरगड किल्याच्या भटकंती जात असताना वैजनाथ गावातील ग्रामस्थांनी आणि दुर्गवीर प्रतिष्ठानचे सभासद किशोर अर्जुन सावरकर यांनी त्यांचा शाल, श्रीफळ आणि पुष्पगुच्छ देऊन सत्कार केला. तसेच पुढील गड किल्ल्यांच्या प्रवासासाठी त्यांना शुभेच्छा दिल्या.

## मोफत आरोग्य तपासणी शिबीर

**| पाताळगंगा | प्रतिनिधी |**




ग्रुप ग्रामपंचायत माजगाव, मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज व माझी वसुंधरा अभियान अंतर्गत थर्ड प्लेनेट फांउडेशन मर्क कारखाना बोरीवली यांच्या सौजन्याने सी.एस.आर फंड अंतर्गत महिला बचत गट अध्यक्ष, सचिव कमल जाधव यांच्या माध्यमातून मोफत आरोग्य तपासणी शिबीर आयोजित करण्यात आले होते. माजगाव, आंबिवली पौध, वारद या परिसरातील ग्रामस्थांची आरोग्य तपासणी व्हावी, या उदात्त विचारांतून आंबिवली येथे कमल जाधव यांच्या निवास स्थानी शिबीर आयोजित करण्यात आले. यावेळी उपस्थित लहान मुले तसेच तरुण, वृद्ध यांनी आपले रक्तदाब, शुगर, रक्त तपासणी, वजन, हिमोग्लोबिन, ॲनिमिया अशा अनेक प्रकारच्या आरोग्य तपासणी करण्यात आली. तसेच मोफत औषधेही देण्यात आली. यावेळी उपस्थित रुग्णांना आरोग्याविषयी सल्ला तसेच मार्गदर्शन करण्यात आले. बाहेरील अन्न पदार्थ खाण्यास शक्यता टाळावे व घरचे ताजे अन्न खावे, यामध्ये पालेभाज्या, फळे, मोड आलेले कडधान्ये यांचा वापर आपल्या दैनंदिन आहारामध्ये असावा, असा सल्ला उपस्थित रुग्णांना डॉक्टरांनी दिला. परिसरातील शेकडो ग्रामस्थांनी या शिबिराचा लाभ घेतला.

## बाप-लेकीचा बुडून मृत्यू

**पालघर :** विरार पूर्वेकडील बरफपाडा परिसरात बुधवारी (दि.१४) दुपारच्या सुमारास खदाणीत बुडून वडील आणि मुलीचा मृत्यू झाला. विनायक सितप (४८) आणि त्यांची मुलगी ईकांशा सितप (१५) अशी मृतांची नावे आहेत. मकर संक्रांतीच्या सणानिमित्त ते नातेवाईकांकडे आले होते. बरफपाडा परिसरातच असलेल्या एका खदानीजवळ वडील आणि मुलगी गेले हाते. यावेळी विनायक सितप खदानीत पोहोण्यासाठी उतरले. मात्र पाण्याचा अंदाज न आल्याने ते पाण्यात बुडू लागले. त्यांना वाचवण्यासाठी इकांशादेखील पाण्यात उतरली. मात्र, दोघांचाही बुडून मृत्यू झाला.



## महर्षी कर्वे महाविद्यालयाचे निवासी शिबीर संपन्न

**| बोर्लीपंचतन | प्रतिनिधी |**

श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरसी महिला विद्यापीठ, मुंबई संचालित महर्षी कर्वे आदर्श महिला महाविद्यालय श्रीवर्धन यांच्या राष्ट्रीय सेवा योजना विशेष श्रमसंस्कार सात दिवशीय निवासी भोस्ते येथे दि. ५ जानेवारी ते दि. ११ जानेवारी दरम्यान संपन्न झाले.

यामध्ये शिबीर परिसर स्वच्छता, ग्राम स्वच्छता, आरोग्य व निराधार सर्वेक्षण, वनराई बंधारा, एक दिवस प्राथमिक शाळेसाठी, आरोग्य तपासणी शिबीर इ. श्रमसंस्कार दत्तक खेडे भोस्ते येथे करण्यात आले. सर्व काही ऑनलाईन, समाज सक्षमीकरणाचे साधन स्त्री उच्चशिक्षण, मी पृथ्वी बोलते, भ्रष्टाचार, पाणलोट व्यवस्थापन या विषयांवर पथनाट्यातून जनजागृती करण्यात आली. जनजागृती व्याख्यान्यात, आरोग्यावर बोलू काही यावर डॉ. सोनाली करंबे, महिला उद्योजकतेच्या संधी आणि आव्हाने यावर पद्मजा कुलकर्णी, उच्चशिक्षणातून महिला सक्षमीकरणावर प्रा. कानिफ भोसले तर डिजिटल युगातील महिला: संधी व धोके यावर पी.एस.आय. संदीप पाटील यांनी मार्गदर्शन केले. मा. आमदार तसेच महिला व बाळ विकास विभाग महाराष्ट्र राज्य, अदितीताई तटकरे यांनी शिबिराला अनपेक्षितपणे भेट दिली. विद्यार्थिनींशी थेट सुसंवाद साधून त्यांनी विद्यार्थिनीचा उत्साह दुगुणा केला. तर विद्यापीठ रा.से.यो. समन्वयक डॉ. सुलक्षणा माने यांनी ऑनलाईन विद्यार्थिनींशी संवाद साधला. शिबिराची सांगता श्रीवर्धन पोलीस उपअधीक्षक सविता गर्जे यांच्या प्रमुख उपस्थितीत झाली. त्यांनी विद्यार्थिनींना महिला सुरक्षा, सायबर सुरक्षा, स्त्री उच्चशिक्षण, संविधानातील महिलांसाठीच्या विशेष हक्क-अधिकार यावर मार्गदर्शन केले. महाविद्यालयाच्या माजी विद्यार्थिनीनी या शिबिराला भेट देऊन जुन्या आठवणींना उजाळा दिला. या शिबिरात एकूण ५० विद्यार्थिनी स्वयंसेविकांनी सहभाग नोंदविला.

## विठ्ठल रेणुकर राज्यात द्वितीय



**तळा :** शिक्षणातील गुणवत्तेच्या संवर्धनासाठी आणि शिक्षकांच्या सातत्यपूर्ण व्यावसायिक विकासासाठी शैक्षणिक वर्ष २०२४-२५ पासून राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण संस्था, महाराष्ट्र, पुणे यांच्या वतीने राज्यातील सर्व प्राथमिक, माध्यमिक व कनिष्ठ महाविद्यालयीन शिक्षक, तसेच पर्यवेक्षीय यंत्रणांतील अधिकारी/कर्मचारी यांच्यासाठी ४२ स्पर्धांचे आयोजन करण्याचा महत्त्वाकांक्षी उपक्रम सुरू करण्यात आला आहे. या अंतर्गत घेण्यात आलेल्या व्यवसाय मार्गदर्शन व समुपदेशन स्पर्धेमध्ये गो. म. वेदक विद्यामंदिर शाळेचे शिक्षक विठ्ठल रेणुकर यांचा राज्यात द्वितीय क्रमांक आला. या स्पर्धेमध्ये त्यांनी आंतरविद्याशाखीय शिक्षणातून करिअरची संधी या विषयाचे सादरीकरण केले. या स्पर्धेमध्ये राज्यातील अमरावती, मुंबई, पुणे, नाशिक, नागपूर, छ संभाजीनगर, कोल्हापूर व लातूर अशा ८ विभागातून ४० स्पर्धक सहभागी झाले होते.

## घराघरात राजमाता जिजाऊ तयार होण्याची गरज: विकास चित्ते

**| नेरळ | प्रतिनिधी |**



छत्रपती शिवाजी महाराज यांनी उभे केलेले स्वराज्य पुन्हा एकदा अवतरले पाहिजे. त्यासाठी प्रत्येकाच्या घरात राजमाता जिजाऊ यांनी जन्म घ्यायला हवा, असे उद्गार हायकर्स आणि ट्रेकर्स यांचे मार्गदर्शक गिर्यारोहक विकास चित्ते यांनी काढले. कर्जत तालुक्याचे शासकीय तंत्र शिक्षण संस्था असलेल्या बामणोली येथील श्री वामनराव पै शासकीय औद्योगिक संस्थेत राष्ट्रीय युवा दिन साजरा करण्यात आला, यावेळी ते बोलत होते.

सद्गुरु वामनराव पै शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था येथे राष्ट्रीय युवा दिनानिमित्त कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी शिवशंभो युवा हायकर्स संस्थेचे अध्यक्ष, गिर्यारोहक विकास चित्ते, प्राचार्य जी.बी. चौधरी तसेच गट निदेशक चौधरी तसेच संस्थेमधील शिक्षक आदी उपस्थित होते.

विकास चित्ते यांनी आपल्या व्याख्यानात राजमाता जिजाऊ आणि स्वामी विवेकानंद यांचे जिवनावरील विचार मांडले. श्री छत्रपती शिवाजी महाराज घराघरात जन्माला यायचे असेल तर प्रथम घराघरात आऊसाहेब तयार होण्याची आवश्यकता असल्याचे प्रतिपादन केले.

तसेच, स्वामी विवेकानंद यांचे विचार मांडताना शिकागो येथील धर्म परिषदमध्ये भारताची दिलेली ओळख अत्यंत प्रेरणादायी असल्याचे नमुद केले. देशासाठी, समाजासाठी आजच्या युवा पिढीने काम करावे, असे आवाहनही त्यांनी यावेळी केले.

## वसुधा मुद्राळे यांचे निधन



**पाली/बेणस :** समाजसेविका वसुधा सुरेश मुद्राळे (६३) यांचे सोमवारी (दि.१२) अल्पशा आजाराने निधन झाले. जिल्हा परिषद शाळेचे निवृत्त मुख्याध्यापक सुरेश मुद्राळे यांच्या त्या पत्नी होत. वसुधा मुद्राळे यांचे समाजकार्य, निर्भीड स्वभाव आणि मदतीची वृत्ती सर्वांनाच भावणारी होती. त्यांनी गावातील महिलांना एकत्र करून अनेक सामाजिक उपक्रम राबविले. त्यांच्या पश्चात पती, एक मुलगी, दोन मुलगे, जावई, सुना व नातवंडे असा आप्तपरिवार आहे. त्यांच्या निधनाने त्यांचा परिवार व आप्तेष्ट यांच्यावर शोककळा पसरली आहे. त्यांचे दशक्रिया विधी बुधवार दि.२१ रोजी बोर्ली पंचतन येथे होणार आहे. तर उत्तरकार्य शनिवार दि.२४ रोजी चिंचबादेवी रोड, बोर्ली पंचतन ता. श्रीवर्धन येथे राहत्या घरी होणार आहे.

**भूजल पातळी वाढविण्याचे कार्य** | **५५ ग्रामपंचायतीचा सहभाग**

# कर्जतमध्ये ७२ वनराई बंधाऱ्यांची निर्मिती

**| नेरळ | प्रतिनिधी |**




कर्जत तालुक्यात मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान राबविण्यात येत आहे. या अभियानाच्या माध्यमातून प्रत्येक ग्रामपंचायतीत वनराई बंधारे बांधून पाणी अडवण्याचे कार्य सुरु आहे. कर्जत पंचायत समितीच्या माध्यमातून तालुक्यातील ५५ ग्रामपंचायतीमध्ये ७२ ठिकाणी आतापर्यंत वनराई बंधारे बांधण्यात आले आहेत. दरम्यान गटविकास अधिकारी यांच्याकडून प्रत्येक वनराई बंधाऱ्यांची पाहणी केली जात असून आणखी वनराई बंधारे बांधण्यात यावेत, अशी सूचना ग्रामपंचायतींना करीत आहेत.

मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान अंतर्गत कर्जत तालुक्यातील प्रत्यके ग्रामपंचायतीमध्ये वनराई बंधारे बांधण्याची योजना आहे. जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या सूचनेने रायगड जिल्ह्यात असा आगळावेगळा उपक्रम हाती घेण्यात आला आहे. त्यात कर्जत तालुक्यात ५५ ग्रामपंचायतीमध्ये वनराई बंधारे बांधले गेले आहेत. नद्या आणि नाले यांच्यातून वाहणारे पाणी अडवण्याचा प्रयत्न करून जमिनीतील भूजल पातळी वाढण्याचे कार्य ग्रामपंचायतीच्या माध्यमातून सुरु आहे. या वनराई बंधारे क्षेत्रात वनराई बंधारे बांधण्याचा उपक्रम आयोजित करण्यात आला होता.

त्या अनुषंगाने कर्जत पंचायत समिती अंतर्गत एका दिवसात सर्व ५५ ग्रामपंचायतीमध्ये वनराई बंधारे बांधण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले होते. त्यानुसार तालुक्यातील सर्व ग्रामपंचायतमध्ये मुख्यमंत्री समृद्ध ग्रामपंचायराज अभियान अंतर्गत वनराई बंधारे बांधण्याचा उपक्रम आयोजित करण्यात आला होता. प्रत्येक गावातून जास्तीत जास्त बंधारे बांधण्याचे नियोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाची प्रत्यक्ष पाहणी व वनराई बंधारा बांधण्यासाठी पंचायत समिती स्तरावरून गट विकास अधिकारी सुशांत पाटील, सहायक गट विकास अधिकारी बापूसाहेब नंदाळे, कृषी अधिकारी संजय चव्हाण, विस्तार अधिकारी उज्वला भालेराव, विस्तार अधिकारी विजय राजपूत तसेच सर्व ग्रामपंचायतचे यांचा सहभाग होता. तर प्रत्येक ग्रामपंचायत अधिकारी ग्रामपंचायत क्षेत्रातील सर्व ग्रामस्थ महिला बचत गट, ग्रामपंचायत कर्मचारी यांनी उत्स्फुर्त प्रतिसाद नोंदविला. यात तालुक्यातील सर्वच ५५ ग्रामपंचायतींनी सहभाग घेतला असून एकूण ७२ वनराई बंधारे केवळ श्रमदान व लोकसहभागातून बांधण्यात आले. या बंधऱ्याच्या माध्यमातून भूजल साठा वाढविण्यास मदत तसेच जमीनीची धूप थांबण्यास मदत होणार असल्याचे तालुका गट विकास अधिकारी सुशांत पाटिल यांनी सांगितले.

## रेशन कार्डधारकांची ई-केवायसी प्रलंबित



**रत्नागिरी :** राज्यातील सार्वजनिक वितरण प्रणालीमध्ये पारदर्शकता आणण्यासाठी शासनाने सर्व रेशन कार्डधारकांना ई-केवायसी बंधनकारक करण्यात आले. मुदतवाढ देऊन, वारंवार ई केवायसी करून घ्यावी, असे आवाहन जिल्हा पुरवठा विभागाने वारंवार केले होते. जिल्हा पुरवठा विभागाने पाठपुरावा केल्याने रत्नागिरी जिल्ह्यातील ५ लाखांहून अधिक रेशन लाभार्थ्यांची ई-केवायसी पूर्ण झाली आहे. परंतु आवाहन करूनही तब्बल अडीच लाखांहून अधिक लाभार्थ्यांचे अजूनही ई-केवायसी करणे बाकी आहे. त्यामुळे ई-केवायसी न केलेल्या लाभार्थ्यांचे धान्य आपोआप धान्य बंद होईल किंवा रेशन कार्डावरील नाव कमी करण्याची कारवाई होणार असल्याचे जिल्हा पुरवठा अधिकारी (रत्नागिरी) रोहिणी रजपूत यांनी सांगितले आहे.

## नि|व|ड|क



### मोतीबिंदू रुग्णांना गॉगलचे वाटप

**माणगाव:** डोळ्याच्या शस्त्रक्रियेनंतर रुग्णांच्या दृष्टीचे संरक्षण करणे अत्यंत महत्त्वाचे असते. अनेक गरजू रुग्णांना आवश्यक साधनसामग्री मिळणे कठीण जाते, ही बाब लक्षात घेऊन खाडे परिवाराच्या वतीने हा संवेदनशील आणि स्तुत्य उपक्रम राबविण्यात आला. गॉगल मिळाल्याने रुग्णांच्या चेहऱ्यावर समाधान आणि दिलासा स्पष्टपणे दिसून येत होता. या कार्यक्रमास उपजिल्हा रुग्णालयातील वैद्यकीय अधिकारी, तज्ज्ञ डॉक्टर, परिचारिका व इतर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. रुग्णालय प्रशासनाने या उपक्रमाचे मनःपूर्वक स्वागत करत, अशा सामाजिक उपक्रमांमुळे गरजू रुग्णांना केवळ साहित्यिक मदतच नव्हे तर मानसिक बळही मिळते, असे गौरवोद्गार काढले. गॉगल प्राप्त झालेल्या अनेक रुग्णांनी खाडे परिवाराचे आभार मानले. राज खाडे, जय खाडे व संपूर्ण खाडे परिवार यांच्या पुढाकारातून ही सेवा घडून आली. रुणसेवक, समाजसेवक व मानवसेवक म्हणून ओळखल्या जाणाऱ्या या परिवाराने वाढदिवसाचा आनंद वैयक्तिक स्वरूपात न साजरा करता तो समाजोपयोगी कार्यासाठी अर्पण करून एक सकारात्मक व प्रेरणादायी आदर्श समाजासमोर ठेवला आहे.



### मराठी भाषा संवर्धन पंधरवडा साजरा

**तळा :** महाराष्ट्र शासनाच्या मराठी भाषा विभागाच्या आदेशानुसार १४ ते २८ जानेवारी या कालावधीत मराठी भाषा संवर्धन पंधरवडा साजरा करण्यात अला. त्या अनुषंगाने श्री गोपीनाथ महादेव वेदक प्रतिष्ठानचे जी. एम. वेदक कॉलेज ऑफ सायन्स, तळा येथे ग्रंथालय विभागामार्फत ग्रंथ प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले. ग्रंथ प्रदर्शनाचे उद्घाटन स्थानिक व्यवस्थापन समितीचे सदस्य पुरुषोत्तम मुळे यांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमास महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. सचिन बंगाळे, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी तसेच विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी प्रभारी प्राचार्य डॉ. सचिन बंगाळे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. त्यांनी विद्यार्थ्यांनी अभ्यासासोबतच वाचन संस्कृती आत्मसात करावी, असे त्यांनी नमूद केले. महाविद्यालयाचे ग्रंथपाल धवन एस. के. यांनी विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची गोडी निर्माण व्हावी, हा या ग्रंथ प्रदर्शनाचा मुख्य उद्देश असल्यांचे सांगितले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन ग्रंथपाल धवन एस. के. यांनी केले, तर आभार प्रदर्शन अमोल निकम यांनी मानले.



### देऊळवाडीत वृद्धांना स्टिकचे वाटप

**पाली :** मकर संक्रातीच्या पूर्वसंध्येला मंगळवारी (दि.१३) जानेवारी रोजी अंकुशदादा आपटे यांच्या वतीने देऊळवाडा ग्रामस्थ मंडळासाठी आणि विशेष करून ६० वर्षांवरील ज्येष्ठ व्यक्तींसाठी त्यांना इतरांच्या आधाराशिवाय सहज चालता यावे, यासाठी वॉकिंग ट्रायपॉड स्टिक्सचे वाटप करण्यात आले. देऊळवाडा येथील मरीमातेच्या मंदिरामध्ये हा कार्यक्रम पार पडला. यावेळी देऊळवाडा गावकीचे अध्यक्ष अनंता दंत, ज्ञानेश्वर जगताप, अनेक ज्येष्ठ ग्रामस्थ, तरुण मंडळी उपस्थित होते. याप्रसंगी अंकुश आपटे यांनी सांगितले की मी देऊळवाडा ग्रामस्थांसाठी काम करत राहणार आहे. त्यानंतर २५ वयोवृद्धांना स्टिक्सचे वाटप करण्यात आले.

### सुनिता राठोड यांना पुरस्कार

**अलिबाग :** आविष्कार फाऊंडेशन संस्था कोल्हापूर यांच्यातर्फे



नुकताच राज्यस्तरीय क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले पुरस्कार वितरण सोहळा सातारा जिल्ह्यातील शिरवळ येथे पार पडला. सदर पुरस्कार शिक्षण क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या रायगड जिल्ह्यातील अलिबाग तालुक्यातील आक्षी शाळेतील शिक्षिका सुनिता राठोड, यांना सन्मानित करण्यात आले आहे. त्याबद्दल त्यांच्यावर सर्व स्तरातून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

# डायलिसिस रुग्णांची एसटीकडून उपेक्षा

## वातानुकूलित बसेससाठी सवलत देण्याची मागणी; योजना काही अंशी फक्त कागदावरच

**। श्रीवर्धन । प्रतिनिधी ।**

डायलिसिस रुग्णांसाठी महाराष्ट्र शासनाने एसटी बसने उपचार आणि तपासणीसाठी राज्यात विनामूल्य प्रवास सवलत योजना लागू केली आहे. परंतु, सदरची योजना काही अंशी फक्त कागदोपत्री असल्याचे निदर्शनास येत असून श्रीवर्धन तालुक्यातील डायलिसिस रूग्णांनी या बाबतीत तीव्र नाराजी व्यक्त केली आहे.



महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाच्या एसटी योजनेअंतर्गत डायलिसिस रुग्णांना उपचारासाठी जिल्हा किंवा इतर ठिकाणी जाण्यासाठी राज्यभरातील एसटी बसने विनामूल्य प्रवास करण्याची सवलत दिली जाते, परंतु सदरची विनामूल्य प्रवास सवलत ही केवळ शंभर किलोमीटर अंतरा पुरती मर्यादीत आहे, आणि रुग्णांना शंभर टक्के सुट दिली जाते, पण ती फक्त महिन्यातील दोन फेऱ्यांसाठी आहे. इतर वेळी पुर्ण तिकीट भाडे रुग्णांना द्यावे लागते. यामध्ये ही सदरचा प्रवास हा साध्या बस पुरता असल्याने याचा त्रास श्रीवर्धन तालुक्यातील डायलिसिस रूग्णांना सहन करावा लागत आहे.

> आठवड्यातून तीन वेळा पनवेल येथे डायलिसिस उपचारासाठी जातो. साध्या बससाठी आम्हाला शंभर टक्के सुट दिली जाते पण ती फक्त महिन्यातून दोन वेळा. इतर वेळी मला पुर्ण तिकीट भाडे द्यावे लागते.आम्हालाही सर्व प्रकारच्या बसेससाठी शंभर टक्के सुट द्यावी व ती सुट मर्यादित दोन वेळेसाठी नसावी तर कायमस्वरूपी असावी.
> – रितेश तोडणकर
> दांडा.श्रीवर्धन

तालुक्यातील डायलिसिस रूग्णांना उपचारासाठी पनवेल येथील रुग्णालयात आठवड्यातून तीन वेळा जावे लागते. श्रीवर्धन आगारातून मुंबईकडे जाणाऱ्या व येणाऱ्या साध्या बसेसचे प्रमाण कमी करीत जवळपास सर्वच बसेस शिवशाही आणि स्लीपर कोच पाठवण्यात येतात. डायलिसिस रुग्णांना पनवेल येथे उपचार घेण्यासाठी जायचे असेल तेव्हा साध्या बसच्या वेळापत्रकानुसार जावे लागते. शिवशाही व स्लिपर कोच बसेस साठी डायलिसिस रूग्णांना श्रीवर्धन ते पनवेल मार्गावरील पुर्ण दरांत तिकीट भाडे द्यावे लागते तर साध्या बससाठी तिकीट भाड्यात शंभर टक्के सुट आहे. परंतु, श्रीवर्धन ते वडखळ हे अंतर शंभर किलोमीटर इतके होत असून रुग्णांना वडखळ ते पनवेल मार्गावर पुर्ण तिकीट भाडे द्यावे लागते.

श्रीवर्धन ते मुंबई मार्गावर श्रीवर्धन आगाराने अनेक साध्या बसेसच्या फेऱ्या ऐवजी शिवशाही व स्लीपर कोच पाठवण्यात येत आहेत. याचा फटका डायलिसिस रूग्णांना होत असुन साध्या बसेस प्रमाणेच या बसेसच्या तिकीट भाड्यात आम्हाला शंभर टक्के सुट द्यावी अशी मागणी सदरच्या रूग्णांकडून होत आहे.

## नशामुक्ती केंद्रातून राजीव मेहरा बेपत्ता

**। वावोशी । प्रतिनिधी ।**

खालापूर तालुक्यातील छत्तीशी विभागातील डोणवत-ठाकूरवाडी येथील व्ही केअर वेलनेस फाऊंडेशन नशामुक्ती केंद्रातील रुग्ण राजीव मित्तरलाल मेहरा (वय ५१) २० डिसेंबर २०२५ रोजी सायंकाळी सुमारे ५:३० वाजता उपचार केंद्रातून निघून गेला आणि तो अद्याप परत आलेला नाही. खालापूर पोलीस आणि स्थानिक प्रशासनाकडून त्याचा शोध सुरू आहे. बेपत्ता झालेल्या या व्यक्तीची उंची अंदाजे १७२ सें. मी., गोऱ्या रंगाची त्वचा, केस वाढलेले, चेहरा उभट आहे. अंगात लाल पट्ट्यासह फुल टिशर्ट, निळ्या रंगाचा डीदास जॅकेट,



निळसर ट्रॅक पॅन्ट आणि पांढरे बूट होते. त्याबाबत माहिती मिळाली असल्यास खालील क्रमांकावर तात्काळ संपर्क साधावा असे आवाहन खालापूर पोलिसांकडून करण्यात आले आहे. संतोष आवटी ९६७३१८७२५४ गायकवाड ९७६५१ ३६२०५ पोलीस हवालदार जगधने ९१६८४४५६७६ संबंधित प्रकरणी अधिक माहिती खालापूर पोलीस स्टेशनमध्ये उपलब्ध आहे.

## अलिबागमध्ये रामजी घरत यांची पुण्यतिथी साजरी

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

आवास येथील थोर व्यक्तीमत्व तपस्वी रामजी लक्ष्मण घरत यांच्या ७७ व्या पुण्यतिथीनिमित्त बुधवारी (दि.१३) जानेवारी रोजी सार्वजनिक वाचनालय अलिबाग येथील त्यांच्या पुतळ्याला पुष्पमाला अर्पण करून अभिवादन करण्यात आले. याप्रसंगी अलिबागच्या नवनियुक्त नगराध्यक्षा अक्षया नाईक आणि माजी नगराध्यक्ष व विद्यमान नगरसेवक प्रशांत नाईक यांनी तपस्वी रामजी घरत यांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण करून आदरांजली वाहिली. या मुख्य सोहळ्यास सार्वजनिक वाचनालय अलिबागचे अध्यक्ष ॲड. गौतम



पाटील यांची प्रमुख उपस्थिती लाभली होती. कार्यक्रमाच्या प्रारंभी श्रीरंग घरत यांनी उपस्थित सर्व मान्यवरांचे गुलाबपुष्प देऊन स्वागत केले. नगराध्यक्षा व नगरसेवकांच्या अभिवादनानंतर, सार्वजनिक वाचनालयाचे अध्यक्ष ॲड. गौतम पाटील यांनी श्रीफळ वाढवून श्रद्धांजली अर्पण केली. वाचनालयाच्या सभागृहात पार पडला. याप्रसंगी नगरपरिषद निवडणुकीत विजयी झालेल्या नगराध्यक्षा अक्षया नाईक, नगरसेवक प्रशांत नाईक, नगरसेविका साक्षी पाटील, अनिल चोपडा यांचा सत्कार करण्यात आला. तसेच, ॲड. गौतम पाटील यांचाही यावेळी गौरव करण्यात आला. नागेश कुलकर्णी यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले, तर श्रीरंग घरत यांच्या हस्ते सत्कारमूर्तींना पुष्पगुच्छ देण्यात आले.

या सोहळ्यास नागेश कुलकर्णी, चारुशिला कोरडे, रणजीता माळवी, बाबू नाईक, अरुण राऊत, विकास पाटील, नंदकुमार म्हात्रे, नवीन राऊत, हरिश्चंद्र सानप, अनंत सानप, पंकज घरत, किशोर घरत, अरविंद घरत, संतोष ठाकूर, समीर पुरो, यशवंत थळे, विपीन राऊत, अरुण पाटील, संजय कांबळे, जयेंद्र पाटील, श्रीरंग घरत, बळवंत वालेकर यांच्यासह पाठारे क्षत्रिय अष्टनगर समाज झिराड संस्थेचे सदस्य व पुतळा सुशोभीकरण समितीचे सदस्य उपस्थित होते.

## मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांची नाविन्यपूर्ण उपक्रमांची पाहणी

**। पाली । प्रतिनिधी ।**

रायगड जिल्हा परिषदेच्या सन्माननीय मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले यांनी मंगळवारी (दि.१३) रोजी ग्रुप ग्रामपंचायत वऱ्हाड-जांभूळपाडा येथे सविस्तर भेट देऊन ग्रामपंचायत स्तरावरील विकासकामे व प्रशासनाच्या कामकाजाचा प्रत्यक्ष आढावा घेतला. या भेटीदरम्यान उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रा.प.) विशाल तनपुरे, गट विकास अधिकारी लता मोहिते, सहाय्यक गट विकास अधिकारी घरत, पंचायत व विस्तार अधिकारी (ग्रा.प.) आविनाश



घरत तसेच अहिरे उपस्थित होते.

मान्यवर अधिकाऱ्यांनी भेटीदरम्यान ग्रामपंचायतीमार्फत राबविण्यात येत असलेल्या विविध नाविन्यपूर्ण उपक्रमांची पाहणी केली. ग्रामपंचायत कार्यालयाच्या कामकाजाची तपासणी करून नोंदवही, योजना अंमलबजावणी, स्वच्छता, पाणीपुरवठा, आरोग्य व शिक्षणाशी संबंधित बाबींचा आढावा घेण्यात आला.

यावेळी रायगड जिल्हा परिषद शाळा, अंगणवाडी तसेच प्राथमिक आरोग्य केंद्रास भेट देऊन तेथील सुविधा, उपस्थिती, स्वच्छता व सेवा दर्जाची पाहणी करण्यात आली. नागरिकांना दिल्या जाणाऱ्या मूलभूत सेवांमध्ये अधिक सुधारणा करण्याच्या दृष्टीने मान्यवर अधिकाऱ्यांनी आवश्यक सूचना व मार्गदर्शन करण्यात आले. तसेच ग्रामपंचायत स्तरावर राबविण्यात येणाऱ्या विकासकामांबाबत समाधान व्यक्त करत भोसले यांनी ग्रामपंचायत पदाधिकारी, कर्मचारी व संबंधित यंत्रणेच्या कार्याचे कौतुक केले. तसेच शासनाच्या विविध योजना प्रभावीपणे राबवून सर्वसामान्य नागरिकांपर्यंत त्याचा लाभ पोहोचवावा असे आवाहन करण्यात आले.

## माथेरानमध्ये जंतुनाशक फवारणी

**। माथेरान । प्रतिनिधी ।**

प्रदूषण मुक्त माथेरानमध्ये शुद्ध हवा आणि गुलाबी गारवा, हिरवीगार गर्द वनराईमुळे याठिकाणी सहसा कुणाला दीर्घ आजार उद्भवत नाहीत. परंतु अनेकदा गावातील काही ठिकाणी वस्तीच्या भागात काही नागरिक आपल्या घरातील ओला कचरा गटारात टाकत असतात. त्यामुळे डासांचा प्रादुर्भाव प्रकर्षाने जाणवतो. त्याचप्रमाणे उघड्या गटारांमुळे डासांची पैदास वाढत असते. त्या भागात दुर्गंधी पसरत असते. परिणामी नागरिकांना आजाराला सामोरे जावे



लागण्याची शक्यता निर्माण होत असते. याकामी चंद्रकांत चौधरी यांनी संबंधित विभागाला सूचना देऊन गावातील विविध भागात जंतुनाशक फवारणी करण्यास सुरुवात केली आहे.

## कर्वे महाविद्यालयात युवा दिवस उत्साहात

**। श्रीवर्धन । प्रतिनिधी ।**

श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरसी महिला विद्यापीठ, मुंबई संचालित श्रीवर्धन येथील महर्षी कर्वे आदर्श महिला महाविद्यालय यांच्या राष्ट्रीय सेवा योजना समितीच्या वतीने (दि.१३) जानेवारी रोजी स्वामी विवेकानंद यांची जयंती राष्ट्रीय युवा दिन तसेच माँ साहेब जिजाऊ यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. महाविद्यालयातील विद्यार्थीनी प्रियल शिगवण हिने स्वामी विवेकानंद यांना अपेक्षित युवा या विषयावर भाषण केले. ऋतुजा पड्याळ हिने माँ साहेब जिजाऊ यांच्या जीवनावर तर प्रेरणा सातम हिने माँ साहेब जिजाऊ यांच्या प्रेरणेतून आजची



स्त्री या विषयावर भाषण केले.

महाविद्यालयाचे डॉ. योगेश लोखंडे यांनी विद्यार्थीनींना मोलाचे मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन वैष्णवी अशोक म्हात्रे, आभार प्रदर्शन रिया गोविलकर हिने केले. याप्रसंगी प्रा. सुमीत चव्हाण, प्रा. ऋषिकेश चोगले, प्रा. निखत राजपूरकर, करिष्मा शहा, प्रिया पवार, मनीषा श्रीवर्धनकर, अभिजित पुसाळकर आणि महाविद्यालयाच्या विद्यार्थिनी उपस्थित होत्या.

# महाविद्यालयाची निवासी शिबिराची सांगता

**। बोर्लीपंचतन । प्रतिनिधी ।**

श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरसी महिला विद्यापीठ, मुंबई संचालित महर्षी कर्वे आदर्श महिला महाविद्यालय श्रीवर्धन यांच्या राष्ट्रीय सेवा योजना विशेष श्रमसंस्कार सात दिवशीय निवासी मौजे भोस्ते येथे डॉ. सुलक्षणा माने, डॉ. योगेश लोखंडे, प्रा. सुमित चव्हाण यांच्या नेतृत्वात ५ ते ११ जानेवारी दरम्यान संपन्न झाले. शिबिराचे उद्घाटन भोस्ते ग्रुप ग्राम पंचायतचे ग्रामपंचायत अधिकारी हरेश मेंदडकर व विलास जावळेकर यांच्या हस्ते झाले. शिबीर परिसर स्वच्छता, ग्राम स्वच्छता, आरोग्य व निराधार सर्वेक्षण, वनराई बंधारा, एक दिवस प्राथमिक शाळेसाठी, आरोग्य तपासणी शिबीर,



श्रमसंस्कार दत्तक खेडे भोस्ते येथे करण्यात आले. यावेळी सर्व काही ऑनलाईन, समाज सक्षमीकरणाचे साधन स्त्री उच्चशिक्षण, मी पृथ्वी बोलते, पाणलोट व्यवस्थापन इ. विषयांवर पथनाट्यातून जनजागृती करण्यात अली.

शिबिराची सांगता श्रीवर्धन पोलिस उपअधीक्षक सविता गर्जे यांच्या प्रमुख उपस्थितीत झाली. त्यांनी विद्यार्थिनींना महिला सुरक्षा, सायबर सुरक्षा, स्त्री उच्चशिक्षण, संविधानातील महिलांसाठीच्या विशेष हक्क-अधिकार यावर मार्गदर्शन केले.

या शिबिरास दिक्षा गुरव, स्नेहा कदम, सलोनी गुडेकर, अवंतिका देवकर यांनी भेट दिली.

या शिबिरात एकूण ५० विद्यार्थीनी स्वयंसेविकांनी सहभाग नोंदविला होता. शिबीर यशस्वी करण्यासाठी मनीषा श्रीवर्धनकर, प्रिया पवार, प्रा. तृप्ती विचारे, प्रा. ह्रिषीकेश चोगले, प्रा. निखत राजपूरकर, प्रा. जस्मिन कदम, दिनेश भूषणे, केदार जोशी, प्रभाकर चोगले, आकाश सावंत, अभिजीत पुसाळकर यांचे विशेष सहकार्य मिळाले. ग्रामस्थांमध्ये गणेश जावळेकर, राधेश्याम पानवलकर, सुरेश वैराग, जीवनेश्वर जावळेकर, चंद्रकांत जावळेकर, अंजली पडवळ, प्रतिभा पडवळ, संतोष बोतरे, सुरज गोसावी यांच्या मोलाच्या सहकार्यातूनच शिबीर यशस्वी झाले.

## क्लासिफाईड
जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी

- बागायती वाडी विक्री -१३ गुंठे (घर, नारळ, सुपारी, विहीर) @ २७ लाख पर गुंठा समुद्रापासून २०० मीटर मालक - सुहास माळी गाव-थळ, गुंजाळ आळी, अलिबाग मो. - ८७७९८०५३५३
- विकणे आहे : अलिबाग-कुरूळ येथे ८.२८ गुंठे एन.ए. प्लॉट विकणे आहे. संपर्क : ९६२३८४९३४९
- जागा भाड्याने देणे आहे. चेंढरे अलिबाग येथील स.नं. ८३/२ अलिबाग-चेंढरे बायपास रोड लगत, रॉयल एनफिल्ड शोरूम लगत, पी.एन.पी. शोरूमच्या वरती-बेसमेंट व पहिला मजला सुमारे २५००.०० चौ. फुटाची जागा भाडे तत्वावर देणे आहे. संपर्क : ९८२२०५४७८८
- रिसॉर्टमध्ये कामासाठी एका जोडप्याची आवश्यकता आहे. ठिकाण -सासवणे, संपर्क- +९१९६०७१०२३५७
- प्रा.लि. कंपनीसाठी फ्लॅट, बंगलो भाड्याने व विकत पाहिजे. प्रत्यक्ष मालकांनी फोन करणे. ९८३४९९१२३६
- नवीन बिल्डींग मधील १ BHK फ्लॅट भाड्याने व विकत देणे आहे. मो. ९९२३६०५४४६
- 1st floor ८५० sqft 4 bed२४ तास पाणी, पार्किंग, भाड्याने आणि दोन दुकाने १०x१०(५०००/-महिना भाडे) १०x५ (४०००/-महिना भाडे) भाडेतत्वावर देणे आहे. संपर्क : ९४२३३७७४२२

जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१

## प्रतिक्षालयामध्ये सुविधा नावापुरतीच | कर्जतमध्ये रेल्वे प्रशासनाचा दिखावा

# सर्वसामान्य प्रवाशांना प्रवेश बंद

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

**कर्जत स्थानकाचा विस्तार सुरु असून त्या माध्यमातून कर्जत स्थानकात वातानुकिलत प्रतिक्षालय उभे राहिले आहे. व्यवसायिक तत्वावर विकसित करण्यात आलेल्या या प्रतिक्षालयाचे उद्घाटन वाणिज्य निरीक्षकांच्या हस्ते करण्यात आले. परंतु, त्या ठिकाणी सर्वसामान्य प्रवाशांना प्रवेश बंद असणार आहे, त्यामुळे कर्जत स्थानकातून दररोज प्रवास करणारे प्रवासी यांच्यात नाराजी निर्माण झाली आहे.**

कर्जत रेल्वे स्थानकावर रेल्वे प्रशासनाचा भर प्रवाशांच्या सोयीपेक्षा आर्थिक लाभावर अधिक असल्याचे दिसून येत आहे. स्थानकावरील फलाट क्रमांक एक आणि दोन येथील प्रतिक्षालये व्यावसायिक तत्वावर वातानुकूलित करण्यात आली




आहे. त्याठिकाणी प्रवेशासाठी शुल्क आकारले जात आहे. त्यामुळे गोरगरीब व सर्वसामान्य प्रवाशांना साध्या प्रतिक्षालयांचाही लाभ घेणे अवघड झाले आहे.

एकीकडे प्रवाशांकडून शुल्क आकारून वातानुकूलित प्रतिक्षालये उभारली जात आहेत, तर दुसरीकडे रेल्वे सुरक्षेचा कणा मानल्या जाणाऱ्या शासकीय रेल्वे पोलीस विभागाची अवस्था मात्र, दयनीय आहे. कर्जत रेल्वे स्थानकातील जिआरपी कार्यालय आजही ब्रिटिशकालीन, जिर्ण व असुरक्षित इमारतीत सुरू आहे. पावसाळ्यात गळती, अपुरी जागा, जुनाट संरचना व मूलभूत सुविधांचा अभाव यामुळे अधिकारी व कर्मचाऱ्यांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. काही महिन्यांपूर्वी स्थानकातील आरपीएफ कार्यालयाचे आधुनिकीकरण करण्यात आले. सुसज्ज कार्यालय, वातानुकूलन व आधुनिक सुविधा यामुळे आरपीएफ अधिकारी-कर्मचाऱ्यांना प्रसन्न वातावरणात काम करण्याची संधी मिळाली आहे.

रेल्वे प्रशासनाचा दुजाभाव स्थानकावर कार्यरत असलेल्या दोन सुरक्षा यंत्रणांमध्ये असा प्रचंड फरक का, असा प्रश्न आता उपस्थित होत आहे. स्थानक सौंदर्याकरण आणि व्यावसायिक सुविधा गरजेच्या असल्या तरी प्रवाशांच्या सुरक्षेची जबाबदारी पेलणाऱ्या जिआरपी कार्यालयाचे आधुनिकीकरण प्राधान्याने होणे आवश्यक आहे अशी ठाम भूमिका आता प्रवासी संघटनांकडून मांडली जात आहे. जर जिआरपी अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना आधुनिक, सुरक्षित व सुसज्ज कार्यालय उपलब्ध करून दिले, तर तणावपूर्ण कामकाजात त्यांना सकारात्मक वातावरण मिळेल आणि त्याचा थेट फायदा प्रवाशांच्या सुरक्षेला व सेवेच्या गुणवत्तेला होईल. रेल्वे प्रशासनाने याकडे गांभीर्याने लक्ष देऊन तातडीने जिआरपी कार्यालयाच्या नूतनीकरणाचा निर्णय घ्यावा, अशी जोरदार मागणी होत आहे.

## दिपा फाळके सन्मानित

**अलिबाग :** आविष्कार फाऊंडेशन संस्था कोल्हापूर यांच्यातर्फे नुकताच राज्यस्तरीय क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले पुरस्कार वितरण सोहळा सातारा



जिल्ह्यातील शिरवळ येथे पार पडला. सदर पुरस्कार शिक्षण क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या रायगड जिल्ह्यातील अलिबाग तालुक्यातील नवेदर बेली शाळेतील मुख्याध्यापिका दिपा फाळके यांना सन्मानित करण्यात आले. त्याबद्दल त्यांच्यावर सर्व स्तरातून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

# महामार्गावर मोकाट गुरांचा सुळसुळाट

। कोलाड । प्रतिनिधी ।

मुंबई-गोवा महामार्गावर विशेषतः कोलाड सुकेळी ते वाकण दरम्यान मोकाट गुरांना वाली नसल्याचे अनेकदा समोर आले आहे. दुसरीकडे मार्गावरच गोठण मारून बसणारी ही मोकाट गुरे आपघाताला कारणीभूत ठरत असून या मोकाट गुरांचा बंदोबस्त करण्याची मागणी जनतेतून पुन्हा केली जात आहे. मार्गावर आंबेवाडी कोलाड नाक्यावर, भिरा फाटा, तटकरे कॉम्प्लेक्स हॉटेल प्रभाकर, कोलाड पोलीस चौकी, इंडियन ऑईल पेट्रोल पंप समोर तसेच खांब, सुकेळी खिंड, अशा ठिकाणी तसेच ही जनावरे गर्दीच्या ठिकाणीच तसेच रस्त्याच्या मधोमध ठाण मांडून बसत असल्याने रात्री अपरात्री अपघाताला निमंत्रण देणारी ठरत असून याला जबाबदार कोण असा संतप्त सवाल प्रवाशी वर्गातून व्यक्त केला जात आहे.



मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्ग ६६ वरील कोलाड, खांब, सुकेळी खिंड विशेषतः वाकणच्या पुलावर रस्त्यात गुरे उभी अथवा बस्तान मांडून बसलेली असतात. त्यामुळे वाहनचालकांसह प्रवाशांच्या जीवाला धोका निर्माण झाला आहे. शेतकऱ्यांनी गुरांना मात्र वाऱ्यावर (मोकाटच) सोडली आहेत त्यावर कोण नियंत्रण ठेवणार? मुंबई-गोवा महामार्गालगत असणाऱ्या शेतकऱ्यांच्या जमिनी धनदांडग्यानी खरेदी केल्या असून त्या जागेभोवती तारेचे कंपाऊंटड केले असल्यामुळे ही गुरे महामार्गावरील रस्त्याच्या मधोमध बस्तान मांडून बसत असल्याचे चित्र पहावयास मिळत आहे.

मुंबई-गोवा हायवेवर मोकाट गुरांचा प्रश्न दिवसेंदिवस गंभीर होत चालला आहे. ही उनाड गुरे दिवसा जवळच असलेल्या जंगलात जातात व सायंकाळी सातच्या नंतर आसरा म्हणून रस्त्यावर ठाण मांडून बसतात. ही रस्त्यात बसलेली गुरे रात्रीच्या अंधारात दिसत नसल्याने अनेक वेळा वाहनांमुळे गुरे जखमी होतात तर अनेक गुरे दगवतात तर कधी वाहन चालक जखमी होताना दिसत आहेत. यामुळे उनाड गुरांचा बंदोबस्त करून त्यावर संबंधितांकडून उपाययोजना करण्यात यावी, अशी मागणी होत आहे.

> मुंबई-गोवा महामार्गावर असंख्य ठिकाणी मोकाट गुरांचा कळप रस्त्यावर वाट अडवून ठाण मांडून बसलेले असतात तर काही ठिकाणी उभे राहतात. त्यामुळे रस्त्यावरून प्रवास करताना या गुरांचा प्रचंड त्रास होत आहे.अशा वेळी एखाद्या वाहनाने गुराचा अपघात झाला तर गुरांचा मालक धावत येतो व भरपाई करून द्या अशी मागणी करीत असतो. परंतु एखाद्या गुरामुळे वाहन चालक जखमी झाला तर गुरांचा मालक फिरकत नाही. यामुळे या मोकाट गुरांचा बंदोबस्त करावा.
>
> दिनकर सानप,
> सामाजिक कार्यकर्ते

# पोलादपूर शहरात होम मिनिस्टरला प्रतिसाद

। पोलादपूर । प्रतिनिधी ।

राज्यातील राजकारणामध्ये शिवसेना उध्दव बाळासाहेब ठाकरे आणि महाराष्ट्र नवनिर्माण सेना हे दोन्ही पक्ष एकत्र आल्यानंतर पोलादपूरसारख्या मुंबई गोवा राष्ट्रीय महामार्गावरील गांववजा शहरामध्ये चैतन्य निर्माण झाले आहे.

या दोन्ही पक्षांच्या संयुक्त विद्यमाने मकरसंक्रांतीनिमित्त होम मिनिस्टर या महिलांसाठी खुल्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले असता पैठणीच्या खेळातील अंतिम विजेत्या योगिता विराज दरेकर ठरल्या तर उपविजेत्या कस्तुरी घाटे आणि आरती कासार यांना तिसरा क्रमांक देऊन पैठणीचे बक्षिसही मान्यवर महिलांच्याहस्ते प्रदान करण्यात आले. गृहिणी, महिला पोलीस, कवींद्र परमानंद मठगल्ली, राजकीय क्षेत्र, सामाजिक क्षेत्र, दशानेमा गुजराती तसेच सैनिकनगर, बाजारपेठेतील महिलांनी या होम मिनिस्टर खेळ पैठणीचा करमणूक प्रधान खेळात सहभाग घेतला.

यावेळी सर्वात मोठी चंद्रकोर दुर्वा दर्पण दरेकर, सर्वात लांब मोठे केस सिध्दी अथर्व बुटाला, सर्वात जास्त बांगड्या मयुरा गांधी, सर्वात मोठे मंगळसूत्र पूनम कदम यांना वैयक्तिक बक्षिसे प्रदान करण्यात आली. यावेळी रोहन सकपाळने होम मिनिस्टर खेळ पैठणीचा कार्यक्रमाचे सूत्रसंचलन केले.

# तोतया पोलिसांनी केली डॉक्टरची लूट

**पनवेल :** खारघर परिसरात डॉक्टरला पोलीस असल्याची भीती दाखवून चौकडीने तब्बल १३ लाख २५ हजारांची लूट केली. याबाबत सोमवारी खारघर पोलीस ठाण्यात तक्रार देण्यात आली असून गुन्हा दाखल करण्यात आला आहे. कॅनरा बँकेसमोरील रस्त्यावर ही घटना घडली. डॉ. मनीष शिवाजी शिंदे यांनी दिलेल्या तक्रारीनुसार चार अनोळखी व्यक्तींनी भरलेली मोटार त्यांच्यासमोर आली. त्या मोटारीतून बाहेर पडलेल्या व्यक्तींकडे काट्या आणि डोक्यात पोलिसांची टोपी होती. त्यामुळे डॉक्टर शिंदे यांना हे पोलीस असल्याचा समज झाला. चार आरोपींनी त्यांना भीती दाखवून जबरी लूट केल्याने खारघरमध्ये व्यावसायिकांमध्ये घबराट पसरली आहे.

# सुतारवाडीचे माजी विद्यार्थी २३ वर्षांनी एकत्र



। सुतारवाडी । प्रतिनिधी ।

सुधागड एज्युकेशन सोसायटीच्या द. ग. तटकरे माध्यमिक विद्यालय सुतारवाडीच्या १९९५ / २००२चे माजी विद्यार्थी विद्यार्थिनी एकत्र येऊन गेट-टुगेदर चा कार्यक्रम यशस्वीरित्या पार पाडला. यावेळी माजी शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

यावेळी माजी विद्यार्थ्यांनी गुलाबाच्या फुलांच्या पाकळ्यांचा वर्षाव करून उपस्थित यांचे स्वागत केले. त्यानंतर दीप प्रजनन झाल्यानंतर वर्ग मित्र सुनील कोदे याच्या निधनाबद्दल श्रद्धांजली वाहण्यात आली. भारताच्या रक्षणासाठी आर्मीमध्ये गेलेला विजय शिंदे हा शाळा मित्र नायक पदावर कार्यरत आहे त्याचे अभिनंदन करून कॉन्फरन्स कॉलद्वारे भेटवस्तू देऊन विशेष कौतुक केले.

प्रत्येक विद्यार्थ्यांनी आपला परिचय करून देताना जुन्या आठवणींना उजाळा देताना सांगितले आपण आज भव्य अशा इमारतीमध्ये आपला गेट-टुगेदर सादर करत असलो तरी आपल्या जुन्या बैठ्या इमारतीची आठवण आजही आमच्या स्मरणात आहे. खो-खो मैदान, लांब उडी मैदान, मैदानामध्ये असलेला उंबराचे झाड, आंब्याचा झाड अशा जुन्या गोड आठवणींना उजाळा देताना आपल्याला आपल्या गुरुजनाने दिलेल्या ज्ञानाचा आमच्या जीवनात आम्ही यशस्वी झालो असल्याचे प्रत्येकाने सांगितले. त्यानंतर उपस्थित शिक्षकांनी आपले मनोगत व्यक्त करून जुन्या आठवणींना उजाळा दिला.

# कर्जतमध्ये तिरंगी लढतीची शक्यता

। नेरळ । प्रतिनिधी ।

कर्जत तालुक्यात रायगड जिल्हा परिषदेचे सहा जिल्हा परिषद गट आहेत.तर कर्जत पंचायत समितीचे १२ गण असून मार्च २०२३ पासून लांबलेली सार्वत्रिक निवडणूक पाच फेब्रुवारी रोजी होणार आहे. त्यामुळे कर्जत तालुक्यातील राजकीय वातावरण तापले असून या निवडणुकीसाठी तिरंगी लढत कर्जत तालुक्यात होऊ शकते असे राजकीय चित्र निर्माण झाले आहे.

कर्जत तालुक्यात रायगड जिल्हा परिषदेचे सहा गट असून त्यात कळंब, कशेळे, माणगाव तर्फे वरेडी, नेरळ, कडाव आणि मोठे वेणगाव या नाव बदलून तयार केलेल्या नवीन गटासाठी निवडणूक होत आहे. तालुक्यातील कळंब जिल्हा परिषद गट अनुसूचित जमाती राखीव असून कशेळे गट हा अनुसूचित जमाती महिला राखीव आहे.माणगाव तर्फे वरेडी गट नागरिकांचा मागास प्रवर्ग महिला राखीव असून नेरळ जिल्हा परिषद गट सर्वसाधारण महिला राखीव आहे.

कडाव जिल्हा परिषद गट नागरिकांचा मागास प्रवर्ग राखीव असून मोठे वेणगाव हा गट अनुसूचित जमाती राखीव आहे. कर्जत पंचायत समिती पोशीर गणामध्ये नागरिकांचा मागास प्रवर्ग महिला राखीव, कळंब गणामध्ये अनुसूचित जमाती महिला राखीव तर कशेळे गणामध्ये अनुसूचित जमाती, पाथरज गणामध्ये अनुसूचित जमाती महिला राखीव माणगाव तर्फे वरेडी गणामध्ये सर्वसाधारण, उकरूल गणामध्ये नागरिकांचा मागास प्रवेश मागील राखीव, नेरळ गणामध्ये सर्वसाधारण, दामत गणामध्ये सर्वसाधारण,कडाव गणामध्ये सर्वसाधारण महिला राखीव वाकस गणामध्ये सर्वसाधारण तर मोठे वेणगाव गणामध्ये नागरिकांचा मागास प्रवर्ग आणि बीड गणामध्ये सर्वसाधारण महिला असे आरक्षण आहे.सध्याची कर्जत तालुक्याची राजकीय स्थिती लक्षात घेता तीन वर्षांनी होत असलेल्या स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीसाठी मोठी राजकीय चुरस निर्माण झाली आहे.त्यात शिवसेना शिंदे गटाने स्वबळाचा नारा दिला असल्याने निवडणुकीतील चुरस वाढली आहे.त्यात राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गट आणि शिवसेना ठाकरे गट यांची आघाडी झाली आहे.

भारतीय जनता पक्ष यांच्याकडून स्वबळाची चाचपणी केली जात आहे. शेतकरी कामगार पक्ष, राष्ट्रवादी शरद पवार गट, राष्ट्रीय काँग्रेस, कम्युनिस्ट पक्ष हे इंडिया आघाडीचे घटक पक्ष या निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेस शिवसेना ठाकरे गट यांच्या कर्जत परिवर्तन आघाडी मध्ये सहभागी होणार का? हे पाहावे लागणार आहे. कर्जत तालुक्यातील राजकीय गुट्टा आघाड्या यांचे चित्र पुढील आठवड्यात स्पष्ट होण्याची शक्यता आहे. त्यावेळी कर्जत तालुक्याचं खरे चित्र स्पष्ट होणार आहे, मात्र कर्जत तालुक्यातील तिरंगी लढती होण्याची शक्यता आहे.

# चंद्रभागा शिंगडे यांचे निधन

। सुकेळी । प्रतिनिधी।

दि. नागोठणे जवळच असलेल्या बाळसई गावातील चंद्रभागा दौलत शिंगडे यांचे वयाच्या ८० व्या वर्षी बुधवारी (दि. १४) निधन झाले. महत्वाचे म्हणजे मकरसंक्रांतींचा दिसत तसेच एकादशीच्याच दिवशी त्यांचे मरण आले ही त्यांची पुण्याई म्हणावी लागेल. कै. चंद्रभागा यांचा अल्पपरिचय द्यायचा झाला तर त्यांचे व्यक्तिमत्त्व हे अतिशय मनमिळाऊ स्वभावाचे होते. गावामध्ये लग्नकार्य असलल्यानंतर हळदीची किंवा लग्णाची गाणी बोलण्यामध्ये त्यांचा मोलाचा वाटा होता. त्यांच्या अल्पशा आजाराच्या निधनाने संपूर्ण बाळसई गावामध्ये शोकाकूल वातावरण पसरले होते. त्यांच्यावर (दि. १४) रोजी रात्री ९ वाजता बाळसई. वैकुंठभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात मुलगा दामोदर, श्रीधर, मुली तारामती मारुती शिर्के, सुविधा भोसले असा मोठा मित्र परिवार आहे. त्यांचे दशक्रिया विधी (दि.२३) तसेच उत्तरकार्य (दि.२६) बाळसई येथे होणार असल्याचे शिंगडे परिवाराकडून सांगण्यात आले आहे.

# ममदापूर ग्रा.पं.मधील स्वच्छतेची वाहने नंबर प्लेटविना

। नेरळ । प्रतिनिधी ।

ममदापूर ग्रामपंचायतीमधील नागरी वस्ती वाढत आहे. वाढलेल्या नागरी वस्तीमधील कचरा संकलन करण्यासाठी वाहने ग्रामपंचायतीचे मालकीची आहेत. या वाहनाची नोंद विभागीय परिवहन वाहतूक विभागाकडे झाली आहे किंवा नाही हा प्रश्न निर्माण झाला आहे. दरम्यान नंबर प्लेट नसलेली वाहने ममदापूर परिसरात फिरत असून आरटीओ काही कारवाई करणार आहेत का नाही? असा प्रश्न उपस्थित केला जात आहे.

ममदापूर ग्रामपंचायत आपल्या कामापेक्षा नियमबाह्य कारभारामुळे चर्चेत आली आहे. ग्रामपंचायतीच्या कचरा वाहतूक करणाऱ्या घंटागाड्या चक्क नंबर प्लेटविना रस्त्यावर धावत आहेत. वसाहतींची संख्या वाढत असताना, प्रशासकीय जबाबदारी पार पाडणाऱ्या ग्रामपंचायतीनेच वाहतुकीचे नियम धाब्यावर बसवल्याने नागरिकांमधून आश्चर्य व्यक्त केले जात आहे.

ममदापूर ग्रामपंचायतीचा कचरा संकलन करणाऱ्या घंटागाड्या चक्क नंबर प्लेटशिवाय सार्वजनिक रस्त्यांवर धावत आहेत. वाढत्या नागरीकरणामुळे वसाहतींची संख्या वाढत असताना, स्वच्छतेची धुरा सांभाळणारी ही वाहनेच वाहतूक नियमांचे उल्लंघन करत असल्याचे धक्कादायक चित्र समोर आले आहे. ग्रामपंचायत प्रशासनाने याकडे सोयीस्कर दुर्लक्ष केल्याचे दिसत आहे.

# नेरळ गंगानगरमध्ये कचऱ्याचा प्रश्न गंभीर

। नेरळ । वार्ताहर ।

**नेरळ ग्रामपंचायत प्रशासक अधिकारी सुजित धनगर यांनी घटनास्थळी पाहणी केली. यावेळी संबंधित जागा शेतकऱ्यांची असल्याचे सांगण्यात आले. मात्र अनेक वर्षांपासून सार्वजनिक वापरात असलेली कचराकुंडी कोणाच्या परवानगीने आणि कोणत्या अधिकाराने तोडण्यात आली?असे सांगत शासकीय मालमत्तेचे नुकसान केल्याप्रकरणी संबंधितावर फौजदारी गुन्हा दाखल करणार असल्याचे सांगितले.**

नेरळ-गंगानगर परिसरात अनेक वर्षांपासून अस्तित्वात असलेली आणि शासन निधीतून उभारलेली कचराकुंडी माझा जागा असल्याचे सांगत एका व्यक्तीने अचानक रातोरात तोडली आहे. त्या ठिकाणी झोपडी बांधण्यात आली असून परिसरातील कचरा टाकायचा कुठे असा प्रश्न निर्माण झाला आहे. कचरा टाकण्यासाठी जागाच नसल्याने नागरिकांमध्ये तीव्र संतापाची लाट उसळली आहे. गंगानगर व आसपासच्या परिसरातील सुमारे १०० ते २०० फ्लॅटधारकांची कचरा टाकण्याची सोय एका झटक्यात हिरावून घेण्यात आली असून ग्रामपंचायतीने अद्याप कोणतही कारवाई केली नाही.

कचराकुंडी ही नेरळ ग्रामपंचायत मार्फत अधिकृतपणे निश्चित करण्यात आलेल्या जागेवर उभारण्यात आली होती. विशेष म्हणजे या कुंडीची दोन वेळा शासन निधीतून दुरुस्ती करून नव्याने बांधकाम करण्यात आले होते. तिसऱ्यांदा तत्कालीन सदस्यांनी स्वतःच्या निधीतून दुरुस्ती केली होती. कुंडीवर कुंडी क्रमांक तसेच शासन निधीतून बांधकाम असल्याची नोंद निळ्या अक्षरात स्पष्टपणे करण्यात आलेली होती. ११ जानेवारी रोजी रात्रीच्या सुमारास ही कचरा कुंडी बेकायदेशीररित्या तोडण्यात आली. त्या जागी चिकन शॉप सुरू करण्याची तयारी असल्याची माहिती समोर आली आहे. शासन निधीतून बांधलेली सार्वजनिक मालमत्ता तोडणे हे थेट गुन्हेगारी कृत्य असून, संबंधितांवर तात्काळ कठोर कारवाई होणे गरजेचे असल्याची मागणी गंगानगर परिसरातील रहिवाशांनी केला आहे.

या घटनेनंतर गंगानगर येथील रहिवाशांनी नेरळ ग्राम पंचायत कार्यालयात चौकशी केली असता, या ठिकाणी कोणतीही परवानगी देण्यात आलेली नसून सदर बांधकाम पूर्णतः बेकायदेशीर असल्याचे स्पष्ट झाले आहे. हे बांधकाम तातडीने हटवणे आवश्यक असल्याचे ग्रामपंचायतीकडून सांगण्यात आले.

> अनेक वर्षांपासून असलेली कचराकुंडी तोडल्याने आमच्या परिसरातील नागरिकांनी कचरा टाकयचा कुठे असा प्रश्न निर्माण झाला आहे. ग्रामपंचायतीची घंटा गाडी देखील आमच्या परिसरात येत नाही. सुका कचरा जाळता येतो, मात्र ओल्या कचऱ्यामुळे दुर्गंधी, अस्वच्छता आणि आरोग्याचा प्रश्न निर्माण झाला आहे. त्यातच या ठिकाणी चिकन शॉप सुरू झाल्यास रक्ताचे पाट, दुर्गंधी, माशा व रोगराई पसरण्याची भीती आहे.
>
> -संदेश जाधव
> अध्यक्ष गंगानगर रहिवाशी संघ


## कोंकण रेल्वे कॉर्पोरेशन लिमिटेड
(भारत सरकारचा उपक्रम)
सादर सेवा

### शुद्धिपत्रक

मुख्य वाणिज्य व्यवस्थापक, कोकण रेल्वे कॉर्पोरेशन लिमिटेड यांच्या वतीने, इच्छुक पक्षांकडून आयआरईपीएस ई-निविदा प्रणालीद्वारे "कोकण रेल्वेवरील रत्नागिरी स्थानक येथे रेल आर्केडची उभारणी, संचालन व व्यवस्थापन" या कामासाठी खुली निविदा आमंत्रित केली होती, जी 07/01/2026 रोजी वृत्तपत्रात प्रसिद्ध करण्यात आली होती. **सदर निविदा सूचना क्रमांक सीओ-16034/3/4/2025-सीओएमएम (दिनांक 05/01/2026) बाबतचे शुद्धिपत्रक खालीलप्रमाणे जारी करण्यात येत आहे:- निविदा अर्ज विक्री कालावधी :** 16/01/2026 ते 06/02/2026, **निविदा सादर करण्याची अंतिम तारीख :** 06/02/2026 रोजी सायं. 17:00 वाजेपर्यंत, **निविदा उघडण्याची तारीख :** 06/02/2026 रोजी सायं. 17:30 वाजता. अधिक माहितीसाठी www.ireps.gov.in या संकेतस्थळाला भेट द्यावी.

MAHAGENCO
Maharashtra State Power Generation Co. Ltd.

## E-TENDER NOTICE

**Tender Specification No.** Civil-III/KGSC Pophali/Rfx No.3000064942, 3000064943, 3000064944, 3000064945, 3000064946, 3000064947, 3000064948, 3000064949, 3000064950, 3000064951, 3000064952, 3000064953, 3000064954, 3000064955/FY-2025-26

**Name of work:**

1) Work of providing ACP paneling at entrance of stage III power house, KGSC, Pophali.
2) Construction of bituminous approach road to Package Shed, Stage – III, KGSG, Pophali.
3) Construction of bituminous approach road at Stage III Power House at KGSC, Pophali.
4) Providing and fixing concrete trench covers, at T.Y., Switchyard, stage III at KGSC, Pophali.
5) Construction of security Chaukies at various locations in Powerhouse premise at KGSC, Pophali.
6) Construction of bituminous road at Pedhambe switchyard, Stage III Power House at KGSC, Pophali.
7) Construction of Box Culvert at stage III switchyard road, at KGSC, Pophali.
8) Upgradation of control room at Stage-III, KGSC, Pophali.
9) Providing, laying Kotah flooring at machine hall, generator floor of St. III, Power house, KGSC Pophali
10) Construction of bituminous internal roads at Pedhambe switchyard stage -III, KGSC, Pophali.
11) Work of raising compound wall at switchyard stage -III, KGSC, Pophali.
12) Construction of new Kitchen otta and toilet units at Sr. bungalow buildings at KGSC, Pophali.
13) Construction of Bituminous approach road to weigh bridge at KGSC, Pophali.
14) Providing wooden badminton court with mat at recreation club building, KGSC, Pophali.

**Sale period: -** 16.01.2026 at 11:00 Hrs. to 05.02.2026 up to17:00 Hrs.
**Submission Date :-** 06.02.2026 up to17:00 Hrs.

Kindly see the company's website https://eprocurement.mahagenco.in. For detailed tender notice.

**Contact person-** Executive Engineer (c), O/o Chief Engineer (Civil) -III, M.S.P.G. Co. Ltd., Mumbai **Fax :** ( 022)26581469 **Tel.No.**022-26474211 extn. 2590, 26472131


## जाहिर नोटिस

सर्व लोकांना या नोटिसीने कळवण्यात येते की, आमचे आशिल यांने मौजे - आंबिवली बुद्रुक, ता- कर्जत, जि- रायगड येथील मिळकत त्या मिळकतीचे मालक १. श्रीमती तारामती हरिश्चंद्र टोकरे श्रीमती. अनुसया बारकु हजारे यांच्या कडून कायम खरेदीखताने विकत घेण्याचे ठरवले असुन सदर मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे :

| सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रू.पै. |
|---|---|---|---|
| ६ | १ | १.४२.७० पैकी लिहून देणार व त्यांच्या सह हिस्सेदार यांच्या मालकीचे व ताबेकब्जा वहीवाटीचे खाते नं. २८२ च्या एकुण क्षेत्र ०.७१.३५ यापैकी खरेदीचे क्षेत्र ०.४५.०० | १८.५६<br>८.८४ |

सदर मिळकतीच्या अनुषंगे खरेदी व्यवहाराबाबत आमच्या अशिलाने जमीन मालकांशी बोलणी केलेली आहे, तरी वर नमूद मिळकतीच्या अनुषंगे आमचे अशिल व जमीन मालकांच्यादरम्यान होणाऱ्या खरेदी व्यवहारास कोणाचीही हरकत अथवा तक्रार असल्यास तसेच कोणत्याही वित्तीय बॅक संस्था यांच्याशी तारण बोजा अथवा अन्य कुणाशीही गहाणखत, साठेखत, मृत्युपत्र, अथवा वहिवाटीसंबंधी कोणतीही तक्रार असल्यास त्यांनी हि नोटिस प्रसिद्ध झाल्यापासुन ७ दिवसात आवश्यक त्या कायदेशीर कागदपत्रांसहीत खालील नमूद वकीलांच्या पत्त्यावर लेखी हरकत नोंदवावी. विहित मुदतीत कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत अथवा तक्रार न आल्यास सदरहू मिळकत हि निर्वेध व बोजारहित असल्याचे मानून आमचे अशिल सदरहू व्यवहार पूर्ण करतील. मागाहून कोणाचीही कोणत्याही प्रकारची कसलीही हरकत विचारात घेतली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

ठिकाण : कर्जत
दि: १६/०१/२०२६

वकील
**ॲड. सचिन संजय सुर्वे**
पत्ता : नाथ सदन, आमराई रोड,
ता. कर्जत, जि. रायगड, ४१०२०१.
मो. नं ९०२८५४६१५७/७३८५५४६१५७

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी आनंदवन कृषी फलोधान विकास सहकारी संस्था मर्यादित, नोंदणी क्रमांक आरजीडी/केजेटी/एजीआर (ओ)/६०५/८७, हंबरपाडा, दहिवली, ता.कर्जत, जि.रायगड, दिनांक २०/१०/१९८७ रोजी नोंदविलेल्या संस्थे मधील डॉ. राजकुमारी सिन्हा यांचे मालकीचे १) शेतजमिन प्लॉट क्र.१६, क्षेत्र ४० गुंठे व त्यांचे भाग प्रमाणपत्र क्र.३९ ज्यांचे भाग क्र.१९१ ते १९५ दोन्ही धरुन असे एकुण ५ भाग आणि २) शेतजमिन प्लॉट क्र.१६ अ, क्षेत्र ४० गुंठे व त्यांचे भाग प्रमाणपत्र क्र.१९ ज्यांचे भाग क्र.९१ ते ९५ दोन्ही धरुन असे एकुण ५ भाग डॉ. राजकुमारी सिन्हा यांचे नावे असलेले खरेदी करण्याचे ठरविलेले आहे. तरी वर नमूद मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास, आणि किंवा त्यांची आमचे अशिलांच्या विक्रीच्या व्यवहारास हरकत असल्यास, त्यांनी तसे आम्हास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून २१ (एकवीस) दिवसांत लेखी पुराव्यासह कळवावे. वरील मुदतीत कोणीही हरकत न घेतल्यास, वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कसल्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही, किंवा असल्यास, तो हक्क हितसंबंध त्यांनी आमचे अशिलांच्या लाभात सोडून दिलेला असून, त्यांची आमचे अशिलांच्या विक्रीच्या व्यवहारास कोणतीही हरकत नाही, असे समजण्यात येऊन आमचे अशिल विक्रीचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही.

मो:-
९३२६२३६९२३
९६८९६९९५९५

**ॲड. प्रवीण शांताराम खडे**
पत्ता : २, 'लक्ष्मी सदन' जुने एस.टी. स्टॅण्ड,
मु.पो. नेरळ, ता. कर्जत, जि. रायगड. ४१०१०१

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविणेत येते की मौजे निंबोडे ता. खालापुर जि. रायगड येथील हक्कनोंदीस वर्णन असलेली जमिन मिळकत आमचे आशिलांनी कब्जेदारांकडून खरेदी करण्याचे ठरविले आहे. सदर जमिन मिळकतीचे वर्णन खालील प्रमाणे.

**मौजे. निंबोडे ता. खालापुर जि. रायगड येथील जमिन मिळकत**

| जमिन मालकाचे नाव | गट नं | क्षेत्र (हे. आर. पॉ) | आकार (रू.पै.) |
|---|---|---|---|
| श्री. रमेश गोविंद पारंगे | ४५/२ | एकुण क्षेत्र ०-५२-५० हे.आर.पॉ यापैकी श्री. रमेश गोविंद पारंगे यांचे हिश्याचे अविभक्त क्षेत्र ०-१७-५० गुंठे | ०.४० |

तरी सदर मिळकतीवर कोणाचाही गहाण, दान, लिज, विक्रीचा करार खरेदीखत पोटगीचार्ज, बक्षिस, वहीवाट, इजमेंट, बोजा, तारण, वारसा ट्रस्ट, कुळहक्क अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास त्यांनी आपली लेखी हरकत सकृतदर्शनी पुराव्यासह खाली नमुद ॲडव्होकेट यांचेकडे सदरची नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन ३(तिन) दिवसाचे आत नोंदवावी. वरील मुदतीत कोणाचीही काहीही हरकत न आल्यास सदरची मिळकत ही निर्वेध बोजारहीत असल्याचे गृहीत धरून आमचे अशिल सदर मिळकतीच्या खरेदीचा व्यवहार पुर्ण करतील. मुदतीनंतर येणाऱ्या हरकतीचा विचार केला जाणार नाही याची नोंद घ्यावी.

कर्जत
ता.१५/०१/२०२६

खरेदीदारातर्फे ॲडव्होकेट
**ॲड. महेश कमलाकर थोरवे**
पत्ता : कर्जत ता. कर्जत जि.रायगड
मो.नं.८००७५३७६५६

## जाहीर नोटीस

सदरील नोटीशीद्वारे सर्वांना सूचीत करण्यात येते की, खालील परिशिष्टामध्ये नमूद केलेल्या जमीनमिळकती संदर्भित जमीनमिळकतींचे विद्यमान मालक १. श्री. प्रभाकर गोपाळ म्हात्रे, २. श्री. अनिल गोपाळ म्हात्रे, ३. सौ. सीमा रमेश जुईकर व ४. श्रीमती. प्रतिभा प्रभाकर पाटील यांच्या खुद्द मालकीच्या व ताबे-कब्जा-वहिवाटीच्या आहेत. सदरील जमीन मिळकतींपैकी १) सौ. सीमा रमेश जुईकर व २) श्रीमती प्रतिभा प्रभाकर पाटील यांच्या हिश्श्यांची जमीनमिळकत माझ्या अशिलांनी कायमस्वरूपी व कायदेशीरपणे विकत घेण्याचे ठरविलेले आहे व तशी प्राथमिक बोलणी माझे अशील व विद्यमान मालक यांचे दरम्यान पूर्ण झालेली आहेत. संदर्भित जमीनमिळकती या पूर्णपणे बिनजोखमी, बोजाविरहीत व निर्वेध तसेच कोणत्याही प्रकारे अबाधित असल्याचा निर्वाळा विद्यमान मालकांनी माझ्या अशिलांना दिलेला आहे. असे असून देखील संदर्भित जमीन मिळकतींमध्ये जर कोणत्याही व्यक्तीचे/व्यक्तींचे खरेदीखत, करार, भाडेपट्टा, बक्षिस, गहाणखत इत्यादीद्वारे व इतर कसल्याही कराराद्वारे वा दस्ताद्वारे प्राप्त होणारे कायदेशीर हक्क/अधिकार वा हितसंबंध असतील तर अशा व्यक्तीने/व्यक्तींनी त्या आशयाची लेखी हरकत आवश्यक त्या कागदोपत्री पुराव्यासह सदरची नोटीस प्रसिद्ध झाल्या दिनांकापासून १५ दिवसांचे आत माझ्या खालील नमूद पत्त्यावर पाठवून द्यावी. विहित मुदतीनंतर आलेली कसलीही हरकत/हरकती विचारात घेतल्या जाणार नाहीत व माझे अशिल संदर्भित जमीनमिळकतींचा व्यवहार अंतिमतः पूर्ण करतील याची कृपया नोंद घ्यावी.

**-: संदर्भित जमीन मिळकतींचे परिशिष्ट :-**

| अ. क्रः | मौजे | भूमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्र (हे.आर.) | आकार (रू.पै.) |
|---|---|---|---|---|
| १. | धोकवडे, ता.अलिबाग, जि.रायगड. | ६४६/१ | ०-५९-१० | १.३१ |
| २. | धोकवडे, ता.अलिबाग, जि.रायगड. | ६४६/२ | १-४२-५० | ३३.०७ |

अलिबाग,
दिनांक : १६/०१/२०२६.

**राजेंद्र दा. पाटील,**
ॲडव्होकेट.
कृष्णवंदन-२, ब्राम्हणआळी,
कन्याशाळेसमोर, अलिबाग,
ता.अलिबाग, जि.रायगड,
मो.९८२२५२८९३१,
ई मेल-adv.rdpatil@gmail.com.

## वाचकांसाठी निवेदन

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि.चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

- मुख्य संपादक


## ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन

१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग
दागिने नविन डिझाइन्स



मोत्याचे दागिने- तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने- मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड- कुंदन- पोलकी- सेट- मॅचिंग बांगड्या- कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.

२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.
मोबाईल : ९८६०६५८५६५

# प्रलंबित मागण्यांचा प्रश्‍न ऐरणीवर

| पाली | प्रतिनिधी |

सुधागड तालुक्यातील आरोग्य आणि दळणवळणाच्या प्रलंबित प्रश्नांसाठी सोमवारी (दि.१९) धरणे आंदोलनाचे आयोजन करण्यात आले होते. परंतु, आगामी निवडणुका आणि लागू झालेली आचारसंहिता लक्षात घेता, हे आंदोलन तूर्तास स्थगित करण्यात आले आहे. प्रशासनाच्या विनंतीला मान देऊन हा निर्णय घेण्यात आल्याची माहिती आंदोलनाचे नेतृत्व करणारे महेश पोंगडे यांनी गुरुवारी (दि.१५) दिली आहे. तसेच, नवीन तारीख लवकरच जाहीर करणार असल्याचे देखील त्यांनी सांगितले.

पालीतील ग्रामीण रुग्णालयाचे रखडलेले काम तातडीने पूर्ण करून ते सेवेत दाखल करावे आणि गेल्या चार वर्षांपासून अपूर्ण अवस्थेत असलेल्या पाली बसस्थानकाचे नूतनीकरण लवकरात लवकर पूर्ण करावे, या प्रमुख मागण्यांसाठी सुधागडची जनता रस्त्यावर उतरणार होती. सत्यशोधक वारकरी संप्रदाय आणि विविध सामाजिक संघटनांच्यावतीने हे धरणे आंदोलन तहसील कार्यालयासमोर आयोजित करण्यात आले होते. भजन, कीर्तन आणि प्रबोधनात्मक पद्धतीने प्रशासनाचा निषेध नोंदवण्याची तयारी पूर्ण झाली होती. परंतु, नुकत्याच जाहिर झालेल्या निवडणुका आणि लागू झालेली आचारसंहिता लक्षात घेता, हे आंदोलन तूर्तास स्थगित करण्यात आले आहे. दरम्यान, या आंदोलनाला तालुक्यातील आदिवासी पाड्यांपासून शहरापर्यंत प्रचंड प्रतिसाद मिळाला होता. मात्र, नुकत्याच जाहीर झालेल्या निवडणुकांमुळे सर्वत्र आचारसंहिता लागू झाली आहे. या पार्श्वभूमीवर पाली पोलीस प्रशासन आणि महसूल प्रशासनाने कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ नये म्हणून आंदोलकांना हे आंदोलन पुढे ढकलण्याची विनंती केली होती. यावेळी महेश पोंगडे, तुकाराम ठोंबरे, भगवान दळवी, दीपक कदम, रोहित मिसाळ यांसह अनेक कार्यकर्त्यांनी जनतेला संयम राखण्याचे आवाहन केले असून, पुढील लढ्यासाठी सज्ज राहण्यास सांगितले आहे.



### नवी तारीख लवकरच

आंदोलन स्थगित झाले असले तरी जनतेचा निर्धार कायम असल्याचे आयोजकांनी स्पष्ट केले आहे. महेश पोंगडे यांनी पत्रकाद्वारे सांगितले की, केवळ तारीख बदलली आहे, आमचा उद्देश आणि संघर्ष कायम आहे. १ रुपया निधी देऊन या आंदोलनात सुधागडमधील सामाजिक संघटना, मान्यवर, वारकरी परिषद, विद्यार्थी, महिला आणि रिक्षा संघटनांनी मोठा पाठिंबा दिला आहे. आचारसंहितेचा कालावधी संपताच आंदोलनाची पुढची तारीख जाहीर केली जाईल, असे सांगितले.

### आचारसंहितेमुळे धरणे आंदोलन स्थगित

# ग्लोबल आंत्रप्रेन्युअरशिप समिटचे आयोजन

| माथेरान | प्रतिनिधी |

मुंबईतील जय हिंद कॉलेजमध्ये दि.१६ व १७ जानेवारी रोजी ग्लोबल आंत्रप्रेन्युअरशिप समिट आयोजित करण्यात येणार आहे. कॉलेजतर्फे आयोजित होणारे हे शिखर संमेलन गेल्या दहा वर्षांपासून विद्यार्थ्यांमध्ये उद्योजकता, नवोन्मेष आणि नेतृत्वगुण विकसित करण्यासाठी एक प्रभावी व्यासपीठ ठरत आहे. या उपक्रमाचा उद्देश विद्यार्थ्यांना उद्योजकतेकडे करिअरचा एक सक्षम पर्याय म्हणून पाहण्यास प्रोत्साहित करणे हा आहे.




आजच्या वेगाने बदलणाऱ्या व्यावसायिक वातावरणात सीमारेषा ओलांडणाऱ्या नवकल्पना आणि दूरदृष्टीपूर्ण उपाययोजनांचे महत्त्व अधोरेखित करते. यंदाच्या समिटला देश-विदेशातून उत्तम प्रतिसाद मिळत असून, प्रमुख स्टार्टअप स्पर्धेसाठी १७० हून अधिक स्टार्टअप्सची नोंदणी झाली आहे. यामध्ये आंतरराष्ट्रीय सहभागही आहे. या समिटचे मुख्य आकर्षण म्हणजे स्टार्टअप स्पर्धा, ज्यामध्ये नवोदित उद्योजक आपले व्यवसाय मॉडेल आणि कल्पना तज्ज्ञ परीक्षकांसमोर सादर करतील. या परीक्षक मंडळात नामांकित उद्योजक, व्यवस्थापकीय संचालक तसेच व्हेंचर कॅपिटल कंपन्यांचे भागीदार यांचा समावेश असेल. या स्पर्धेमुळे स्टार्टअप्सना मार्गदर्शन, दृश्यमानता आणि अनुभवी व्यावसायिकांकडून उपयुक्त अभिप्राय मिळणार आहे.

## निवडक

### आधारभूत भात खरेदी केंद्र सुरू

**नेरळ :** नेरळ विविध विकास कार्यकारी सहकारी सोसायटीच्या माध्यमातून नेरळ येथे आधारभूत भात खरेदी केंद्र हंगाम सुरू करण्यात आला. भाताची विक्री करण्यासाठी ५५० शेतकऱ्यांनी आपल्या नावाची नोंद केली असून भाताची विक्री सुरू झाल्याने शेतकऱ्यांमध्ये आनंद आहे. महाराष्ट्र स्टेट को ऑपरेटिव्ह फेडरेशन लिमिटेड आणि जिल्हा पणन कार्यालयच्यावतीने आधारभूत भात खरेदी केंद्रांना परवानगी देण्यात आली आहे. नेरळ विविध विकास कार्यकारी सोसायटी यांना हे आधारभूत भात खरेदी केंद्राच्या माध्यमातून भाताची खरेदी करण्यात आली आहे. नेरळ महसूल गोदाम येथे सोसायटीचे भात खरेदी केंद्र सुरू झाले आहे. यावेळी नेरळ विविध कार्यकारी सोसायटीचे अध्यक्ष राजेंद्र विरले यांचे हस्ते विक्रीसाठी आलेल्या भाताच्या पोत्याचे पूजन करण्यात आले. त्यानंतर सोसायटीचे उपाध्यक्ष रवींद्र झांजे यांनी वजन काट्याचे पूजन केले. तर, संचालक शशिकांत मोहिते आणि यशवंत कराळे यांनी श्रीफळ वाढविला. यावेळी शेतकरी शरद देशमुख व दिलीप शेळके आदी उपस्थित होते. नेरळ विविध कार्यकारी सोसायटी हद्दीत तब्बल ६० गावे असून या भागातील ५५० शेतकऱ्यांनी भाताची विक्री करण्यासाठी नोंदणी केली आहे. भाताची विक्री करण्यासाठी ३१ मार्चपर्यंत शेतकऱ्यांना मुभा देण्यात आली आहे. नेरळ येथील गोदामाबद्दल संचालक शशिकांत मोहिते यांनी भाताचे दर शासनाने वाढवावे, अशी मागणी केली. तर, सोसायटीचे अध्यक्ष राजेंद्र विरले यांनी गोदामाची दुरुस्ती करण्यासाठी निधी द्यावा, अशी मागणी केली.

### पाण्याच्या प्रश्नावरून जनक्षोभ

**श्रीवर्धन :** श्रीवर्धन नगर परिषदेची सार्वत्रिक निवडणूक नुकतीच पार पडली. त्याच्या काही महिने आधीपासूनच श्रीवर्धन शहरात पिण्याच्या पाण्याचा प्रश्न हा एक गंभीर प्रश्न झाला होता. श्रीवर्धन तालुक्यातील रानवली येथे असलेल्या धरणातून श्रीवर्धन शहर व धरणानजिकच्या दोन-तीन गावांना पिण्याच्या पाण्याचा पुरवठा होतो. या रानवली धरणामुळे पाण्याची चांगली सोय झाल्यामुळे श्रीवर्धन शहरातील पिण्याच्या पाण्याच्या बऱ्याचशा विहिरी बुजविण्यात आल्या तर काही वापरातून बाद झाल्या. परंतु, बरीच वर्षे धरणातुन पाणी पुरवठा करणाऱ्या जलवाहनींची दुरूस्ती न झाल्याने त्या ठिकठिकाणी फुटून ठिकठिका पाणी वाया जाऊ लागले. नंतर २०२२-२३ मध्ये सुमारे २३ कोटी रुपये खर्चून जलशुद्धीकरण प्रकल्प उभारण्यात आला. त्यावेळी जुन्या जलवाहिन्या काढून तेथे नवीन जलवाहिन्या टाकण्यात आल्या. परंतु, या नवीन टाकलेल्या जलवाहिन्या देखील काही महिन्यांतच ठिकठिकाणी वारंवार फुटत आहेत. त्यामुळे नळांतून गढूळ पाणी येणे, दोन-दोन दिवस पाणी पुरवठा बंद राहणे, कमी दाबाने पाणी येणे असे प्रकार वारंवार होऊ लागल्यामुळे नागरिक पुरते वैतागले आहेत. त्यामुळे जलवाहिन्या बदलतांना निकृष्ट दर्जाचे साहित्य वापरण्यात आले का? अशी शंका नागरिक घेऊ लागले आहेत. नगर परिषदेच्या नुकत्याच झालेल्या सार्वत्रिक निवडणुकीचे वेळीही प्रचारात या पाणी प्रश्नावर अनेक वेळा आरोप-प्रत्यारोप झाले होते. आताही शहरातील गंद्रे नाक्यावर पाण्याची लाईन लिकेज होऊन सुमारे आठवडाभर हजारो लिटर पाणी वाया जात आहे.

### चिरनेर-गव्हाणफाटा मार्गावरील पुलाचा जोडरस्ता खचला



**चिरनेर :** सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अंतर्गत येणाऱ्या चिरनेर- गव्हाण फाटा मार्गावरील चिरनेर येथील पुलाची अवस्था अत्यंत दयनीय झाली आहे. केवळ ६ महिन्यांपूर्वीच बांधलेल्या पुलाचा जोड रस्ता खचल्याने या धोकादायक मार्गावर अपघाताची मालिका सुरू होण्याची भीती निर्माण झाली आहे. प्रशासनाच्या दुर्लक्षितपणामुळे स्थानिक नागरिक व वाहन चालक तीव्र संताप व्यक्त करत आहेत. गावातील सांडपाणी बाहेर काढण्यासाठी चिरनेर येथे हा पूल बांधण्यात आला होत. परंतु, सहा महिन्यातच पुलाला जोडणारा हा रस्ता खचल्याने बांधकामाच्या दर्जावर प्रश्नचिन्ह निर्माण झाला आहे. रस्ता खचल्यामुळे तिथे मोठी कपारी तयार झाली असून वेगाने येणाऱ्या दुचाकी आणि लहान वाहनांना याचा अंदाज येत नाही. त्यामुळे येथे दररोज छोटे-मोठे अपघात होत असून कोणतीही मोठी जीवित हानी होण्याची शक्यता नाकारता येत नाही. सार्वजनिक बांधकाम विभाग या गंभीर समस्येकडे कानाडोळा करत असताना, स्थानिक नागरिकांनी अपघात टाळण्यासाठी पुढाकार घेत, खचलेल्या जागी बॅरिकेट्स लावून घेतले आहेत. रस्ता खचल्यामुळे वाहतुकीला अडथळा निर्माण होत असून, प्रवासांचा जीव धोक्यात आहे. सार्वजनिक बांधकाम विभागाने याकडे गांभीर्याने लक्ष देऊन तातडीने या जोड रस्त्याची दुरुस्ती करावी आणि संबंधित ठेकेदारावर कारवाई देखील करावी, अशी मागणी चिरनेर ग्रामस्थांकडून केली जात आहे.

# स्नेहसंमेलनात एआयच्या रोबोटने वेधले लक्ष

| नेरळ | प्रतिनिधी |

नेरळ येथील एल.ए.इ.एस. शाळेच्या वार्षिक स्नेह संमेलनात एआयच्या माध्यमातून आलेल्या रोबोटने विविध गोष्टींचा उलगडा केला. त्यामुळे आधुनिक तंत्रज्ञान यांचा वापर असलेले प्रचंड गाजले.दरम्यान, छत्रपती संभाजी महाराज यांचा गणवेश घालून आलेले महाराज प्रेक्षकांच्या गर्दीतून आल्यानंतर ऐन थंडीत गारठलेले नेरळकर बेभान झाले होते.

लॉर्ड आयप्पा एज्युकेशन सोसायटीच्या नेरळ येथील एल.ए.इ.एस. इंग्लिश मिडीयम स्कूल अँड ज्युनियर कॉलेजचे वार्षिक स्नेह संमेलन नेरळ गावातील छत्रपती शिवाजी महाराज मैदानात आयोजित करण्यात आले होते. यावेळी संस्थेच्या संचालिका संचालक संगिता नायर, श्रीकुमार नायर, मुख्याध्यापिका अजिता नायर तसेच स्मिता नायर, संध्या नायर, प्रसाद थोरवे, सुरेश टोकरे व सावळाराम जाधव आदी उपस्थित होते.



शाळेने आपल्या दहावी आणि बारावीमध्ये प्रथम आलेल्या विद्यार्थ्यांना आणि त्यांच्या पालकांना प्रमुख पाहुणे म्हणून बोलावण्याची प्रथा निर्माण केली आहे. त्यामुळे यावेळी बारावी विज्ञान शाखेत पहिली आलेली संचिता थेर व वाणिज्य शाखेत आलेला साहिल शेख यांचे पालक आणि दहावीमध्ये प्रथम आलेली आर्या सुर्वे हिचे पालक व्यासपीठावर प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.

तसेच, राष्ट्रीय विज्ञान प्रदर्शनात सहभागी झालेल्या विद्यार्थ्यांचा तसेच कर्जत विज्ञान प्रदर्शनात पहिला आलेल्या विद्यार्थ्यांचा सन्मान करण्यात आला. वार्षिक गुणगौरव नंतर सादर झालेल्या सांस्कृतिक कार्यक्रमावर एआयचे वर्चस्व दिसून आले. विविध विषयांवर एआय निर्मित रोबोटकडून माहिती देण्यात आली. तर, एआयने सर्व सांस्कृतिक कार्यक्रमाचे सादरीकरण करून घेतले.

# शेतकऱ्यांना कर्ज घेणे होणार सुलभ

| मुरुड-जंजिरा | प्रतिनिधी |

दोन लाखांपर्यंतच्या शेती किंवा पीक कर्जासाठी लागणारे मुद्रांक शुल्क महाराष्ट्र शासनाने माफ केले आहे. त्यामुळे कर्ज प्रक्रियेतील कागदांवरील खर्च वाचणार असून, नवीन वर्षाच्या सुरुवातीलाच हा निर्णय लागू करण्यात आल्यामुळे शेतकऱ्यांना कर्ज घेणे आता सुलभ होणार आहे.

शेतकऱ्यांना पूर्वी पीक कर्ज घेताना गहाणखत, करारपत्र किंवा हमीपत्र तयार करण्यासाठी मुद्रांक शुल्क भरावे लागत होते. प्रत्येक १ लाख रुपयांसाठी ३०० रुपये स्टॅम्प ड्युटी भरावी लागत होती. २ लाखांच्या कर्जावर ६०० रुपये खर्च करावे लागत होते. मात्र, १ जानेवारीपासून मुद्रांक शुल्क रद्दचा नवीन नियम लागू करण्यात आला आहे. त्यामुळे २ लाखांपर्यंतच्या कर्जासाठी आता १ रुपयाही स्टॅम्प ड्युटी द्यावी लागणार नाही. स्टॅम्प ड्युटी माफ झाल्यामुळे कागदोपत्री प्रक्रिया सुलभ झाली आहे, शिवाय शेतकऱ्यांची आर्थिक बचतही होणार आहे. या निर्णयाचे शेतकऱ्यांमधून स्वागत होत आहे. तसेच सरकारी व खासगी बँका, विविध विकास सोसायट्यांसाठी हा नियम बंधनकारक केला आहे.

# शालेय विद्यार्थ्यांचा आठवडा बाजार



| पेण | प्रतिनिधी |

शेडाशी मालदेव शाळेत आठवडा बाजाराचे आयोजन करण्यात आले होते. या बाजारामध्ये शाळेतल्या विद्यार्थ्यांनी विविध प्रकारचे स्टॉल लावले होते. त्यामधून विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष व्यवहाराचा अनुभव मिळाला. तसेच, नफा-तोटा या संकल्पना वृद्धिंगत झाल्या. या आठवडा बाजारामध्ये पालकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. यावेळी १५-१६ दुकाने विद्यार्थ्यांनी लावली होती. त्यामध्ये पालेभाज्या, शैक्षणिक साहित्य, खाऊच्या दुकानांमध्ये इडली, वडापाव, घरगुती पदार्थ अशा जिन्नसी ठेवण्यात आल्या होत्या. शाळेतील ३० विद्यार्थ्यांनी या उपक्रमात सहभाग घेऊन ग्रामस्थांना आठवडा बाजाराचा अनुभव दिला. या आठवडा बाजारासाठी उपस्थित मान्यवर, शाळा व्यवस्थापन अध्यक्ष सचिन सावंत, केंद्र प्रमुख दत्तात्रेय कोठेकर, मुख्याध्यापक विजय मिस्त्री, सहशिक्षक ज्ञानेश्वर जेधे, पालक वर्ग आणि मान्यवरांची उपस्थिती मोलाची होती.

# ‘शालेय जीवनातील काटेरी प्रवास सुखकर’

| चिरनेर | प्रतिनिधी |

आपल्या सर्वांच्या शालेय जीवनाचा जीवन प्रवास हा काटेरी होता. मात्र, तो जीवन प्रवास सुखकारकच होता. असे प्रतिपादन शेकाप चिटणीस सुरेश पाटील यांनी केले आहे. जवळ जवळ ४३ वर्षानंतर सन १९८२-८३ दहावी बॅचचा स्नेह मेळाव्याचा कार्यक्रम माजी विद्यार्थी तथा सरपंच भास्कर मोकल यांच्या चिरनेर येथील फार्महाऊसवर आयोजित करण्यात आला होता.



या स्नेहमेळाव्यासाठी दहावीत प्रथम क्रमांकाने उत्तीर्ण होणारा विद्यार्थी अनिल अनावकर हा कोल्हापूरवरून तर महाराष्ट्रात प्रसिद्ध असलेला शिल्पकार अजिंक्य चौलकर हा मुंबईवरून येऊन या स्नेहमेळाव्याचा आनंद घेतला. यापुढे सुरेश पाटील यांनी, ध्येय गाठण्यासाठी आपल्याला अनेक अडचणींचा सामना करावा लागला. मात्र, आपल्या दहावी बॅचचे विद्यार्थी मित्र राजकारण, समाजकारण, उद्योग, नोकरी, सहकार, शिल्पकला, पत्रकारिता, नाट्य अशा जीवनाच्या वेगवेगळ्या प्रांतामध्ये कार्यरत असून, तिथे त्यांनी आपल्या कार्याचा ठसाही निर्माण केला असल्याचे त्यांनी सांगितले. दरम्यान, सरपंच भास्कर मोकल यांनी हा स्नेहमेळावा म्हणजे एक आनंद सोहळा व स्नेहभेटीचे सुंदर स्वरूप असल्याचे सांगितले. ४३ वर्षात आपण एकत्र आलो. याचा मला खूप आनंद असून, प्रत्येकाचा जीवन प्रवास कसा आहे, हे सर्वांनाच समजले. यापुढे आपण भेटत राहू, असेही त्यांनी सांगितले.

प्रारंभी सर्वांच्या उपस्थितीत श्री महागणपतीला व हुतात्मा स्मारकाला पुष्पमालिका अर्पण करून कार्यक्रमाला सुरुवात केली. यावेळी प्रत्येकाचे स्वागत व व परिचय देण्यात आला. तसेच, प्रत्येकाला रिटर्न गिफ्ट म्हणून, सरपंच भास्कर मोकल यांच्या सौजन्यातून सन्मानचिन्ह देण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सूत्रसंचालन अनिल नारंगीकर, सूरदास राऊत, दिलीप पाटील, बी.सी. ठाकूर, जयराम ठाकूर यांनी केले.

कार्यक्रमाच्या दुसऱ्या सत्रात प्रत्येकाला आपली कला सादर करण्याची संधी देण्यात आली. यात सुरेश पाटील, दत्तात्रेय म्हात्रे, प्रदीप नारंगीकर यांनी नाट्य सादरीकरण करून विद्यार्थी मित्रांची वाहवा मिळविली. तर अजय पाटील, कांचन ठाकूर यांच्या गायकीतून संगीताचा कार्यक्रम पार पडला.

# साई मंदिरात रक्तदान शिबीर संपन्न

| चिरनेर | प्रतिनिधी |

श्रीमद रामानंदाचार्य नरेंद्राचार्य महाराज यांच्या अनुयायांनी वहाळच्या साईमंदिरात गुरुवारी (दि.१५) रक्तदान शिबिराचे आयोजन केले होते. यावेळी महेंद्र घरत यांनी रक्तदान केले. तसेच, त्यांनी या शिबिरात मार्गदर्शन देखील केले. ते म्हणाले की, रक्तदान हे सर्वश्रेष्ठ दान आहे. मी गेली अनेक वर्षे रक्तदान करत आहे. रक्तदानामुळे अनेकांचे जीव वाचतात. त्यामुळे रक्तदान आणि अन्नदानासारखे पुण्य नाही. त्यामुळे मी आज दोन्ही गोष्टी एकाच वेळी करत आहे. त्यात मला आनंद आहे. साई मंदिराच्या व्यासपीठावर अनेक समाजोपयोगी उपक्रम आणि कलाकारांना व्यासपीठ उपलब्ध होत आहे. ही निश्चितच कौतुकास्पद बाब आहे, असेही त्यांनी सांगितले.



# शेखर भडसावळे यांना निमंत्रण

| नेरळ | प्रतिनिधी |

देशाच्या प्रजासत्ताक दिनाच्या निमित्ताने देशातील २५० नामांकित व्यक्तींना राष्ट्रपती कार्यालयाने निमंत्रित केले आहे. या निमंत्रितांमध्ये कृषिरत्न शेतकरी शेखर भडसावळे यांना निमंत्रित करण्यात आले आहे. शेती क्षेत्रातील नामांकित व्यक्तीला असा बहुमान मिळत असल्याने शेतकरी वर्गात उत्साहाचे वातावरण आहे. शेखर भडसावळे यांनी भाताच्या विविध जातींचे वाण शोधण्यात मोठे योगदान आहे. त्यानंतर त्यांनी पारंपारिक शेती मध्ये बदल घडवून आणण्यासाठी मशागत मुक्त शेती ही संकल्पना एसआरटीचे माध्यमातून विकसित केली आहे. तर, कमी खर्च आणि मजुरांची संख्या कमी करण्यात एसआरटी तंत्रज्ञान शेतकऱ्यांना फायदेशीर ठरत आहे.

## लोकसहभागातून आदर्श परसबागची उभारणी | सुजित धनगर रेल्वे प्रशासनाला भिडले

# करंजे शाळेची जिल्ह्यात बाजी

| महाड | प्रतिनिधी |

शासनाच्या शालेय शिक्षण विभागाच्या प्रधानमंत्री पोषण शक्ती निर्माण योजने अंतर्गत राज्यातील सर्व शाळांमध्ये शालेय परसबाग निर्माण करणे अनिवार्य करण्यात आले आहे. या पार्श्वभूमीवर रायगड जिल्हा परिषदेमार्फत ‘सर्वोत्कृष्ट परसबाग’ स्पर्धा राबविण्यात आली. यावेळी पोलादपूर तालुक्यातील अतिदुर्गम करंजे गावातील राजिप प्राथमिक आदिवासी वाडी शाळेने विविध आव्हानांवर मात करत जिल्ह्यात प्रथम क्रमांक पटकावला आहे.

सावित्री नदी उगम खोऱ्यातील दुर्गम व उंच डोंगराळ भागात वसलेल्या करंजे शाळेत प्रतिकूल परिस्थिती असूनही विद्यार्थी, पालक, ग्रामस्थ, ग्रामपंचायत आणि शिक्षणप्रेमी नागरिकांच्या लोकसहभागातून पाणीपुरवठ्याची सुविधा निर्माण करण्यात आली. प्रारंभी प्रत्येक कुटुंबाकडून ‘माझी कळशी, माझं पाणी’ हा उपक्रम राबवून परसबाग उभारण्यात आली. या परसबागेतून मिळणारा ताजा, सकस व विषमुक्त भाजीपाला विद्यार्थ्यांच्या पोषण आहारात नियमित वापरला जात असल्याने विद्यार्थ्यांची हजेरी १०० टक्के राहण्यास मदत झाल्याचे सांगण्यात येत आहे. परसबागेमुळे शाळेचा परिसर अधिक आकर्षक आणि आनंददायी झाल्याची प्रतिक्रिया देखील ग्रामस्थांनी व्यक्त केली. परसबागेच्या माध्यमातून विविध विषयांचा ताळमेळ घालत शिक्षणाशी प्रत्यक्ष जोड निर्माण करणारी नवोन्मेषी व आनंददायी परसबाग शिक्षण पद्धती शाळेत विकसित करण्यात आली आहे. या



सातत्यपूर्ण प्रयत्नांचे फलित म्हणून यंदा शाळेला जिल्ह्यात प्रथम क्रमांक मिळाला. जिल्हा पोषण आहार अधिक्षक श्रीकांत मोरे यांच्या जिल्हा मूल्यांकन समितीने परसबागेसह शाळेच्या विविध उपक्रमांची बारकाईने पाहणी करून समाधानकारक गुण दिल्यानेच हा निकाल लागल्याची माहिती उपशिक्षक अमित देबडवार यांनी दिली. विद्यार्थ्यांचे निसर्गाविषयी मनोरंजनातून समुपदेशन वेळोवेळी करण्यात उपशिक्षक गणेश भोये यांनी हातभार लावल्याचे मुख्याध्यापकांनी सांगितले.

> “गतवर्षी शाळेला जिल्हास्तरीय स्पर्धेत द्वितीय क्रमांक मिळाला होता. त्यावेळी मिळालेल्या पुरस्कारातून आवश्यक साधनांची खरेदी करून पाणीपुरवठा अधिक सक्षम करण्याचे प्रयत्न करण्यात आले. शाळा गावातील कचरा व्यवस्थापनातही सक्रिय भूमिका बजावत असून गावातील कचरा ग्रीन फाऊंडेशन या संस्थेमार्फत प्रक्रियेसाठी पाठविण्यात येतो. त्यामुळे विद्यार्थ्यांच्या जनजागृतीमुळे गावात कचऱ्याचे व्यवस्थापन काटेकोरपणे होत आहे.
> – विकास नाडेकर, मुख्याध्यापक”

### कृषीपूरक व्यवसायांचे नियोजन

ग्रामपंचायतीने उपलब्ध करून दिलेल्या कचरा संकलन पेटीचा उपयोग व्हावा, पेटी गंजून खराब होऊ नये म्हणून कचरापेटीचा वापर खुराडा म्हणून करत परसबाग बक्षिसाचा विनियोग करत गावातील, शाळेतील ओल्या किचन कचऱ्याचे वेस्ट मॅनेजमेंट व्हावे याकरिता कुक्कुटपालन सुरू केले आहे. यामुळे विद्यार्थ्यांना पोषण आहारात अंडी उपलब्ध होत असून कृषीपूरक व्यवसायांचे नियोजन, व्यवस्थापन आणि संभाव्य संधींचा प्रत्यक्ष अनुभवही मिळत आहे.




## राशीभविष्य

- **मेष** : दिवसाची सुरूवात उत्तम होईल. योजना आकाराला येऊ लागतील. विद्यार्थ्यांची प्रगती होईल.
- **वृषभ** : वैवाहिक सौख्य लाभेल. जुन्या ओळखींचा लाभ घ्यायला हवा. यांत्रिक क्षेत्रात अनुकूलता राहील.
- **मिथुन** : महत्त्वाची कामं मार्गी लागतील. कौटुंबिक ताण वेळीच दूर होतील. थोरामोठ्यांचा सहवास लाभेल.
- **कर्क** : आर्थिक बाबतीत सावधगिरी बाळगावी. जुनी येणी सहज वसूल होतील. प्रवासात काळजी घ्यावी.
- **सिंह** : भावंडांशी वाद-विवाद टाळावेत. महत्त्वाचे करार लांबणीवर पडतील. यंत्र, वाहनांचा वापर नीट करा.
- **कन्या** : मुलाखतीत यश मिळवता येईल. व्यवसायात साधारण स्थिती राहील. मानसिक स्वास्थ लाभेल.
- **तूळ** : सरकारी कामं मनाजोगी होतील. कारकिर्दीच्या नव्या संधी लाभतील. डोळ्यांचे विकार संभवतात.
- **वृश्चिक** : महत्त्वाच्या कामांसाठी पाठपुरावा करावा लागेल. सार्वजनिक क्षेत्रात संधी लाभतील. चिंता नसावी.
- **धनु** : स्थावर प्रश्नात तडजोड करावी. उपजत गुणांना वाव मिळेल. प्रकृती सांभाळायला हवी.
- **मकर** : आर्थिक बाबतीत ताण राहील. नव्या योजना लांबणीवर पडतील. कर्ज प्रकरणं प्रलंबित राहतील.
- **कुंभ** : लक्ष विचलित करणाऱ्या घटना संभवतात. बोलताना विचार करावा. आर्थिक कामात दिलासा मिळेल.
- **मीन** : आध्यात्मिक प्रगती होईल. धार्मिक उपक्रमांकडे ओढा राहील. उपजत कला-गुणांचा विकास होईल.

फॅशन पॅशन

## स्टायलिश दिसायचं तर...

आपल्याकडे घालायला काहीच चांगलं नाही, असं वरचेवर वाटतं का? नेहमी तीच ती फॅशन करुन किंवा एकाच पद्धतीचे कपडे घालून कंटाळा आला आहे का? तर मग तुमच्याकडे काही ॲक्सेसरीज, जॅकेट्स, पादत्राणं असायलाच हवी. त्यांचा वापर करुन आहे त्या प्रावरणांनिशी आपला लूक खुलवता येतो. स्टायलिश दिसण्यासाठी नेमकं काय करता येईल, पाहू या.

* छानशा टोटे किंवा बकेट बॅगमुळे तुमच्या लूकला चार चाँद लागतील. स्टाईलला परिपूर्णता लाभेल. पण बॅगची निवड करताना शरीरयष्टीचाही विचार व्हायला हवा. बांधेसूद महिलांनी मुलायम फॅब्रिकच्या किंवा नीट बांधणी केलेल्या पर्स निवडाव्या. स्थूल महिलांच्या हातात छोट्या आकाराच्या पर्स शोभून दिसतात.

* तुमच्या वॉर्डरोबमध्ये फिटिंगवालं एथनिक जॅकेट असायला हवं. ते कोणत्याही पेहरावावर शोभून दिसतं. क्रॉप टॉप आणि पलाझोवर तर विशेष शोभून दिसतं. त्यावर मस्त झुमके घाला. डेनिमवरही असं जॅकेट शोभून दिसेल. सुंदर नक्षीकाम केलेलं किंवा थ्रेड वर्कवालं जॅकेट जास्तच खुलून दिसतं. (क्रमशः)

## १६ जानेवारी

दिनविशेष

१९०१ : महादेव गोविंद रानडे यांचा मुंबई येथे मृत्यू.
१९३८ : बंगालमधील श्रेष्ठ कादंबरीकार डॉ. शरदचंद्र चटोपाध्याय यांचे निधन.
१९२६ : संगीतकार ओ.पी. नय्यर यांचा जन्म.
१९७८ : जनता सरकारने १,००० रुपयाच्या नोटा रद्द केल्या.
२०१३ : दिल्ली न्यायालयाने शिक्षक भरती प्रकरणात हरियानाचे माजी मुख्यमंत्री ओमप्रकाश चौताला, त्यांचे चिरंजीव व आमदार अजय चौतालासह अन्य ५३ जणांना दोषी ठरवलं.

फन टाईम

## फिस्टबॉल आणि वॉल बॉल

रोमन लोकांनी बऱ्याच हटके खेळांचा शोध लावला. 'फिस्टबॉल' ही सुद्धा त्यांचीच निर्मिती. पण याबाबत लोकांना फारशी माहिती नाही. या खेळाच्या स्पर्धांना 'फिस्टिव्हस' म्हणतात. तर खेळाडू 'फिस्ट बॉलर्स' म्हणून ओळखले जातात. जगातल्या २५ देशांमध्ये हा खेळ खेळला जातो. फिस्टबॉल आणि व्हॉलीबॉलमध्ये बरंच साम्य आहे. पण फिस्टबॉल खेळताना मुठी वळवून ठेवायच्या असतात. या मुठींनी किंवा हातांनी बॉल मारता येतो. या खेळात दोन संघ सहभागी होतात. मधोमध जाळी बांधलेली असते. प्रत्येक संघात पाच खेळाडू असतात. प्रतिस्पर्धी संघाने मारलेल्या चेंडूचा टप्पा पडला तरी तो मारता येतो. पाच सेट्सनंतर खेळाचा निकाल लागतो. फिस्टबॉलची एक आंतरराष्ट्रीय फेडरेशनही आहे. ही फेडरेशन फिस्टबॉलच्या स्पर्धांचं नियमित आयोजन करतं. ऑलिम्पिकमध्ये समावेश नसलेल्या खेळांची स्पर्धा म्हणजे 'वर्ल्ड गेम'मध्ये फिस्टबॉलचा जागतिक विजेता ठरतो.

(क्रमशः)

### पंचांग

**शुक्रवार, १६ जानेवारी २०२६**
विश्वावसूनाम संवत्सर, शके १९४७, पौष कृ. १३, चंद्रराशी : धनु, नक्षत्र : मूळ, योग : ध्रुव, सूर्योदय ७.१७, सूर्यास्त ६.२०

### फॉरवर्डस

**पलट क़र देख़नें क़ी आदत नहीं हैं हमारीं...**

**अलविदा कहनें वालें आज़ भीं इन्तज़ार में हैं...!**

आरोग्यमंत्र

## खोकल्याकडे दुर्लक्ष नको

हिवाळ्यात सर्दी, डोकेदुखी, खोकला यासारखी दुखणी डोकी वर काढतात. त्यातही सततचा खोकला नकोसा वाटतो. त्यावर औषधही घेतलं जातं. पण तरीही खोकला थांबत नसेल तर मात्र दुर्लक्ष करू नये. कारण हे एखाद्या गंभीर आजाराचे संकेत असू शकतात. याविषयी...

* खोकल्यावर वेळीच उपचार केले नाहीत आणि याचं रूपांतर न्युमोनियामध्ये होतं. म्हणूनच खोकल्याकडे दुर्लक्ष करू नये. * दोन आठवड्यांपेक्षा जास्त काळ टिकणारा खोकला फुफ्फुसाच्या कॅन्सरचं लक्षण असू शकतं. खोकल्यासोबत रक्त पडत असेल, गिळताना त्रास होत असेल, आवाज घोगरा झाला असेल, छातीत दुखत असेल तर तातडीने तपासणी करून घ्यावी. * दहा दिवसांपेक्षा जास्त काळ कोरडा खोकला आणि सर्दी असेल तर तातडीने डॉक्टरांकडे जा. हे न्युमोनियाचं लक्षण असू शकतं. श्वास घेताना त्रास होणं, ताप येणं आणि पिवळट, हिरवा रक्तमिश्रित कफ पडणं ही न्युमोनियाची लक्षणं आहेत. * धूम्रपानाची सवय असेल किंवा आधी धूम्रपान केलं असेल तर तुम्हाला सीओपीडीचा धोका आहे. यात प्रचंड कफ निर्माण होतो. दिवसा कफाचं प्रमाण बरंच जास्त असतं. याबरोबरच धाप लागणं, छातीत ताठरता जाणवणं अशी लक्षणं असतील तर तातडीने डॉक्टरांकडे जा. * तीन आठवड्यांपेक्षा जास्त काळपर्यंत टिकून राहणारा खोकला, छातीत दुखणं, थकवा, वजन कमी होणं, ताप, रात्री घाम येणं, खोकताना रक्त पडणं ही टीबीची लक्षणं असू शकतात.



### फॅशन

मुलींवर लाल रंग खुलून दिसतो. पण मुलांचं काय? त्यासाठी स्टायलिंगचे फंडे तुम्हाला जमायला हवे. ते जमले की लाल रंगात तुम्ही शोभून दिसलाच म्हणून समजा. लाल कपडे घालण्याचा विचार असेल तर या टिप्स नक्की फॉलो करा.

* लाल रंग स्मार्ट पद्धतीने कॅरी करायचा असेल तर 'पुलिंग ऑफ जंपर्स' हा अगदी साधा आणि सोपा पर्याय आहे. यात गडद आणि भडक लाल रंगांची निवड करा. त्यासोबत घातल्या जाणाऱ्या जॅकेट किंवा पँटमुळे हा भडकपणा कमी होतो. (क्रमशः)

करिअरवाटा

## 'न्यूक्लिअर मेडिसीन'विषयी...

वैद्यकीय उपचारांमध्ये न्यूक्लिअर मेडिसीनचा बोलबाला आहे. यामध्ये रोगाचा अंदाज घेण्यासाठी आणि उपचार करण्यासाठी रेडिओ न्युक्लाईडसचा वापर केला जातो. त्यामुळे त्याला 'न्यूक्लिअर मेडिसीन' असंही म्हणतात. या उपचारात इंजेक्शनद्वारे शरीरात रेडिओ आयसोटोपस् टोचले जातात. ते शरीरामध्ये सौम्य किरणोत्सर्जन करतात ज्यामुळे शरीरात



होणारे बदल नोंदले जाऊन रोगाचं निदान केलं जातं. शरीरातील विशिष्ट ग्रंथींचे आजार या पद्धतीने बरे केले जातात. प्राथमिक अवस्थेतल्या कर्करोगावर ही उपचारपद्धती गुणकारी असल्याचं दिसून आलं आहे. त्यामुळे या उपचार पद्धतीचं महत्त्व वाढत आहे. या पद्धतीत पॉझिट्रॉन एमिशन टोमोग्राफी, अल्ट्रा सोनोग्राफी आणि मॅग्नेटिक रिझोनन्स इमेजिंग अशा तंत्रांचा उपयोग केला जातो. भारतीय संरक्षण दलाच्या अखत्यारीतले संरक्षण संशोधन आणि विकास संघटन (डीआरडीओ) या संस्थेच्या अधिकारक्षेत्रात कार्यरत असणाऱ्या इन्स्टिट्यूट ऑफ न्यूक्लिअर मेडिसीन ॲन्ड अलाईड सायन्सेस या संस्थेत या शास्त्राचं शिक्षण आणि संशोधन केलं जातं. न्यूक्लिअर मेडिसीन या वैद्यकीय उपचारासाठी आवश्यक असणारी साधनेसुद्धा इथे विकसित करण्यात आली आहेत.

खेचाखेची

### बाबू

**ती** – ऐक ना बाबू...

**तो** – मला बाबू नको म्हणत जाऊ यार,

.
.
.

बाबू माझ्या बाबांचं नाव आहे...

वेगळं काही

सर्वसाधारणपणे एका प्रौढ गेंड्याची उंची सहा फूटांपर्यंत तर लांबी ११ फुटांपर्यंत वाढू शकते. त्याचं वजन २००० ते २७०० किलोग्रॅम असतं. गेंड्याचं शरीर त्वचेच्या विविध थरांनी बनलेलं असतं. सूर्याच्या तीव्र किरणांचा त्रास होऊ नये म्हणून गेंड्याला जाड कातडीचं वरदान लाभलं आहे. गेंडे चिखलात राहतात तसंच ते शाकाहारी आहेत. शिंगांसाठी गेंड्यांची मोठ्या प्रमाणावर शिकार केली जाते. पण प्रत्यक्षात ते शिंग नसून हजारो जाड आणि बळकट केसांचा गुच्छ असतो. हे शिंग तुटल्यास नवं शिंग येतं. आशियातल्या गेंड्यांना एक शिंग असतं तर आफ्रिकेतले गेंडे दोनशिंगी असतात. गेंडे ५० ते ५५ किलोमीटर प्रती तास वेगाने धावतात. त्यांची ऐकण्याची आणि हुंगण्याची क्षमता खूप चांगली असते.

घरसंसार

## दुर्गंधीचा सामन करताना...

कितीही वेळ वाळत ठेवले तरी न सुकल्यामुळे ओलसर कपडे वापरावे लागणं, दमट हवेमुळे सतत घाम येणं, लवकर केस न वाळणं या पावसाळ्यात जाणवणाऱ्या सर्वसाधारण समस्या आहेत. या सगळ्यामुळे अंगालाही एकप्रकारचा दुर्गंध येऊ लागतो. सहाजिकच चारचौघात मान खाली घालण्याची वेळ येऊ शकते. हे टाळायचं असेल तर टी ट्री ऑईलची मदत घ्या. एका बाऊलमध्ये पाणी घेऊन त्यात टी ट्री ऑईलचे काही थेंब मिसळा आणि त्याने अंग पुसून घ्या. हा प्रयोग वरचेवर केल्यास शारीरिक दुर्गंधीची समस्या दूर होते. * कुंद हवेमुळे घरात आणि आजूबाजूच्या परिसरातही विशिष्ट प्रकारचा कुबट वास भरून राहतो. एअर फ्रेशनर किंवा अगरबत्ती लावूनही तो जात नाही. अशा वेळी होममेड फ्रेशनरचा वापर हा या समस्येवरील सर्वोत्तम उपाय ठरतो. हे फ्रेशनर कसं बनवायचं ते जाणून घ्या. त्यासाठी एक वाटी डिस्टिल्ड वॉटर, अर्धा कप व्होडका, दहा टेबलस्पून इसेंन्शिअल ऑईल ही सामग्री एकत्र मिसळून स्प्रे बॉटलमध्ये भरून ठेवा. होममेड फेशनर तयार आहे. ते फवारल्यास दुर्गंध नाहिसा होईल.



## सुडोकू ५४

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | ५ | ८ | | | | ९ | |
| ४ | ७ | | | ५ | २ | | | |
| २ | | | | १ | | ५ | ६ | |
| ७ | | | | | ६ | ८ | ४ | |
| | | | | ९ | | | | |
| | ८ | ६ | १ | | | | | २ |
| | ६ | ३ | | ८ | | | | ५ |
| | | | ९ | २ | | | ३ | ६ |
| | २ | | | | ४ | ७ | | |

**टीप -**
* या चौकटीमध्ये सर्व रिकाम्या घरांमध्ये १ ते ९ पैकी अंक वापरून चौकट पूर्ण करायची आहे. यामध्ये प्रत्येक आडव्या ओळीत, उभ्या ओळीत व ३ ह्न ३ लहान चौकटीमध्ये १ ते ९ पैकी प्रत्येक अंक एकदा आणि एकदाच आला पाहिजे.
* आधी छापून दिलेले अंक बदलता येणार नाहीत.
* अशा तऱ्हेने पूर्ण झालेले उत्तर नेहमी एकच असते. पर्यायी उत्तरे असू शकत नाहीत.

## सुडोकू ५३ चे उत्तर

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ५ | १ | ७ | ६ | ९ | ८ | २ | ४ | ३ |
| २ | ४ | ६ | ५ | १ | ३ | ९ | ८ | ७ |
| ८ | ३ | ९ | ४ | ७ | २ | १ | ६ | ५ |
| ४ | ७ | २ | ९ | ६ | ५ | ३ | १ | ८ |
| ९ | ६ | १ | ८ | ३ | ७ | ५ | २ | ४ |
| ४ | ५ | ८ | २ | ४ | १ | ७ | ९ | ६ |
| ६ | ९ | ५ | ३ | २ | ४ | ८ | ७ | १ |
| १ | २ | ३ | ७ | ८ | ६ | ४ | ५ | ९ |
| ७ | ८ | ४ | १ | ५ | ९ | ६ | ३ | २ |

## शब्दकोडे क्रमांक ५४



**आडवे शब्द :-**
१) अरण्य
३) चलनवलन
७) मध्यान्ह
१०) गाजराचा एक गोड पदार्थ
१२) मूल, पिल्लू, वासरू
१३) ढाक्याचे प्रसिद्ध कापड
१५) जमिनीचा मालक
१७)खवा
१८) हिमालयातील एक प्राणी
२१) त्वचारोग
२२) दरवाजा
२३) पवित्र
२४) खळबळजनक
२६) अभिमानास्पद (कामगीरी)
२८) डोके
२९) घन, घट्ट
३०) पदार्थाचा सूक्ष्म भाग
३१) मनाशी पक्का
३३) रेशीमाचे जाडसर कापड
३५) मोठा हातोडा
३७) गीत, गाणे
३९) परीक्षा, ज्ञान
४०) सोने
४२) दृष्टीभेट
४५) राष्ट्र
४६) उत्सव
४७) वर वधुची लग्नानंतरची मिरवणूक
४८) खिडकी
५०) प्रेत, कलेवर
५१) मॅच (म.)
५२) समुद्र
५३) तपास, शोध
५५) मंदिर
५७) हाट
५८) हस्त
५९ )श्वापद, पशू
६०) अब्रू
६२) मुलांच्या खेळातील छोटा गोल दगड
६३) करवत
६४) तांबडा
६५) आरडाओरडा, गडबड
६६) छातीत होणारा दाह
६७) तांबे, कास्य

**उभे शब्द :-**
१) हलवता येणारी संपत्ती
२) आवर घालणारी वादी
३) पराभव
४) लाट, तरंग
५) चढाई, चालण्याची ढब
६) बरोबर आलेला फौजफाटा
७) दुकानाचा मालक
८) खोडण्याचे साधन
९) वैर, कडाक्याचे भांडण
११) सागरी वाहतुकीचे साधन
१४) सत्ता
१६) उंबरठा
१९) सकस
२१) फलक, टोपली
२३) एक प्राचीन लिपी
२४) च्या सह
२५) खोडा, अपशकुन
२६) दुय्यम, कमी महत्वाचे
२७) उत्तम घोडा
३०) दणकट, मजबूत
३२) खानेसुमारी
३४) श्रीमंत
३५) निवासस्थान
३६) श्रीकृष्णाचे माता पिता
३८) शोभणारा
३९) कबूतर
४१) ताब्यातला, अधीन
४२) पती-पत्नी
४३) रात्रभर
४४)जगाचे कालचक्र
४६) वक्तशीर
४९) माफ
५१) टरफल
५४) हत्तींचा राजा
५६) प्रहार, दिवस
६१) चिंधी, फाटके वस्त्र
६२) वर्तुळ
६३) आरोप
६४) फळांचा राजा, आंबा

(उत्तर उद्याच्या अंकात)

### मागील शब्दकोड्याचे उत्तर



## निवडक

### राष्ट्रीय सिकई स्पर्धेत रायगडचे सुयश

**कोर्लई :** हैद्राबाद येथे नुकत्याच संपन्न झालेल्या २६ व्या राष्ट्रीय सिकई मार्शल आर्ट स्पर्धेत रायगड जिल्ह्यातील शुभम महेंद्र नखाते (अलिबाग) व शिव देवजी हिलम (ग.म.वेदक विद्या. ज्यु. कॉ.,तळा) यांनी रजत पदक पटकावले. सिकई फेडरेशन ऑफ इंडिया आणि सिकई असोसिएशन ऑफ हैदराबाद वतीने येथील जी.एम.सी. बालयोगी संकुल, गच्चीबोली क्रीडा संकुलात संपन्न झाल्या होत्या. सिकई असोसिएशन ऑफ महाराष्ट्रचे अध्यक्ष मजहर खान, सचिव रवींद्र गायकी यांच्या मार्गदर्शनाखाली महाराष्ट्रातील एकूण १८ खेळाडूंनी भाग घेतला होता. यात रायगड जिल्ह्यातील दोन खेळाडूंची महाराष्ट्रातील संघात निवड झाली होती.स्पर्धेत रायगड मधील अलिबागच्या शुभम महेंद्र नखाते आणि शिव देवजी हिलम यांनी व्दितीय क्रमांक पटकावला.या खेळाडूंना मास्टर विजय चंद्रकांत तांबडकर आणि प्रियांका गुंजाळ यांचे मार्गदर्शन लाभले. त्यांच्या या यशाबद्दल जिल्ह्यातील सर्व क्रीडाप्रेमी कडून कौतुक व अभिनंदन होत आहे.




**शुभम नखाते व शिव हिलमने पटकावले सिल्वर पदक!**

### रोहित-श्रेयस-जयस्वाल सेंट्रल करारातून बाद!

**मुंबई :** मुंबई क्रिकेट असोसिएशनने मुंबई क्रिकेटला बळ देण्यासाठी मोठा निर्णय घेतला. एपेक्स काउंसिलच्या बैठकीत काही महत्त्वाचे निर्णय घेतले गेला. यात काही महत्त्वाच्या मुद्द्यांवर चर्चा केली गेली. तसेच काही निर्णयांवर शिक्कामोर्तब लावला गेला. यात दिलीप वेंगसरकर इंटर कॉलेज स्पर्धा, सेंट्रल करार आणि टी स्काउटिंग लीगसारखे मुद्द्यांवर चर्चा केली गेली. वरिष्ठ खेळाडूंसाठी सेंट्रल करार करण्याचा निर्णय खूपच महत्त्वाचा आहे. कारण अनेक खेळाडूंना आर्थिक कारणामुळे क्रिकेटवर फोकस करणं कठीण होतं. अशा स्थितीत सेंट्रल करारामुळे त्यांना फायदा होणार आहे. खेळाडूंच्या भविष्याच्या दृष्टीने हा निर्णय महत्त्वाचा ठरणार आहे. वरिष्ठ संघाच्या खेळाडूंसाठी सेंट्रल करार सुरु करण्याचा निर्णय घेतला आहे. मिडिया रिपोर्टनुसार, एमसीएच्या सेंट्रल करारातून भारतीय संघाचे खेळाडू आणि आयपीएल खेळाडूंना वगळण्यात येणार आहे. म्हणजेच रोहित शर्मा, श्रेयस अय्यर, सरफराज खान या सारख्या खेळाडूंना हा करार मिळणार नाही. म्हणजेच या करारात नवोदीत आणि देशांतर्गत क्रिकेटमध्ये सक्रिय असलेल्या वरिष्ठ खेळाडूंना मानधन मिळेल. त्यामुळे त्यांच्या आर्थिक गरजा पूर्ण होतील आणि कोणत्याही चिंतेशिवाय क्रिकेटवर फोकस करू शकतील. एमसीएने एक पत्रकात स्पष्ट सांगितलं की, खेळाडूंच्या दीर्घकालीन विकासासाठी, ॲपेक्स कौन्सिलने खेळाडूंसाठी केंद्रीय करार मंजूर केले आहेत, जे उदयोन्मुख प्रतिभेला आधार आणि आर्थिक सुरक्षा प्रदान करेल. इंटर कॉलेज स्पर्धा होणार असल्याने खेळाडूंना नवी संधी मिळणार आहे. या स्पर्धेला टीम इंडियाचे माजी कर्णधार दिलीप वेंगसरकर यांचं नाव दिलं जाणार आहे.

### मुंबई सलग तिसऱ्या विजयासाठी सज्ज



**सिडनी :** वूमन्स प्रीमियर लीग स्पर्धेतील चौथ्या मोसमातील आठव्या सामन्यात गतविजेता मुंबई इंडियन्स विरुद्ध यूपी वॉरियर्स आमेनसामने असणार आहेत. दोन्ही संघांचा हा या मोसमातील एकूण चौथा सामना असणार आहे. मुंबईने मोसमात पराभवाने सुरुवात झाल्यानंतर जोरदार कमबॅक केलं. मुंबईने आरसीबीकडून पराभूत झाल्यानंतर जोरदार मुसंडी मारली. भारताने दिल्ली कॅपिट्ल्सचा धुव्वा उडवला. त्यानंतर सलग २ सामने जिंकणाऱ्या गुजरात जायंट्सचा विजयरथ रोखला. त्यामुळे मुंबईला यूपीवर मात करत या मोसमात एकूण सलग आणि तिसरा विजय मिळवण्याची संधी आहे. दुसऱ्या बाजूला युपीला या मोसमात आतापर्यंत विजयी होता आलेलं नाही. यूपीचा या मोसमातील तिन्ही सामन्यांत पराभव झाला आहे. त्यामुळे यूपीसमोर मुंबई विरुद्ध विजय मिळवून सलग चौथा पराभव टाळण्याचं आव्हान असणार आहे. मात्र युपीसाठी मुंबई विरुद्ध विजय मिळवणं सोपं नसणार, हे स्पष्ट आहे. मुंबईने सलग २ सामने जिंकले असल्याने विश्वास दुणावलेला आहे. मुंबई इंडियन्स स्पर्धेतील सातव्या सामन्यानतंर पॉइंट्स टेबलमध्ये ४ गुणांसह दुसऱ्या स्थानी विराजमान आहे. तर आरसीबी ४ गुणांसह पहिल्या क्रमांकावर आहे. आरसीबी या हंगामात अजिंक्य आहे. तसेच त्यांचा नेट रनरेट चांगला आहे.

# बांगलादेश क्रिकेटपटूंचे बंड!

## ■ भारताला धमकी देणाऱ्या बीसीबी विरोधात आक्रमक; बहिष्काराची भाषा

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

बांगलादेश क्रिकेटमध्ये मोठा उलटफेर होताना दिसत आहे. बांगलादेशच्या खेळाडूंनीच आता देशांतर्गत सामन्यांवर बहिष्कार टाकण्याची धमकी दिली आहे. बांगलादेश क्रिकेट बोर्डाचे संचालक नजमुल इस्लाम यांनी वादग्रस्त विधान केल्यानंतर खेळाडूंमध्ये मोठ्या प्रमामात नाराजी दिसून येत आहे.

आधीच बांगलादेशच्या टी २० वर्ल्ड कप २०२६ मधील सहभागावर प्रश्नचिन्ह आहे. त्यात आता हा नवा गोंधळ समोर आला आहे. मात्र नजमुल यांच्या विधानापासून बांगलादेश क्रिकेट बोर्डाने स्वत:ला लांब ठेवले आहे.

बांगलादेशचा वेगवान गोलंदाज मुस्तफिजूर रेहमानला आयपीएल २०२६ मधून काढून टाकण्याचे निर्देश बीसीसीआयने काही दिवसांपूर्वी दिले होते. त्यानंतर बांगलादेशने खेळाडूंच्या सुरक्षेचे कारण देत भारतात टी २० वर्ल्ड कप २०२६ खेळायला जाणार नसल्याचे आयसीसीला कळवले असून ठिकाण बदलण्याची मागणी केली आहे. मात्र आयसीसीने दोनदा ही मागणी फेटाळली आहे. तसेच सध्या बीसीबी आणि आयसीसी यांच्यात या संदर्भात चर्चा सुरू आहेत.




अशातच नजमुल यांनी राष्ट्रीय खेळाडूंच्याच वचनबद्धतेवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले होते. त्यांनी म्हटले होते की काही मोजके खेळाडू त्यांच्यात गुंतवलेल्या पाठिंबा आणि संसाधनांचा योग्य वापर करत नाही. याशिवाय माजी कर्णधार तमिम इक्बालला त्यांनी भारताचा एजंट असंही म्हटलं होतं. तमिमने टी २० वर्ल्ड कपमधील सहभागाबाबत भावनिक होऊन निर्णय न घेण्याची विनंती बोर्डाला केली होती. त्यानंतर नजमुल यांनी वादग्रस्त भाष्य केले होते.

नजमुल यांनी असंही म्हटलं होतं की जरी बांगलादेश टी २० वर्ल्ड कपमध्ये खेळले नाही, तरी बोर्डाला मोठा आर्थिक फटका बसणार नाही. त्यांच्या या विधानांवर मोठ्या प्रमाणात टीका झाली होती.

त्यांच्या या विधानांनंतर बांगलादेशच्या खेळाडूंनी नाराजी व्यक्त केली असून जोपर्यंत नजमुल त्यांच्या पदाचा राजीनामा देत नाहीत किंवा खेळाडूंच्या सन्मानासाठी बोर्डाकडून जोपर्यंत स्पष्ट पावले उचलली जात नाही, तोपर्यंत क्रिकेटवर बहिष्कार टाकण्याची धमकी दिली होती. याशिवाय ज्याप्रकारे टी २० वर्ल्ड कपमध्ये खेळण्याचा मुद्दाही हाताळला जात आहे, त्यावरूनही खेळाडूंमध्ये नाराजी आहे.

आता खेळाडूंच्या या धमकीनंतर बांगलादेश क्रिकेट बोर्डाने स्पष्ट केले आहे की नजमुल यांचे विधान बोर्डाकडून करण्यात आलेले अधिकृत विधान नसून ते त्यांचे वैयक्तिक विधान आहे. बोर्डाच्या निवेदनात म्हटले आहे की बीसीबी नियुक्त प्रवक्त्यांकडून किंवा मीडिया आणि कम्युनिकेशन विभागाकडून कोणतेही अधिकृत विधान केले जात नाही, तोपर्यंत कोणत्याही विधानाची जबाबदारी किंवा समर्थन बीसीबी करत नाही.

याशिवाय बांगलादेश क्रिकेट बोर्डाने बांगलादेश क्रिकेटच्या सन्माला ठेच पोहचवणाऱ्यांविरुद्ध योग्य ती कारवाई केली जाईल असे आश्वासनही दिले आहे. त्यांच्या निवेदनात असंही म्हटले आहे की मखेळाडू हे बांगलादेश क्रिकेटचे हृदय आहेत. त्यांचे योगदान आणि कल्याण यालाच सर्वोच्च प्राधान्य असेल.

## भारताचा २०२६ मधील पहिला पराभव

### ■ न्यूझीलंड ७ विकेट्सने विजयी; मिचेलचे नाबाद शतक

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

न्यूझीलंड क्रिकेट टीमने राजकोटमध्ये इतिहास बदलला आहे. न्यूझीलंड राजकोट येथील निरंजनशाहस्टेडियममध्ये आतापर्यंत झालेल्या एकूण ५ एकदिवसीय सामन्यांत धावांचा पाठलाग करताना विजय मिळवणारी पहिलीच टीम ठरली आहे. भारताने केएल राहुल याने केलेल्या शतकाच्या जोरावर न्यूझीलंडसमोर विजयासाठी २८५ धावांचं आव्हान ठेवलं होतं.

न्यूझीलंडने हे आव्हान डॅरेल मिचेल याच्या नाबाद शतकी खेळीच्या जोरावर ४७.३ ओव्हरमध्ये ३ विकेट्स गमावून पूर्ण केलं. न्यूझीलंडने यासह पहिल्या सामन्यातील पराभवाची परतफेड केली. न्यूझीलंडने अशाप्रकारे ३ सामन्यांच्या मालिकेत १-१ ने बरोबरी केली. सोबतच न्यूझीलंडचा भारताविरूद्धचा एकदिवसीय क्रिकेटमधील सलग ८ पराभवानंतर पहिला विजय ठरला. तसेच न्यूझीलंडने ८ वर्षांची प्रतीक्षा संपवली. न्यूझीलंडने भारतात २०१७ साली शेवटचा सामना जिंकला होता.

न्यूझीलंडने भारताला टॉस जिंकून बॅटिंगसाठी भाग पाडलं. भारतासाठी केएल राहुल याच्या शतकाव्यतिरिक्त कर्णधार शुबमन गिल याने सर्वाधिक योगदान दिलं. केएलने ११२ धावा केल्या. तर शुबमनने ५६ धावांची खेळी केली. तर इतरांनीही योगदान दिलं. भारताने अशाप्रकारे ७ विकेट्स गमावून २८४ धावांपर्यंत मजल मारली. त्यानंतर भारतीय गोलंदाजांनी २८५ धावांचा पाठलाग करणाऱ्या न्यूझीलंडला ५० धावांच्या आत २ झटके दिले.

हर्षित राणा याने डेव्हॉन कॉनव्हे याला १६ धावांवर बोल्ड केलं. तर प्रसिध कृष्णा याने हेन्री निकोल्स याला १० धावांवर मैदानाबाहेरचा रस्ता दाखवला. त्यानंतर विल यंग आणि डॅरेल मिचेल या जोडीने दीडशतकी भागीदारी करत सामन्यावर घट्ट पकड मिळवली. या दोघांनी तिसऱ्या विकेटसाठी १५२ बॉलमध्ये १६२ रन्सची पार्टनरशीप केली. कुलदीप यादव याने विल यंग याला आऊट करत न्यूझीलंडला एकूण तिसरा झटका दिला. मात्र तोवर उशिर झाला होता. यंगने ९८ बॉलमध्ये ८७ रन्स केल्या.

**विजयासह मालिकेत बरोबरी**

**डॅरेल मिचेल आणि ग्लेन फिलिप्स या जोडीने न्यूझीलंडला विजयापर्यंत पोहचवलं. या दोघांनी चौथ्या विकेटसाठी नाबाद ७८ धावांची भागीदारी केली. फिलिप्सने ३२ धावा केल्या. तर डॅरेलने ११७ चेंडूत २ षटकार आणि ११ चौकारांच्या मदतीने नाबाद १३१ धावा केल्या. न्यूझीलंडसाठी हा दुसरा सामना करो या मरो असा होता. न्यूझीलंडला मालिकेतील आव्हान कायम ठेवण्यासाठी कोणत्याही स्थितीत हा सामना जिंकणं गरजेचं होतं. न्यूझीलंडने या आरपारच्या लढाईत मैदान मारलं आणि मालिका बरोबरीत आणून ठेवली. त्यामुळे आता तिसरा आणि अंतिम सामना निर्णायक ठरणार आहे. हा सामना १८ जानेवारीला होणार आहे.**

## विराटने केली श्रेयस अय्यरची नक्कल

**नवी दिल्ली :** भारत आणि न्यूझीलंड दरम्यान तीन सामन्यांची एकदिवशीय मालिका आता रोमांचक स्थितीत पोहचली आहे. पहिला एकदिवशीय सामना भारताने खिशात घातला. तर दुसऱ्या सामन्यात पराभवाला सामोरे जावे लागले. आता तिसरा आणि निर्णायक सामना १८ जानेवारी रोजी इंदूर येथे खेळला जाणार आहे. दरम्यान एक मजेशीर व्हिडिओ व्हायरल होत आहे. या व्हिडिओत टीम इंडियाचा स्टार फलंदाज विराट कोहली हा श्रेयस अय्यर याच्या चालण्याची नक्कल करताना दिसतो. या दोघांचे मागे कर्णधार रोहित शर्मा हे दृश्य पाहताच खळखळून हसला. त्यावेळी चाहत्यांनी सुद्धा भरभरून दाद दिली. तर सोशल मीडियावर हा व्हिडिओ व्हायरल झाला आहे. त्याची एकच चर्चा सुरू आहे. विराट कोहली हा क्रिकेटच्या मैदानावर अत्यंत आक्रमक असतो. तो आक्रमक पद्धतीने खेळतो. पण ड्रेसिंग रुम आणि मैदानावर मात्र तो अत्यंत कूल दिसून येतो.

## मुरूड तालुकास्तरीय क्रीडा स्पर्धा २०२५-२६ चे आयोजन

**। रेवदंडा। प्रतिनिधी ।**

भारत सरकार अंतर्गत क्रीडा व युवा कार्यक्रम मंत्रालय संचालित मेरा भारत आणि ओएसिस बहुउद्देशीय समाजाभिमुख संस्था, रेवदंडा यांच्या संयुक्त विद्यमाने मुरूड तालुक्यासाठी तालुकास्तरीय क्रीडा स्पर्धा २०२५-२६ (खुला गट) चे आयोजन करण्यात आले आहे. ही स्पर्धा रविवार, दिनांक १८ जानेवारी २०२६ रोजी संपन्न होणार आहे.

या स्पर्धेमध्ये १६ ते २९ वयोगटातील युवक-युवतींनी सांघिक तसेच वैयक्तिक स्वरूपात सहभागी होण्याचे आवाहन आयोजकांकडून करण्यात आले आहे. मुरूड तालुक्यातील युवा वर्गामध्ये क्रीडा संस्कृती व्हावी तसेच स्थानिक स्तरावर त्यांच्या सुप्त गुणांना वाव मिळावा या दुहेरी उद्देशातून या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले असल्याचे जिल्हा युवा अधिकारी अमित पुंडे यांनी सांगितले आहे.

स्पर्धेअंतर्गत सांघिक खेळामध्ये पुरुषांसाठी कबड्डी व महिलांसाठी खो-खो या खेळांचा समावेश आहे. तसेच वैयक्तिक क्रीडा प्रकारांतर्गत पुरुष व महिलांसाठी धावणे (४०० मी) आणि गोळाफेक या स्पर्धा घेण्यात येणार आहेत.

स्पर्धेत सहभागी होण्यासाठी इच्छुक स्पर्धकांनी https://forms.gle/1wVXuG3qx4CZj3yX8 या लिंकवर आपली नोंदणी करावी, असे आवाहन करण्यात आले आहे.

स्पर्धकांना प्रवेश निश्चितीसाठी पूर्व नोंदणी आवश्यक आहे. स्पर्धक संख्या मर्यादित असून, जर पूर्व नोंदणीद्वारे त्या संख्येची पूर्ती झाली नाही तरच स्पर्धेच्या दिनी सकाळी आयतेवेळी प्रवेश देण्यात येईल. मात्र त्यासाठी सकाळी ०८.०० ते १०.०० मधील नोंदणीमध्ये प्रवेश नोंदविणे अनिवार्य असेल. तरी याबाबत अधिक माहिती व नोंदणीसाठी संस्था समन्वयक तथा उपक्रम प्रभारी दर्श नागोटकर (मो. ७०५७५१८२६३) यांच्याशी संपर्क साधावा, असे आयोजकांकडून सांगण्यात आले आहे.

## २० संघांमध्ये एका ट्रॉफीसाठी रस्सीखेच

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

आयसीसी टी २० वर्ल्ड कप २०२६ स्पर्धेसाठी क्रिकेट चाहत्यांमध्ये उत्साह पाहायला मिळत आहे. अनेक वर्षांनंतर भारताला आयसीसी टी २० वर्ल्ड कप स्पर्धेच्या यजमानपदाच मान मिळाला आहे. तसेच शेजारी श्रीलंका सहयजमान आहे.

या स्पर्धेत एकूण २० संघांमध्ये एका ट्रॉफीसाठी जोरदार रस्सीखेच पाहायला मिळणार आहे. या २० संघांची विभागणी ५-५ नुसार ४ गटात करण्यात आली आहे. स्पर्धेतील सलामीचा सामना हा ७ फेब्रुवारीला खेळवण्यात येणार आहे. तर अंतिम सामन्याचा थरार हा ८ मार्चला रंगणार आहे. आतापर्यंत या स्पर्धेसाठी अनेक संघ जाहीर करण्यात आले आहेत. त्यानंतर आता आणखी एका संघाची घोषणा करण्यात आली आहे.

टीम इंडिया विरुद्ध न्यूझीलंड यांच्यातील दुसऱ्या एकदिवसीय सामन्यादरम्यान १४ जानेवारीला वर्ल्ड कप स्पर्धेसाठी १५ सदस्यीय कॅनडा संघाची घोषणा करण्यात आली आहे. कॅनडाची टी २० वर्ल्ड कप स्पर्धत खेळण्याची यंदाची ही एकूण आणि सलग दुसरी वेळ आहे.

## बॅडमिंटन स्पर्धेला माकडाची हजेरी

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

ऑलिम्पिक आयोजनाची स्वप्नं पाहणाऱ्या भारतीय क्रीडा स्पर्धांच्या आयोजकांना इंडिया ओपन बॅडमिंटन स्पर्धेच्या निमित्ताने वास्तवाने दणका दिला. बॅडमिंटन विश्वातल्या प्रतिष्ठेच्या इंडिया ओपन बॅडमिंटन सुपर ७५० स्पर्धेवेळी प्रेक्षकांमध्ये एक माकड बसल्याचं समोर आलं आहे. काही तासांपूर्वीच स्टेडियममध्ये पक्ष्यांनी केलेल्या घाणीबाबत विदेशी खेळाडूंनी तक्रार केली होती. तो विषय मार्गी लागण्याआधीच माकड थेट प्रेक्षागृहात दाखल झाल्याने जोरदार टीका होत आहे.



राजधानीत दिल्लीत कडाक्याच्या थंडीत इंदिरा गांधी क्रीडा संकुलात इंडिया ओपन बॅडमिंटन ही स्पर्धा सुरू आहे. भारतासहआंतरराष्ट्रीयपातळीवरील मोठे खेळाडू स्पर्धेत सहभागी झाले आहेत. छायाचित्रकार अझल्याना देवी यांनी इन्स्टाग्रामवर शेअर केलेल्या तीन पोस्टमध्ये प्रेक्षकांमध्ये माकड येऊन बसल्याचं स्पष्ट झालं. त्यानंतर सोशल मीडियावर चर्चेला तोंड फुटलं. देशविदेशातले मोठे खेळाडू खेळत आहेत त्या कोर्टपासून अवघ्या काही फुटांवर माकड येऊन बसल्याने संयोजकांवर कडाडून टीका होत आहे. दरम्यान स्पर्धेसाठी तैनात सुरक्षा यंत्रणांनी माकड स्टेडियममध्ये आल्याच्या वृत्ताला दुजोरा दिला.

प्रेक्षागृहात एक माकड आलं होतं. गोल्ड स्टँडमध्ये ते साधारण १० मिनिटं बसलं होतं. आम्हाला यासंदर्भात तक्रार मिळाली. आम्ही तातडीने कार्यवाही करून माकडाला बाहेर काढलं असं एका अधिकाऱ्याने सांगितलं. माकडाने कोणाला काहीही त्रास दिला नाही. प्रेक्षागृहाचा तो भाग अंधारमय असल्याने माकड आल्याचं चटकन कळलं नाही. जेव्हा माकड आल्याचं कळलं, आम्ही तातडीने कार्यवाही केली असं अधिकाऱ्याने सांगितलं.

कोरियाचा दुहेरीतील खेळाडू कांग मिन ह्युकने पोस्ट केलेल्या व्हीडिओत, खाशाबा जाधव इन्डोअर हॉलमध्येही एक माकड असल्याचं दिसून आलं. प्राण्यांना मुक्त प्रवेश आहे का? अशा कॅप्शनसह त्याने फोटो शेअर केला होता.

स्पर्धेच्या पहिल्या दिवशी डेन्मार्कची खेळाडू मिआ ब्लिचफेल्डटने सराव केंद्राच्या अवस्थेबाबत नाराजी व्यक्त केली होती. सराव केंद्रात कबुतरं आहेत. बऱ्याच ठिकाणी प्राण्यांनी घाण करून ठेवली आहे असं तिने म्हटलं होतं. कोर्ट्स उत्तम आहेत पण आरोग्य नीट नाही असं लिहित तिने पोस्ट शेअर केली होती. फ्लोअरिंगवर धूळ आहे. सराव केंद्रात पक्षी घिरट्या घालत होते. त्यांनी घाणही करून ठेवली आहे.

**सर्वात कमी डावांत २८ हजार धावा | पहिल्यांदा आयसीसीमध्ये नंबर १**

## विराटने केला सचिनचा महारेकॉर्ड ब्रेक



**। नवी दिल्ली। वृत्तसंस्था ।**

भारताचा प्रमुख आणि अनुभवी फलंदाज विराट कोहली याने २०२६ वर्षातील सलग दुसऱ्या सामन्यात यशस्वीरित्या धमाका सुरु ठेवलाय. विराटने न्यूझीलंड विरूद्धच्या एकदिवसीय मालिकेतील पहिल्या सामन्यात दमदार खेळी केली. विराटने रविवारी ११ जानेवारीला ९३ धावांची खेळी केली. विराटचं शतक अवघ्या ७ धावांनी हुकलं. मात्र विराटने या खेळीत २ खास कारनामे केले. विराटची ही एकदिवसीय क्रिकेटमध्ये ५० पेक्षा अधिक धावा करण्याची सलग पाचवी वेळ ठरली. तसेच विराटने आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये सर्वात कमी डावांत २८ हजार धावा करत सचिन तेंडुलकर आणि कुमार संगकारा या दोघांना मागे टाकलं. विराटने आता त्यानंतर बुधवारी १४ जानेवारीला राजकोटमधील निरंजन शाह स्टेडियममध्ये सचिनचा आणखी एक विक्रम मोडीत काढला आहे.

विराट पहिल्या वनडेत ९३ धावांवर बाद झाला. विराटने यासह भारताकडून न्यूझीलंड विरुद्ध एकदिवसीय सामन्यांमध्ये सचिनच्या सर्वाधिक धावांची बरोबरी केली होती. त्यामुळे विराटला दुसऱ्या सामन्यात सचिनला मागे टाकण्यासाठी अवघ्या १ धावेची गरज होती. विराटने राजकोटमध्ये आपल्या खेळीतील पहिल्या चेंडूवर चौकार ठोकत सचिनचा महाविक्रम आपल्या नावावर केला. विराटने यासह सचिनच्या नावावर असलेला सर्वाधिक धावांचा विक्रम मोडीत काढला. विराट यासह न्यूझीलंड विरुद्ध सर्वाधिक एकदिवसीय धावा करणारा दुसरा फलंदाज ठरला. न्यूझीलंड विरुद्ध सर्वाधिक एकदिवसीय धावांचा वर्ल्ड रेकॉर्ड हा ऑस्ट्रेलियाचा माजी फलंदाज रिकी पॉंटिंगच्या नावावर आहे.

विराटने १४ जानेवारीला धमाका केला. विराटने रोहित शर्मा याला मागे टाकत आयसीसी वनडे बॅटिंग रँकिंगमध्ये पहिल्या स्थानी झेप घेतली. विराटने यासह पावणे ५ वर्षांची प्रतिक्षा संपवली. विराटने एकदिवसीय क्रिकेटमध्ये २०२१ नंतर पहिल्यांदा आयसीसी रँकिंगमध्ये नंबर १ होण्याचा बहुमान मिळवला.

## रांजणखारमध्ये शनिवारी शुटींगबॉल स्पर्धा

### ■ विजेत्यांना पारितोषिक देऊन गौरविणार

**। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।**

रायगड जिल्ह्यामध्ये क्रीडा क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या अलिबाग तालुक्यातील मॉडेल संघ रांजणखार येथे ६७ वी खुली शुटींग बॉल स्पर्धा आयोजित केली आहे. राज्यस्तरीय होणारी ही स्पर्धा शनिवारी(दि.१७) स्व. गणेश पोशा पाटील क्रीडा नगरी रांजणखार येथे घेतली जाणार आहे. क्रीडा संघटक व ऑल इंडिया पॅसेंजर्स असोसिएशनचे अध्यक्ष चंद्रकांत मोकल यांच्या अध्यक्षतेखाली ही स्पर्धा होणार आहे.

या स्पर्धेचे यजमानपद मॉडेल संघ रांजणखारकडे आहे. या संघासह रायगड जिल्ह्यातील खारेपाटातील स्थानिक संघ, विद्यूत क्रिडा मंडळ मांडवखार, बहिरीदेव स्पोर्ट्स क्लब बहिरीचापाडा, ए.वन. माणकुले, वीर बहिरीचापाडा, लिबर्टी नारंगी, हनुमान वाघ्रण, फ्रेंडस् ग्रुप रांजणखार तसेच बाहेरील नामवंत शुटींगबॉल संघ, क्रांती कुंडल जामनेर, आएसीसी मालेगाव, इस्तियक मालेगांव, मणेराजूरी सांगली, माळशिरस सोलापूर, खानापूर सांगली, टेंभूर्णी सोलापूर, सातारा शासकीय दुध योजना पुणे, कावेरी नगर पुणे, महाड, कल्याण, सिंधुदूर्ग, मुंबई पोर्ट ॲथोरिटी, मुंबई महानगरपालिका, यमुना नगर पुणे, भारती विद्यापीठ पुणे, आरएमएमएस मुंबई, आरमार विक्रांत मुंबई, हे संघ सहभागी होणार आहेत. या संघातील खेळाडूंचा अप्रतिम खेळ पाहण्याची संधी क्रीडा प्रेमींना मिळणार आहे. या स्पर्धेतील विजेत्यांना रक्कम व पारितोषिक देऊन गौरविण्यात येणार आहे. ही स्पर्धा यशस्वी होण्यासाठी संघाचे पदाधिकारी व सदस्य मेहनत घेत असून ही तयारी अंतिम टप्प्यात आहे. ही स्पर्धा पाहण्यासाठी क्रिडा रसिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहवे असे आवाहन कुलाबा रायगड शुटींगबॉल असोसिएशनचे अध्यक्ष मंगेश पाटील यांनी केले आहे.

कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक **सौ.सुप्रिया पाटील** यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
**■ संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील ■ व्यवस्थापकीय संचालक : मीरा घाडीगावकर ■ कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत* ■ सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर**
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)